# प्रकरण तीन

## कृषी विभाग

**3.592 आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत 623 नग किसान परिवार फार्मर किटचा पुरवठा करणेबाबत. (T.S.P.)**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदर योजनेंतर्गत कृषी विभाग, जिल्हा परिषद, ठाणे यांनी महाराष्ट्र राज्य, कृषी उदयोग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडून 623 नग किसान परिवार फार्मर किट खरेदी करुन रक्कम रुपये 21,55,580/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 प्रमाणे ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार योजनेची अंमलबजावणी केलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83(3) प्रमाणे साहित्याचा दर्जा व गुणवत्तेबाबत प्रमाणपत्र दिलेले नाही.

3) ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1086/5534, दिनांक 05/10/1989 अन्वये लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि, कृषी विभागाने मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना दुबार लाभ दिलेला आहे का? याची लेखापरीक्षणात पडताळणी करता आलेली नाही.

4) योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार पंचायत समितीकडील लाभार्थीचे प्रस्ताव लेखापरीक्षणास पडताळणीस उपलब्ध करून दिले नाहीत. त्यामळे लाभार्थींची निवड निकषाप्रमाणे झाली किंवा नाही, याची लेखापरीक्षणात खात्री करता आलेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 90 व 91 अन्वये खरेदी आदेश, प्राप्त चलन क्रमांक, बॅच नंबर, खरेदी किंमत, प्राप्त दिनांक, वाटप दिनांक आणि वस्तू देणाऱ्याची व घेणा-याची सही घेणे आवश्यक असतांना शहापूर, मुरबाड व भिवंडी या गटांची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे नोंदवहीत वरीलप्रमाणे नोंदी घेतल्याची लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

6) सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांकडून विनियोग प्रमाणपत्रे घेतलेली नाहीत. तसेच योजनेचा फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास सादर केला नाही.

7) शासन परिपत्रक दिनांक 20/03/2007 अन्वये दिनांक 15 फेब्रुवारी नंतर कोणत्याही प्रकारची खरेदी करण्यात येऊ नये, असे शासन आदेश आहेत. तथापि, सदर प्रकरणी 15 फेब्रुवारी नंतर खरेदी करण्यात आलेली आहे. त्यामुळे शासन आदेशाचे पालन झाल्याचे दिसून येत नाही. तसेच योजना व खर्चाचे योग्य ते नियोजन झाले असते, तर खरेदी 15 फेब्रुवारी पूर्वी करता आली असती.

8) संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक 11/05/2015 च्या अंतरीम मार्गदर्शक सुचनेप्रमाणे योजनेचा मासिक प्रगती अहवाल विहीत केलेल्या प्रपत्र -1 मध्ये प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेपर्यंत कृषी आयुक्तालयास व समाजकल्याण विभागाकडे नियमित पाठविणे आवश्यक असतांना अशा प्रकारचा मासिक प्रगती अहवाल कृषी विभागाने पाठविल्याचे दिसून येत नाही.

**3.593 बचत गटांना 90 टक्के अनुदानावर शेती व्यवसायास चालना देणेसाठी सुधारित कृषी अवजारांचा पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** बचत गटांना 90 टक्के अनुदानावर शेती व्यवसायास चालना देणेसाठी कृषी औजारांचा पुरवठा करणेसाठी जिल्हा परिषद सेस मधून एकूण रक्कम रुपये 1,97,24,512/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांचे मार्गदर्शक सुचना पत्र क्रमांक ठाजिप/ कृषी/ 4/ वशी-610, दिनांक 12/06/2015 मध्ये नमूद केल्याप्रमाणे पंचायत समितीने दिलेल्या लक्षांकाप्रमाणे प्रथम येणाऱ्या लाभार्थीस प्रथम प्राधान्य या तत्वानुसार लाभार्थींचे प्रस्ताव स्विकारुन क्रमांकानुसार नोंदवहीत नोंद घेणे आवश्यक असतांना वरील पंचायत समित्यांनी अशा प्रकारच्या नोंदी घेतलेली नोंदवही लेखापरीक्षणासाठी सादर करण्यात आली नाही. तसेच कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी येणा-या प्रस्तावाची नोंदवहीत क्रमाने नोंद घेऊन प्रस्तावाची तपासणी करुन प्रस्ताव मंजूरीसाठी संबंधित विषय समितीकडे ठेवावा. असे असतांना कृषी विभागाने अशा प्रकारची नोंदवही ठेवलेली नाही.

2) आधार ग्रामसंस्था, तळवाडा व जागृती ग्रामसंस्था, हिव, तालुका शहापूर या दोन ग्रामसंस्थांच्या महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडून कृषी अवजारे खरेदी केल्याबाबतच्या कस्टमर कॉपी (खरेदी बिले) लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे सदर दोन संस्थांनी कृषी अवजारे खरेदी केले की नाही? याची लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1084/सी.आर./1633/, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिश्श्याची रक्कम वसूल केल्याशिवाय योजना कार्यान्वित करु नये, असे सूचित केलेले असतांना 32 ग्रामसंस्थांची 10 टक्के रक्कम रुपये 21,91,616/- संबंधीत ग्रामसंस्थांकडून योजना राबविणेपूर्वी वसूल केल्याचे दिसून येत नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 1089/846/266/34/, दिनांक 29/07/1989 नुसार जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे फलश्रुतीचे मुल्यमापन खाते प्रमुख/ विभाग प्रमुख यांचेकडून करणे आवश्यक असतांना फलश्रुतीचे मुल्यमापन करण्यात आलेले नाही. तसेच संबंधीत ग्रामसंस्था कृषी अवजारांचा वापर करीत असलेबाबत उपयोगिता प्रमाणपत्रे उपलब्ध करुन घेतलेले नाहीत.

**3.594 अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत 5 एच.पी. डिझेल इंजिन पंप सेटचा पुरवठा करणेबाबत. (S.C.P.)**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** कृषी विभाग, जिल्हा परिषद, ठाणे यांनी सदर योजने अंतर्गत 5 एच.पी. डिझेल पंप संच महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडून खरेदी करुन रक्कम रुपये 1,00,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 5 एच.पी. डिझेल इंजिन खरेदीचा पुरवठा आदेश दिनांक 23/06/2014 रोजी दिलेला आहे. पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा 45 दिवसांत करणे आवश्यक आहे. म्हणजेच मालाचा पुरवठा दिनांक 07/08/2014 पर्यंत करणे बंधनकारक असतांना मालाचा पुरवठा दिनांक 07/09/2015 रोजी विलंबाने केलेला आहे. कृषी आयुक्तालय, पुणे यांचेकडील मार्गदर्शक सूचना क्रमांक सीपीएस/सुकृओ/दर नि-2013-14/152/गु.नि.5/2013/, दिनांक 04/10/2013 प्रमाणे मालाचा पुरवठा मुदतीत न केल्यास अवजारांच्या किमतीच्या 3 टक्के रक्कम दंडात्मक वसूली म्हणून देयकातून एकरकमी करणेत येईल. असे असतांना अवजारांची किंमत 1,00,000/- x 3 टक्के दंड = रुपये 3,000/- दंडाची रक्कम देयकातून वसूल करणे आवश्यक असतांना दंडाची रक्कम वसूल केलेली नाही.

2) महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे Tax Invoice No.PE-66, दिनांक 11/03/2015 आणि डिलिव्हरी चलान क्रमांक 8144, दिनांक 07/09/2015 हे दोन्ही गटविकास अधिकारी, पंचायत समिती वाडा, जिल्हा पालघर यांच्या नावे आहेत. माल प्राप्त झालेबाबत डिलिव्हरी चलनावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती वाडा, जिल्हा पालघर यांची स्वाक्षरी आहे. यावरुन सदर मालाचा पुरवठा पंचायत समिती वाडा यांच्याकडे झाल्याचे दिसून येते आणि सदर डिझेल इंजिन खरेदीचा खर्च रुपये 1,00,000/- जिल्हा परिषद, ठाणे यांचे अनुदानातून झालेला आहे. सदर खर्च रुपये 1,00,000/- जिल्हा परिषद पालघर यांचेकडून वर्ग करुन घेऊन शासनाकडे भरणा करावा.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008 प्र.क्र.446/ वित्त-9, मुंबई, दिनांक 20/06/2008 प्रमाणे ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार योजनेची अंमलबजावणी केलेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83(3) प्रमाणे साहित्याचा दर्जा व गुणवत्तेबाबत प्रमाणपत्र दिलेले नाही.

5) ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1086/5534, दिनांक 05/10/1989 अन्वये लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि, कृषी विभागाने मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे लाभार्थींना दुबार लाभ दिलेला आहे का? याची लेखापरीक्षणात पडताळणी करता आलेली नाही.

6) योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार पंचायत समितीकडील लाभार्थींचे प्रस्ताव लेखापरीक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध करुन दिलेले नाहीत. त्यामुळे लाभार्थींची निवड निकषाप्रमाणे झाली की नाही? याची लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही.

7) सदर योजने अंतर्गत लाभार्थींकडून विनियोग प्रमाणपत्रे घेतलेली नाहीत व योजनेचा फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास सादर केला नाही.

**3.595 जिल्हा परिषद सेस योजनेंतर्गत खरीप हंगाम सन 2015-16 मधील लाभार्थ्यांना 50% अनुदानाने नैसर्गिक आपत्तीमुळे अचानक उद्भवणाऱ्या किडरोगाचे नियंत्रण बाबत.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 14 दिनांक 12/12/2015 अन्वये प्रस्तावित योजनेवर रक्कम रूपये 14,00,080/- इतका खर्च नोंदविण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, जव्हार, पंचायत समिती, विक्रमगड, पंचायत समिती, वाडा, च्या साठा नोंदवहया / साहित्य वाटप नोंदवहया लेखापरीक्षणास पहावयास मिळाल्या नाहीत.

2) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक आउयो-2415/प्र.क्र.217/4 अे, दिनांक 03/06/2011 मध्ये सूचित केल्याप्रमाणे वैयक्तीक लाभार्थी निवडतांना महिला लाभार्थ्यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. असे लाभार्थी उपलब्ध न झाल्यास इतर पात्र लाभार्थ्यांचा विचार करणे आवश्यक आहे. परंतू, त्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1089/प्र.क्र.553/64/05, दिनांक 05/10/1989 नुसार योजनांचा लाभ मिळणाऱ्या लाभार्थ्यांचे गट स्तरावर मास्टर रजिस्टर ठेवणे आवश्यक असतांना गट स्तरावर तशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे साहित्याचा दुबार लाभ दिला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) सदर योजनेची फलश्रुती व मूल्यमापन अहवाल घेतलेला नाही.

**3.596 विशेष घटक योजनेअंतर्गत सुधारीत कृषी अवजारे खरेदीबाबत. (SCP)**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रुपये 93,94,249/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विशेष घटक योजनेअंतर्गत ऑईल इंजिन खरेदी नग 266, पाईपलाईन नग 4,994, ताडपत्री नग 320, सायकल कोळपे नग 176 व वैभव विळे नग 1,704 एवढया सुधारीत कृषी अवजारे खरेदी करणेचा रक्कम रूपये 93,94,249/- एवढया रक्कमेचा पुरवठा आदेश माहे मार्च 2016 मध्ये देण्यात आला होता. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2009/प्र.क्र.514वित्त-9, दिनांक 20/11/2009 नुसार रूपये 8,500/- एवढया रक्कमेचा करारनामा पुरवठादार यांचेसोबत करणे आवश्यक होते. मात्र, त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. रक्कम रूपये 8,500/- संबंधिताकडून वसूल करून शासन निधीत भरणा करून पुर्तता दाखवावी.

2) सदर खरेदी कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकऔ-2015/प्र.क्र.218/11ए, दिनांक 23/11/2015 च्या दरपत्रकानुसार केलेली आहे. खरेदी केलेल्या साहित्याची नोंदसाठा नोंदवहीमध्ये जमा घेऊन त्यानंतर ज्या शेतकऱ्यांना कृषी अवजारे यांचा लाभ देण्यात येईल, त्याबाबत नोंद

विभागाकडील मास्टर नोंदवहीमध्ये घेणे आवश्यक आहे. जेणेकरून दुबार लाभ होणार नाही. तसेच एका शेतकऱ्यावर करावयाच्या खर्चाच्या मर्यादेचे पालन करता येईल. मात्र विभागाकडील मास्टर नोंदवही तपासता ती अद्यावत ठेवलेली नाही. माणगांव गटास 58 ऑईल इंजीन पुरवठा केलेले असतांना 57 लाभार्थी यांना वाटप केल्याची नोंद मास्टर नोंदवहीमध्ये आहे. एका ऑईल इंजिनाची नोंद नाही. महाड गटास 48 ऑईल इंजिन दिलेले असतांना मास्टर नोंदवहीमध्ये फक्त 16 एवढीच नोंद घेतली आहे. उर्वरीत 32 ऑईल इंजिनची नोंद नाही. पोलादपूर गटास 32 ऑईल इंजिन दिलेले असतांना सदर 32 ऑईल इंजिन वाटपाची मुख्य रक्कमेसह नोंद मास्टर नोंदवहीमध्ये घेतलेली नाही. एकूण 65 ऑईल इंजिनाची नोंद (SCP) मास्टर नोंदवहीमध्ये न घेण्याचे प्रयोजन काय? सदर ऑईल इंजिनाचे वाटप SCP व्यतिरिक्त कोणाला केले? याबाबत पुर्तता सादर करावी. अन्यथा ऑईल इंजिनाची रक्कम रूपये 65 X 19250 (दर) = रूपये 12,51,250/- संबंधीतांकडून जबाबदारी निश्चित करून वसूल करावी.

3) माणगांव गटास 116 नग ताडपत्री वाटप केलेले असून मास्टर नोंदवहीप्रमाणे वाटप 114 ताडपत्रीचे केलेले आहे. उर्वरीत 02 ताडपत्रीचे वाटपाची नोंद मास्टर नोंदवहीमध्ये नाही. लाभार्थी अंतिमरित्या निवडलेले असतांना 02 ताडपत्री कोणाला प्रदान केल्या? याबाबत पुर्तता सादर करावी. अन्यथा रक्कम रूपये 2 X 4387 = रूपये 8,774/- वसूल करून पुर्तता दाखवावी.

4) SCP अंतर्गत एकूण 4,994 एवढे पाईप खेरदी केलेले आहे. सदर खरेदीवर रूपये 25,81,898/- एवढा खर्च केलेला आहे. ज्या शेतकऱ्याला पाईचा लाभ देण्यात आला, त्या शेतकऱ्यांच्या नावासमोर पाईपची मुल्य किंमत मास्टर नोंदवहीमध्ये नोंदविणे आवश्यक आहे. मात्र, 4994 एवढया पाईपांच्या मुल्य किंमतीची नोंद मास्टर नोंदवहीमध्ये नोंदविलेली नाही. त्यामुळे आर्थिक अनुदानाची मर्यादा पाळली गेली किंवा कसे? याची खात्री करता आली नाही.

5) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील मार्गदर्शक सुचना जावक क्रमांक वि.प्र.सा.निघयो/ अंतरीम/ मासू/ 210/ 15-16/15, दिनांक 11/04/2015 मधील सुचनेनुसार 0.75 टक्के योजनेची तपासणी विभागीय कृषी सहसंचालक, 5 टक्के कृषी विकास अधिकारी, 10 टक्के जिल्हा कृषि अधिकारी (विशेष घटक योजना) व 100 टक्के कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) पंचायत समिती स्तर यांनी करणे आवश्यक आहे. मात्र, त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे लेखे / प्रमाणपत्र आढळून आले नाही.

6) मार्गदर्शक सुचनेनुसार लाभार्थी निवड खालील निकषाप्रमाणे करणे आवश्यक आहे. (अ) 2 हेक्टर पर्यंत जमीन धारणा असलेल्या शेतकऱ्यांना प्रथम प्राधान्य (ब) 2 हेक्टर ते 4 हेक्टर पर्यंत जमीन धारणा असणाऱ्या शेतकऱ्यांना द्वितीय प्राधान्य (क) 4 हेक्टर ते 6 हेक्टर पर्यंत जमीन धारणा असणाऱ्या शेतकऱ्यांना तृतीय प्राधान्य विभागाने लाभार्थी शेतकरी याच निकषाप्रमाणे निवडलेबाबत लेख्यांसह अनुपालन सादर करावे.

**3.597 ओटीएसपी अंतर्गत खरेदी केलेले मळणी साहित्य प्राप्त न झालेबाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रुपये 12,46,128/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद, कृषी विभागाने ओटीएसपी अंतर्गत 156 मळणी यंत्र पुरवठा करणेबाबत महाराष्ट्र शासन कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकऔ/2015/ प्र.क्र.218/अे, दिनांक 23/11/2015 दर करारानुसार विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महामंडळ मर्यादीत, गोरेगांव, मुंबई यांना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पुरवठा आदेश जावक क्रमांक राजिप/कृषी/ वशी/क्र.6/2016/533, दिनांक 31/03/2016 नुसार दिलेले होते. सदर साहित्याची रक्कम रूपये 12,46,128/- पुरवठादारास प्रदान केलेली आहे. मात्र, तपासणी कालावधी जून 2017 अखेर म्हणजेच पुरवठा आदेश दिल्यापासून जवळ जवळ 15 ते 16 महिन्यापर्यंत सदर साहित्याचे पुरवठा झालेला नाही. साहित्य प्राप्त झालेले नसतांना देयकाचे प्रदान पुरवठादारास करण्यात आले आहे.

2) पुरवठा आदेश दिलेले साहित्य विभागास केव्हा प्राप्त झाले अगर नाही. याबाबत अनुपालन दाखवावे. साहित्य प्राप्त झाले असल्यास ते केव्हा प्राप्त झाले व गटातील शेतकऱ्यांना त्या साहित्याची वाटप केव्हा केले तसेच देयकातून दर करारातील अटीप्रमाणे किती दंड वसूल केला, याबाबत तपशीलासह पुर्तता सादर करावी.

**3.598 50 टक्के अनुदानावर शेतकरी यांना ताडपत्री पुरविणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रुपये 24,99,552/- खर्च करण्यात आला आहे.

1) योजनेअंतर्गत विभागाने 50 टक्के अनुदानावर ताडपत्री वाटपासाठी जिल्हा परिषद निधीतून रक्कम रूपये 24,99,552/- एवढी रक्कम खर्च केलेली आहे. लाभार्थी हिस्याची रक्कम रूपये 24,99,552/- अशी एकूण रक्कम रूपये 49,99,104/- एवढी पुरवठादारास प्रदान केलेली आहे. पुरवठादाराकडून विहीत रक्कमेचा करारनामा केलेला नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2009/प.क्र.514/ वित्त-9, दिनांक 20/11/2009 नुसार रक्कम रूपये 10 लाखापर्यंतच्या रक्कमेवर रूपये 100/- एवढया रक्कमेचा करारनामा करणे आवश्यक असून पुढील प्रत्येक लाखासाठी रूपये 100/- एवढ्या रक्कमेचा करारनामा करणे आवश्यक होते. विभागाने पुरवठादाराकडून 50 लाखासाठी रूपये 4,100/- एवढ्या रक्कमेचा करारनामा न करता पुरवठा आदेश दिलेले आहे. सदर रक्कम रूपये 4,100/- संबंधीत जबाबदार व्यक्तीकडून वसूल करून पुर्तता दाखवावी.

2) दर करार क्रमांक एसपीसी/आरसीटी/तारपोलीन/प्लॅस्टीक/02/14-15/बी-1-223, दिनांक 09/01/2015 च्या दर करारातील अट क्रमांक 10 अन्वये 90 टक्के रक्कम माल प्राप्त झालेनंतर व उर्वरीत 10 टक्के रक्कम मालाच्या दर्जाबाबत गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त झालेनंतर प्रदान करणे आवश्यक असतांना विभागाने त्याप्रमाणे प्रदान न करता एक रकमी 100 टक्के प्रदान केलेले आहे. 100 टक्के रक्कम प्रदान करण्याचे प्रयोजन काय?

3) दर करारातील अट क्रमांक 08 नुसार पुरवठा 4 आठवडयाच्या आत करणे आवश्यक होते. पुरवठा आदेश दिनांक 30/05/2015 रोजी दिलेले होते. विहीत कालावधी दिनांक 27/06/2015 पर्यंत पुरवठा करणे आवश्यक असतांना पुरवठादाराने ताडपत्रीचा पुरवठा दिनांक 15/07/2015 रोजी केलेला आहे.

पुरवठादाराने 3 आठवडे विलंबाने पुरवठा केलेला असतांना देयकातून दंडाची रक्कम कपात केली नाही. दंडाची रक्कम रूपये दर करारातील अट क्रमांक 17 अन्वये 4999104 X 0.50 टक्के = रूपये 74,987/- एवढी कपात न करता देयकाचे प्रदान केलेले आहे. दंडाची रक्कम वसूल करून शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

**3.599 जिल्हा परिषद सेस योजनेअंतर्गत शेतीच्या आधुनिक/ उच्चतंत्रज्ञान पद्धतीसाठी 50 टक्के अनुदानावर औजारे पुरवठा करणे, भात मळणी यंत्र व कडबा कुटी यंत्र.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 668, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 22,44,163/- खर्च करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2015/प्र.क्र.218/11-ओ, दिनांक 23/11/2015 अन्वये कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध क्रेंद्र / राज्य पुरस्कृत योजनांअंतर्गत अनुदानावर पुरवठा करावयाच्या साहित्याचे दर निश्चित केलेले आहेत. त्या अनुषंगाने साहित्याची खरेदी करण्यात आलेली आहे. तथापि, सदरील शासन निर्णयातील अट क्रमांक 17 अन्वये शेतकऱ्यांकडून विशिष्ट अवजारांच्या खरेदीची मागणी ( परचेस ऑर्डर ) असल्याखेरीज कोणत्याही औजारांची मागणी स्वतःहुन अधिकाऱ्यांनी पुरवठादार संस्थेकडे नोंदवू नये, असे स्पष्ट आदेश असतांना कोणत्याही लाभार्थ्यांची मागणी न घेताच पुरवठा आदेश देण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 2012/प्र.क्र.104/ वित्त-3, दिनांक 16/10/2012 अन्वये जिल्हा परिषदेच्या वतीने खरेदी करण्यात येणाऱ्या सामग्रीविषयी मार्गदर्शक

तत्वे दिलेली असतांनाही जिल्हा परिषदेने योजना राबवितांना प्रथम लाभार्थी यादी निवड न करताच खरेदी प्रक्रिया करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

3) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचे आदेश क्रमांक राजिप/ कृषी/ सी-4/ 544/16, दिनांक 04/03/2016 अन्वये 120 नग भात मळणी यंत्र 15 दिवसांच्या आत पुरवठा करण्याबाबत सूचित केलेले असतांना संबंधीत पुरवठा दाराने गटविकास अधिकारी, पंचायत समिती, संगमेश्वर यांना चलन क्रमांक 26968, दिनांक 31/03/2016 अन्वये 12 भात मळणी यंत्र पाठविण्यात आलेले आहेत. तथापि, संबंधीत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, संगमेश्वर यांची माल प्राप्त झाल्याची दिनांक 29/06/2016 ही असल्याने तब्बल 107 दिवस विलंबाने साहित्याचा पुरवठा केलेला आहे. तरी शासन पर्चेस मॅन्युअल नुसार प्रती आठवडा 0.05 टक्के ते अधिकतम 10 टक्के पर्यंत दंडाची कार्यवाही करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही का करण्यात आलेली नाही? तरी प्रती आठवडा 2 टक्के प्रमाणे 13 आठवड्यांची होणारी रक्कम रुपये 70,200/- मक्तेदाराकडून वसूल करण्यात यावी.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणी विशिष्ट मुदतीमध्ये पूर्ण करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1084/ सी.आर/1633/ 56, दिनांक 19/01/1995 नुसार लाभार्थी हिस्सा साहित्य खरेदी आदेश देण्यापूर्वी वसूल केलेला नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83(3) नुसार साहित्याचा दर्जा व गुणवत्तेबाबत प्रमाणपत्र दिलेली नाही.

7) पुरवठा आदेशातील अटीनुसार अवजारांचे क्षेत्रीय स्तरावरील गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच उर्वरित 10 टक्के रक्कम संबंधीत मक्तेदारास अदा करण्यात येईल असे असतांना चाचणी अहवाल प्राप्त होण्यापूर्वीच 100 टक्के रक्कम प्रदान करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

8) जिल्हा परिषद स्तरावर खरेदीकरून पंचायत समिती स्तरावर पाठविण्यात आलेले साहित्याची वाटप यादी व संबंधीत लाभार्थ्यांना पोहोच झाल्याबाबत संबंधितांचे पोहोच लेखापरीक्षणास प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे सदरील योजनेचे उद्दिष्ट सफल झाल्याचे दिसून येत नाही.

**3.600 महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण ( अपारंपारिक उर्जा विकास )योजनेअंतर्गत 50 टक्के अनुदानावर सौर उपकरणे ( सौर कंदील ) पुरविणेबाबत**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 22,46,750/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 2012/ प्र.क्र. 104/ वित्त-3, दिनांक 16/10/2012 अन्वये जिल्हा परिषदेच्या वतीने खरेदी करण्यात येणाऱ्या सामग्री विषयी मार्गदर्शक तत्वे दिलेली असतांनाही जिल्हा परिषदेने योजना राबवितांना प्रथम लाभार्थी यादी निवड न करताच खरेदी प्रक्रिया करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणी विशिष्ट मुदतीमध्ये पूर्ण करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2009/ प्र.क्र.514/वित्त-9, दिनांक 20/11/2009 अन्वये जिल्हा परिषद करण्यात येणाऱ्या कार्य करारावर मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 34 चे अंमलबजावणी बाबत सूचित केल्यानुसार संबंधीत मक्तेदारासोबत रक्कम रुपये 3,600/- च्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न केल्याने रक्कम रुपये 3,500/- चे नुकसान झालेले आहे. सदरची रक्कम वसूल करण्यात यावी.

4) मुळ लेखापरिक्षण अहवालानुसार उपरोक्त पुरवठा आदेश क्रमांक 1 मधील अटी व शर्ती मधील अनुक्रमांक 9 नुसार सौर कंदील साहित्याचा पुरवठा हा 15 दिवसांच्या आत करण्याबाबत सूचित केलेले असतांना संबंधीत पुरवठा दाराने पंचायत समिती देवरुख यांना जिल्हा परिषद सेस अंतर्गत 40 नग दिनांक 07/06/2016 व जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत 60 नग दिनांक 07/06/2016 रोजी म्हणजेच मक्तेदाराने साहित्याचा 81 दिवस विलंबाने पुरवठा केलेला आहे. तरी शासन पर्चेस मन्युअल नुसार प्रती आठवडा 0.05 टक्के ते अधिकतम 10 टक्के पर्यंत दंडाची कार्यवाही करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही का करण्यात आलेली नाही. तरी प्रती आठवडा 2 टक्के प्रमाणे 10 आठवड्यांची होणारी जिल्हा परिषद सेस रक्कम रुपये 22,000/- व जिल्हा वार्षिक योजना रक्कम रुपये 33,000/- अशी एकूण रक्कम रुपये 55,000/- मक्तेदाराकडून वसूल करण्यात यावी.

मुळ लेखापरिक्षण अहवालात नमुद पुरवठा आदेश क्रमांक 2 मधील अटी व शर्ती मधील अनुक्रमांक 10 नुसार सौर कंदील साहित्याचा पुरवठा हा 04 दिवसांच्या आत करण्याबाबत सूचित केलेले असतांना संबंधीत पुरवठा दाराने पंचायत समिती देवरुख यांना 30 नग दिनांक 23/06/2016 व पंचायत समिती लांजा यांना 55 नग दिनांक 23/06/2016 रोजी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत पोहोच केल्याने मक्तेदाराने साहित्याचा 88 दिवस विलंबाने पुरवठा केलेला आहे. तरी शासन पर्चेस मन्युअल नुसार प्रती आठवडा 0.05 टक्के ते अधिकतम 10 टक्के पर्यंत दंडाची कार्यवाही करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही का करण्यात आलेली नाही? तरी प्रती आठवडा 2 टक्के प्रमाणे 11 आठवड्यांची होणारी जिल्हा वार्षिक योजना रक्कम रुपये 51,425/- मक्तेदाराकडून वसूल करण्यात यावी.

5) पुरवठा आदेशातील सूचनेनुसार गटविकास अधिकारी यांनी सौर कंदील ताब्यात घेऊन साठा नोंदवहीला नोंद घेण्यात याव्यात व त्याप्रमाणे पृष्ठ क्रमांक व दिनांकासह पोहोच झाल्याचा अहवाल सादर करण्याबाबत सूचित केलेले असतांना कोणीही त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्याप्रमाणे संबंधीत साहित्य प्रत्यक्ष लाभार्थ्यांना वाटप केल्याबाबत लाभार्थ्यांनच्या पोहोच व लाभार्थी यादी लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

**3.601 जिल्हा परिषद सेस योजनेंतर्गत ऑईल / डिझेल इंजिन पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 559, दिनांक 31/03/2016, रक्कम रुपये 23,87,963/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2015/प्र.क्र.218/11.ओ, दिनांक 23/11/2015 अन्वये कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध क्रेंद्र / राज्य पुरस्कृत योजनांतर्गत अनुदानावर पुरवठा करावयाच्या साहित्याचे दर निश्चित केलेले आहेत. त्या अनुषंगाने साहित्याची खरेदी करण्यात आलेली आहे. तथापि, सदरील शासन निर्णयातील अट क्रमांक 17 अन्वये शेतकऱ्यांकडून विशिष्ट अवजारांच्या खरेदीची मागणी ( परचेस ऑर्डर ) असल्याखेरीज कोणत्याही अवजारांची मागणी स्वतःहुन अधिकाऱ्यांनी पुरवठादार संस्थेकडे नोंदवू नये, असे स्पष्ट आदेश असतांना कोणत्याही लाभार्थ्यांची मागणी न घेताच पुरवठा आदेश देण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-2012/प्र.क्र. 104/वित्त-3, दिनांक 16/10/2012 अन्वये जिल्हा परिषदेच्या वतीने खरेदी करण्यात येणाऱ्या सामुग्रीविषयी मार्गदर्शक तत्त्वे दिलेली असतांनाही जिल्हा परिषदेने योजना राबवितांना प्रथम लाभार्थी यादी निवड न करताच खरेदी प्रक्रिया करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

3) पुरवठा आदेशान्वये संबंधीत पुरवठादाराने 30 दिवसाच्या आत 2 एच.पी.पेट्रोल / डिझेल पंप संच नग 142 व एच पी इलेक्ट्रिक पंप संच नग 5 पुरवठा करण्याबाबत सूचित केलेले असतांना संबंधीत पुरवठादाराने गटविकास अधिकारी, पंचायत समितीस्तरावर पुरवठा केलेले साहित्याची तपासणी केली असता पोच पावतीवर दिनांक नमुद केलेले नाही. तसेच, पंचायत समिती संगमेश्वर यांना चलन क्रमांक 1940, दिनांक 15/07/2016 अन्वये 20 नग 2 एच.पी.पेट्रोल / डिझेल पंप संच पाठविण्यात आलेले आहेत. तथापि, संबंधीत गटविकास अधिकारी, पंचायत समिती संगमेश्वर यांना दिनांक 31/03/2016 पर्यंत साहित्य पोचविणे आवश्यक असतांना तब्बल 106 दिवस विलंबाने साहित्याचा पुरवठा केलेला आहे. तरी शासन पर्चेस मॅन्युअल नुसार प्रती आठवडा 0.05 टक्के ते अधिकतम

10 टक्के पर्यंत दंडाची कार्यवाही करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही का करण्यात आलेली नाही? तरी 20 नग दर रुपये 19,250/- एकुण् रुपये 3,85,000/- प्रमाणे प्रती आठवडा 2 टक्के प्रमाणे 15 आठवड्यांची होणारी रक्कम रुपये 1,15,500/- मक्तेदाराकडून वसूल करण्यात यावी.

तसेच, पुरवठा आदेश क्रमांक रजिप/कृषी/सी-4/781/कृ.वि/जि.प.रत्ना, दिनांक 23/03/2016 अन्वये पुरवठादाराने तालुका स्तरावर 3 एच.पी. इलेक्ट्रिक पंप नग 34 व 2 एच.पी.पेट्रोडिझेल पंपसंच नग 62 पुरवठा सात दिवसाच्या आत तालुका स्तरावर करणे आवश्यक असताना संबंधीत नस्तीत चलन पोचपावती तपासणी केली असता 3 एच पी इलेक्ट्रिक पंप संच तालुका खेड यांना दिनांक 12/05/2016 रोजी व तालुका संगमेश्वर यांना दिनांक 12/05/2016 रोजी पोच केल्याचे दिसुन येते. तरी शासन पर्चेस मॅन्युअलनुसार प्रती आठवडा 0.05 टक्के ते अधिकतम 10 टक्के पर्यंत दंडाची कार्यवाही करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही का करण्यात आलेली नाही? तरी खेड तालुका यांना 5 आठवडे व संगमेश्वर तालुका यांना 5 आठवडे विलंबाने साहित्य पोच झाल्याचे दिसुन येते. खेड व संगमेश्वर एकुण नग 11 रक्कम रुपये 1,90,575/- प्रमाणे प्रती आठवडा 2 टक्के प्रमाणे 5 आठवड्यांची होणारी रक्कम रुपये 19,057/- मक्तेदाराकडून वसूल करण्यात यावी.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र. 446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणी विशिष्ट मुदतीमध्ये पूर्ण करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1084/ सी.आर/ 1633/ 56, दिनांक 19/01/1995 नुसार लाभार्थी हिस्सा साहित्य खरेदी आदेश देण्यापूर्वी वसूल केलेला नाही,

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83(3) नुसार साहित्याचा दर्जा व गुणवत्तेबाबत प्रमाणपत्र दिलेली नाही.

7) शासन निर्णय दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3 नुसार मागणीप्रमाणे साहित्य सुस्थितीत व योग्य गुणवत्तेने प्राप्त झाले आहेत. तसे प्रमाणपत्र गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी पंचायत समितीकडुन प्रमाणपत्र घेणेत आलेले नाही.

8) लाभार्थ्याच्या विहीरीमध्ये जादा पाण्याचा स्त्रोत क्षमता उपलब्ध आहे किंवा कसे? याबाबत जिल्हा कृषी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी याचा अहवाल उपलब्ध झालेला नाही.

9) पुरवठा आदेशातील अटीनुसार अवजारांचे क्षेत्रीय स्तरावरील गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच उर्वरित 10 टक्के रक्कम संबंधीत मक्तेदारास अदा करण्यात येईल. असे असतांना चाचणी अहवाल प्राप्त होण्यापूर्वीच 100 टक्के रक्कम प्रदान करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

10) जिल्हा परिषद स्तरावर खरेदीकरून पंचायत समिती स्तरावर पाठविण्यात आलेले साहित्याची वाटप यादी व संबंधीत लाभार्थ्यांना पोहोच झाल्याबाबत संबंधितांचे पोहोच लेखापरीक्षणास प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे सदरील योजनेचे उद्दिष्ट सफल झाल्याचे दिसून येत नाही.

**3.602 थकीत लाभार्थी हिस्सा रकमेबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

कृषी विभागाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण वेळी योजना लेखे तपासले असता कृषी विभागाने राबविलेल्या योजनेच्या लाभार्थी हिस्सा रक्कम थकीत आहे. तरी थकीत रक्कम रूपये 16,74,486/- वसूल करून पूर्तता दाखवावी.

**3.603 75 टक्के अनुदानावर आंबा, काजू इत्यादी पिकासाठी संरक्षण औषधे पुरवठा करणे योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रुपये 3,34,088/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) या योजेनेसाठी घेण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेस जावक क्रमांक व दिनांक नमूद केलेला दिसून येत नाही. त्यामुळे प्रशासकीय व तांत्रिक मान्यता कधी घेतली? याची खात्री करता आली नाही.

2) कृषी संचालक, कृषी आयुक्तालय, पुणे यांच्या दिनांक 20/06/2015 च्या पत्रातील 3.2 नुसार सदर पुरवठा झालेल्या साहित्याचा कृषी विद्यापीठाच्या प्रयोगशाळेतून तपासून चाचणी अहवाल घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही सदर विभागाने केलेली दिसून येत नाही.

3) पुरवठादाराकडून औषधाचा पुरवठा गटस्तरावर झाल्यावर सदर औषधाच्या नोंदी त्यांच्या साठा नोंदवहीला घेवून त्याच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक होते. परंतु, तशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

4) पुरवठादाराकडून पुरविण्यात आलेल्या औषधाचा दर्जा उचित असलेबाबत तपासणी अहवाल पहावयास मिळालेला नाही.

5) पुरवठादाराने गट स्तरावर पुरविण्यात आलेली सर्व औषधे वाटप केल्याबाबत तालुका कृषी अधिकारी यांचा अहवाल नस्तीसोबत जोडलेला दिसून येत नाही.

6) सदर योजेनेसाठी लाभार्थ्याची निवड गट स्तरावरून करण्यात आली आहे. मंजूर लाभार्थ्याचे प्रस्ताव तसेच लाभार्थी मंजूर निवड यादी दप्तरी ठेवण्यात आलेली नाही.

7) 25 टक्के लाभार्थी हिस्सा रक्कम रुपये 83,522/- वसूल झाल्याबाबत खात्री पटवावी.

**3.604 75 टक्के अनुदानावर भात पिकासाठी पिक संरक्षण औषधे पुरवठा करणे योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 125 दिनांक 24/02/2016 अन्वये रक्कम रुपये 3,49,400/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) या योजेनेसाठी घेण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेस जावक क्रमांक व दिनांक नमूद केलेला दिसून येत नाही. त्यामुळे प्रशासकीय व तांत्रिक मान्यता कधी घेतली याची खात्री करता आली नाही.

2) पुरवठादाराकडून औषधाचा पुरवठा गटस्तरावर झाल्यावर सदर औषधाच्या नोंदी त्यांच्या साठा नोंदवहीला घेवून त्याच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक होते. परंतु, तशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

3) 25 टक्के लाभार्थी हिस्सा रक्कम रुपये 1,16,700/- वसूल झाल्याबाबत खात्री पटवावी.

4) पुरवठादाराकडून पुरविण्यात आलेल्या औषधाचा दर्जा उचित असलेबाबत तपसणी अहवाल पहावयास मिळालेला नाही.

5) पुरवठादाराने गट स्तरावर पुरविण्यात आलेली सर्व औषधे वाटप केल्याबाबत तालुका कृषी अधिकारी यांचा अहवाल नस्ती सोबत जोडलेला दिसून येत नाही.

6) पुरवठा आदेशानुसार पुरवठादाराने औषधाचा पुरवठा 30 दिवसाच्या आत करणे आवश्यक होते. औषधे पुरवठा झाल्याची पोहोच ची तपासणी केली असता काही औषधे दिनांक 29/08/2016 रोजी प्राप्त झालेली दिसून येतात.

7) सदर योजेनेसाठी लाभार्थ्याची निवड गट स्तरावरून करण्यात आली आहे. मंजूर लाभार्थ्याचे प्रस्ताव तसेच लाभार्थी मंजूर निवड यादी दप्तरी ठेवण्यात आलेली नाही.

8) कृषी संचालक, कृषी आयुक्तालय, पुणे यांच्या दिनांक 20/06/2015 च्या पत्रातील 3.2 नुसार सदर पुरवठा झालेल्या साहित्याचा कृषी विद्यापीठाच्या प्रयोगशाळेतून तपासून चाचणी अहवाल घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही सदर विभागाने केलेली दिसून येत नाही.

**3.605 जिल्हा नियोजन विकास महामंडळ पुरस्कृत फलोत्पादन राज्य पिक संरक्षण योजना.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदर योजनेसाठी रूपये 29,99,949/- व लाभार्थी हिस्सा रक्कम रूपये 29,99,949/- मिळून रूपये 59,99,898/- इतका खर्च आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेत पुरवठादाराला दिलेल्या पुरवठा आदेशातील अटीनुसार पुरवठादाराने आंबा पिकासाठी फेनव्हलरेट, डायमेथाइट व क्वीनॉलफिंस ईत्यादी औषधाचा पुरवठा केला आहे. सदर औषधाची मुदत माहे 07/2016 व 08/2016 पर्यंत संपणार आहे. कृषी आयुक्तालयाच्या पत्रानुसार 1 वर्ष जादा मुदत असलेली औषधेच पुरवायची असतांना तशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. सदरबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) पुरवठादाराकडून औषधाचा पुरवठा गटस्तरावर झाल्यावर सदर औषधाच्या नोंदी त्यांच्या साठा नोंदवहीला घेवून त्याच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक होते. परंतु, तशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, निर्णय दिनांक 31/01/2013 मधील उपविभाग 4 करिता टीप 5 प्रमाणे सदर योजनेस सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यतेस मंजुरी घेण्यात आलेली दिसून येत नाही. तरी सदरबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4) पुरवठादाराने गट स्तरावर पुरविण्यात आलेली सर्व औषधे 15 दिवसात वाटप करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे तालुका कृषी अधिकारी यांनी सर्व औषधे वाटप केलेबाबतचा अहवाल नस्तीसोबत जोडलेला दिसून येत नाही.

5) कृषी संचालक, कृषी आयुक्तालय, पुणे यांच्या दिनांक 20/06/2015 च्या पत्रातील 3.2 नुसार सदर पुरवठा झालेल्या साहित्याचा कृषी विद्यापीठाच्या प्रयोगशाळेतून तपासून चाचणी अहवाल घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही सदर विभागाने केलेली दिसून येत नाही.

6) पुरवठा आदेशानुसार पुरवठादाराने औषधाचा पुरवठा 30 दिवसाच्या आत करणे आवश्यक होते, औषधे पुरवठा झाल्याची पोहोच ची तपासणी केली असता सदर औषधाचा पुरवठा 30 दिवसानंतर झाल्याचा दिसून येतो. तरी सदरबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

7) 25 टक्के लाभार्थी हिस्सा रक्कम रुपये 28,30,937/- व रूपये 1,53,430/- वसूल झाल्याबाबत खात्री पटवावी.

8) सदर योजेनेसाठी लाभार्थ्यांची निवड गट स्तरावरून करण्यात आली आहे. मंजूर लाभार्थ्यांचे प्रस्ताव तसेच लाभार्थी मंजूर निवड यादी दप्तरी ठेवण्यात आलेली नाही.

**3.606 जिल्हा परिषदसेस योजनेतून 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना पिकसंरक्षण अवजारे पुरविणे. (सारायंत्र).**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** कृषी विभागामार्फत सन 2015-2016 मध्ये जिल्हा परिषदसेस योजनेतून 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना पिकसंरक्षण औजारे पुरविणे (सारायंत्र) ही योजना राबविलेली आहे. सदरबाबत प्रमाणक क्रमांक 885, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 19,99,030/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेची नस्ती तपासणी केली असता कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ/2015/प्र.क्र.218/11अे, दिनांक 23/11/2015 मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक 8 नुसार औजारांची मागणी नोंदविल्यानंतर 45 दिवसांच्या कालावधी अवजारांचा पुरवठा करण्याची जबाबदारी पुरवठा संस्थांची राहील. 45 दिवसानंतर पुरवठा केलेल्या औजारांच्या किमतीच्या 3 टक्के रक्कम दंडात्मक वसूली पुरवठादाराकडून एकरकमी वसूल करणेत येईल. असे असताना पुरवठा आदेश दिनांक 15/02/2016 रोजी देण्यात आलेला आहे. खालीलप्रमाणे 5 तालुक्यांना साठा नोंदवही तपासणी केली असता 45 दिवसानंतर पुरवठा झालेला आहे. पुरवठा दिनांक 31/03/2016 पर्यंत करणे आवश्यक असताना विलंबाने पुरवठा झाल्याने खर्चाची रक्कम रुपये 10,43,344/- च्या 3 टक्के दंड रक्कम रुपये 31,300/- वसूल करणेत यावी.

2) कृषी विभागाच्या सन 2015-2016 च्या लेखापरीक्षण कालावधीपर्यंत पंचायत समिती त्र्यंबकेश्वर तालुक्याकडील एकूण 85, पंचायत समिती, नाशिक 97 नग, पंचायत समिती, मालेगांव 86 नग, सुरगाणा 50 नग, दिंडोरी 149 नग सारायंत्र वाटपाअभावी शिल्लक असल्याचे आढळून आले.

3) नाशिक तालुक्याकडील सारायंत्राची मागणी नसूनही 106 नग पुरवठा केलेला आहे. मागणी नसताना पुरवठा करणे गंभीर अनियमितता आहे. त्यामुळे त्यांच्याकडे 106 नगापैकी फक्त 9 नगच वाटप केल्याचे दिसून येते व उर्वरीत 97 नग शिल्लक आहेत.

**3.607 जिल्हा परिषदसेस योजनेतून 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना ऑईल इंजिन पुरविणे.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** कृषी विभागामार्फत सन 2015-2016 मध्ये जिल्हा परिषदसेस योजनेतून 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना ऑईल इंजिन पुरविणे ही योजना राबविलेली आहे. सदरबाबत प्रमाणक क्रमांक 419, दिनांक 30/03/2016 अन्वये रक्कम रुपये 21,90,100/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेची नस्ती तपासणी केली असता कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ/2015/प्र.क्र.218/11अे, दिनांक 23/11/2015 मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक 8 नुसार औजारांची मागणी नोंदविल्या नंतर 45 दिवसांच्या कालावधी अवजारांचा पुरवठा करण्याची जबाबदारी पुरवठा संस्थांची राहील. 45 दिवसानंतर पुरवठा केलेल्या अवजारांच्या किंमतीच्या 3 टक्के रक्कम दंडात्मक वसूली पुरवठादाराकडून एकरकमी वसूल करणेत येईल. असे असताना पुरवठा आदेश दिनांक 31/12/2015 रोजी देण्यात आलेला आहे. खालीलप्रमाणे 4 तालुक्यांची साठा नोंदवही तपासणी केली असता 45 दिवसानंतर पुरवठा झालेला आहे. पुरवठा दिनांक 14/02/2016 पर्यंत करणे आवश्यक असताना विलंबाने पुरवठा झाल्याने खर्चाची रक्कम रुपये 10,16,400/- च्या 3 टक्के दंड रक्कम रुपये 30,492/- वसूल करणेत यावी.

2) कृषी विभागाच्या सन 2015-2016 च्या लेखा परीक्षण कालावधीपर्यंत पंचायत समिती त्र्यंबकेश्वर तालुक्याकडील एकूण 3 नग ऑईल इंजिन वाटपाअभावी शिल्लक असल्याचे आढळून आले.

**3.608 जिल्हा परिषदसेस योजनेतून 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना विदयुतपंप पुरविणे.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** कृषी विभागामार्फत सन 2015-2016 मध्ये जिल्हा परिषदसेस योजनेतून 50 टक्के अनुदानावर विदयुतपंप पुरविणे ही योजना राबविलेली आहे. सदरबाबत रक्कम रुपये 59,85,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, कळवणकडील किसन महादू गायकवाड, भांडणे तालुका कळवण यांना 5 एचपी मोटारचा दुबार लाभ देण्यात आलेला आहे. रक्कम रुपये 21,000/- संबंधितांकडून वसूल करुन अनुपालन दर्शवावे.

2) महाराष्ट्र कृषी विकास महामंडळ यांनी दिनांक 15/03/2016 पर्यंत मुदतवाढ मिळणेचे कारण तांत्रिक अडचणीमुळे पुरवठादाराचा करारनामा प्रक्रिया उशीराने होत असल्याने दिनांक 15/03/2016 पर्यंत मुदतवाढ मिळावी असे नमूद आहे. जिल्हा परिषदने पत्र क्रमांक 424-427/16 दिनांक 17/02/2016 रोजीचे पत्रानुसार मुदतवाढ देता येणार नाही, असे नस्तीमध्ये नमूद आहे. असे असताना सर्व तालुक्यांना दिनांक 05/02/2016 पर्यंत साहित्य मिळाल्याचे साठा रजिस्टरमध्ये नमूद आहे. याबाबत साहित्य वेळेवर पोहच झालेबाबत अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

3) चाचणी अहवालावर दिनांक नमूद नाही. यावरुन साहित्याची तपासणी कधी करण्यात आली? याची पडताळणी करता आली नाही.

4) शासन निर्णय दिनांक 23/11/2015 च्या अट क्रमांक 3 नुसार विदयुतपंपाचा पुरवठापूर्व गुणवत्ता तपासणी अहवाल पुरवठा संस्थेवर देणे बंधनकारक असताना तशी कार्यवाही केली नाही.

5) शासन निर्णय दिनांक 23/11/2015 च्या अट क्रमांक 4 नुसार साहित्य गटास पोच झालेनंतर कृषी आयुक्तालयाचे सन 2015-2016 चे मार्गदर्शक सूचनेनुसार वस्तूच्या गुणवत्ता बाबी तपासणी करुन दयावी. तशी कार्यवाही केलेली नाही.

6) शासन निर्णय दिनांक 23/11/2015 च्या अट क्रमांक 5 नुसार वस्तूची हमीपत्र सोबत जोडले नाही.

**3.609 ओटीएसपी अतंर्गत 100टक्के अनुदानावर इंजिन ऑईलवाटप योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 365, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 8,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जावक क्रमांक विप्र-7/आऊयो/अंतरिम मासु/16-16/ 209, दिनांक 11/04/2015 मधिल अट क्रमांक 4.7 अन्वये माहे जुन-2015 अखेर पावेतो लाभार्थी निवडीची प्रथम प्रक्रीया पुर्ण करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करणेत आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1089/प्रक्र.553/64/05, दिनांक 05/10/1989 नुसार योजनांचा लाभ मिळणाऱ्या लाभार्थ्यांचे गट स्तरावर मास्टर रजिष्टर ठेवणे आवश्यक असतांना विभागाने तशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. त्यामळे साहित्याचा, दुबार लाभ दिला किंवा कसे, याबाबत खात्री करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन अंतरिम मार्गदर्शक सुचना जा.क्र.विप्र-7/आउयो/अंतरिम मासु/15-16/209/2015 दिनांक 11/04/2015 अन्वेय अनुक्रमांक 6.6 नुसार एकूण मजूर निधी पैकी 3 टक्के निधी अपंग शेतकऱ्यांनासाठी राखून ठेवावा. परंतू, असे लाभार्थी प्रयत्न करुनही उपलब्ध न झाल्यास तसे आवश्यक अभिलेख संग्रही ठेऊन इतर आदिवासी शेतकऱ्यांना लाभ देण्यात यावा. तथापि, अशी कार्यवाही आढळून आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक आउयो-2415/प्र.क्र.217/4अे, दिनांक 03/06/2011 मध्ये सूचित केलेप्रमाणे योजनेचे मुल्यमापन त्रयस्त यंत्रणेकडून केलेले नाही. वैयक्तिक लाभार्थी निवडताना महिला लाभार्थ्यांना प्राधान्य दिलेबाबत व असे लाभार्थी उपलब्ध न झाल्यास इतर पात्र लाभार्थ्यांचा विचार करणे आवश्यक होते. तथापि, अशी कार्यवाही आढळून आली नाही.

5) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग शासन निर्णय क्रमांक सुकृऔ2015/प्र.क्र.218/11अे, दिनांक 23/11/2015 मधिल परीशिष्ठ क्रमांक 2 मधिल अनुक्रमांक 15 मध्ये नमुद केलेप्रमाणे अवजारांचा पुरवठा पुर्व गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर व लाभार्थ्यांना अवजारांचे प्रत्यक्ष वाटप केल्यानंतर 30 दिवसात औजारांच्या देयकाची 90 टक्के रक्कम पुरवठादारास प्रदान करणेत यावी व उर्वरीत 10 टक्के रक्कम औजारांचे क्षेत्रीय स्तरावरील गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर अदा करणेत यावी, असे स्पष्ट नमुद केलेले असतांना तालुकास्तरावर प्रत्यक्ष साहीत्य दिनांक 31/03/2016 रोजी प्राप्त असुन दिनांक 31/03/2016 रोजी वाटप केल्याच्या नोंदी असुन त्याच दिवशी 90 टक्के रक्कम पुरवठादार यांस प्रदान करणेत आलेली आहे.

6) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे याचे दिनांक 11/04/2015 नुसार परिशिष्ट क्रमांक 2 मधिल अट क्रमांक 8 अन्वये इंजिन ऑईल् या बाबीवर रूपये 20,000/- प्रति लाभार्थी अनुदान देय राहील प्रस्तुत लाभ हा रूपये 22,500/- एवढया रकमेचा दिलेला असुन एकूण 40 लाभार्थीकडुन प्रति लाभार्थी रूपये 2,500/- प्रमाणे लाभार्थी हिस्सा एकूण रक्कम रूपये 1,00,000/- वसुल केलेला असुन महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 50/4 नुसार प्राप्त रक्कमांबाबत नमुना नंबर 10 ची पावती संबधितांस देणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, यांचे कडील परीपत्रक क्रमांक परास/1096/ प्र.क्र.178/05, दिनांक 06/10/1997 नुसार योजनांतर्गत साहित्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात करणे आवश्यक असते. परंतु, या सुचनांची अंमलबजावणी झालेली दिसून आलेली नाही.

8) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग शासन निर्णय क्रमांक सुकृऔ2015/प्र.क्र.218/11अे, दिनांक 23/11/2015 मधिल परीशिष्ठ क्रमांक 2 मधिल अनुक्रमांक 8 मध्ये नमुद केले प्रमाणे अवजारांची मागणी नोंदविल्यानंतर 45 दिवसाच्या आत पुरवठा संस्थेने पुरवठा न केल्यास मागणी औजारांच्या किंमतीच्या 3 टक्के दंड सबंधित पुरवठादाराच्या देयकातुन वसुल करणे आवश्यक असतांना पुरवठा आदेश दिनांक 08/02/2016 रोजीचा असुन तालुकास्तरावर अवजारे दिनांक 31/03/2016 रोजी प्राप्त झालेली असुन

संबधित पुरवठादार यांचे कडुन एकूण औजारांची किंमत रुपये 8,00,000/- असुन त्यावरील 3 टक्के दंडाची रक्कम रूपये 24,000/- संबधित पुरवठादार यांचेकडुन वसुल करणेत यावी.

9) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तुमास/2002/प्र.क्र.78/कर1412, दिनांक 07/10/2013 अन्वये सदर योजनेची फलश्रुती व मुल्यमापन अहवाल घेतलेला नाही.

**3.610 आदिवासी उपयोजना (क्षेत्रांतर्गत) सुधारीत कृषी अवजारे व एचडीपीई पाईप पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदर बाबत 3 प्रमाणकान्वये रक्क्म रुपये 27,30,597/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स व्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्रमांक विघयो/1611/प्र.क्र112/4/ दिनांक 03/06/2011 नुसार राबविल्या जाणा-या योजनांची प्रसिध्दी पंचायत समिती कार्यालयात देऊन ती यादी web site वर सुध्दा प्रसिध्द करुन योजनेला व्यापक प्रसिध्दी देणे आवश्यक असताना तशी कार्यवाही विभागाने केल्याचे आढळून आले नाही.

2) शासन परिपत्रक ग्रामविकास विभाग क्रमांक 1089/प्र.क्र.55364, दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थींचे रजिस्टर ठेवणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही न करण्यात आल्याने साहित्य दुबार प्रदान न झालेबाबत खात्री करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास 1094/सीआर 2239/37/67, दिनांक 01/03/1993 मधी परिच्छेद क्रमांक 4 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना राबविल्यानंतर लाभ दिलेल्या लाभार्थींच्या स्थितीत काय सुधारणा झाली? याचा अहवाल सादर करणे बंधनकारक असतांना अशा प्रकारे अहवाल नस्तीसोबत आढळून आले नाही. तरी संबंधित लाभार्थ्याचे आर्थिक स्थितीचे अहवाल प्राप्त करुन झालेल्या स्थित्यंतराबाबत लेखापरीक्षणास अनुपालन दर्शवावे.

**3.611 अनुसूचित जाती उपयोजना (SCP) प्लास्टिक ताडपत्री पुरवठा करणे**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत रक्कम रूपये 26,33,305/- इतका खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ताडपत्री खेरेदी करण्यापुर्वी लाभार्थ्यांचे अर्ज मागवून अर्जाची छाननी करुन पात्र लाभार्थ्याच्या यादीस कृषी समितीची मंजुरी घेण्यात आलेली नाही. सबब कृषी समितीच्या मंजुरीशिवाय लाभार्थ्यांना ताडपत्रीची वाटप केलेले आहे. तरी लाभार्थी यादीस कृषी समितीची मंजुरी घेण्यात यावी.

2) पुरवठा करणेत येणा-या ताडपत्रीची आय एस आय प्रमाणत्राची प्रत पुरवठा करणेपुर्वी कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांना सादर करणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे कडील परिपत्रक क्रमांक झेपीए/2008/प्रक्र446 वित्त 9, दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येणा-या योजनांचे नियोजन व अंमलबजावणी विशिष्ट मुदतीत पूर्ण करणेबाबत वेळापत्रक निर्देशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार निर्देशित वेळापत्रकाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी झाल्याचे दिसून येत नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83 (3) नुसार गुणवत्ता चाचणी प्रमाणपत्र घेतलेले नाही.

5) कृषी पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स व्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्रमांक विघयो/1611/प्र.क्र112/4/ दिनांक 03/06/2011 नुसार राबविल्या जाणा-या योजनांची प्रसिध्दी पंचायत समिती कार्यालयात देऊन ती यादी इंटरनेटवर सुध्दा प्रसिध्द करुन योजनेला व्यापक प्रसिध्दी देणे आवश्यक असताना तशी कार्यवाही विभागाने केल्याचे आढळून आले नाही.

6) ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1089/प्र.क्र.55364, दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थीचे रजिस्टर ठेवणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही न करण्यात आल्याने साहित्य दुबार प्रदान न झालेबाबत खात्री करता आली नाही.

7) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स व्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्रमांक विघयो/ 1204/ प्रक्र284/ 16 ए, दिनांक 13/08/2008 अन्वये अपंग व्यक्ती (समान संधी हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम 1995 व महाराष्ट्रातील अपंग व्यक्ती (समान संधी हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) नियम 2001 नुसार कृषी विभागाकडून राबविण्यात येणा-या योजनांतर्गत एकुण लाभधारक शेतक-यांपैकी 3 टक्के अपंग शेतक-यांना योजनेचा लाभ देणेबाबत कार्यवाही केलेली नसून 3 टक्के अपंग शेतक-यांना लाभ देण्यात आलेला नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास1094/सीआर 2239/37/67, दिनांक 01/03/1993 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना राबविल्यांनंतर लाभ दिलेल्या लाभार्थीच्या स्थितीत काय सुधारणा झाली? याचा अहवाल सादर करणे बंधनकारक असतांना अशा प्रकारे अहवाल नस्तीसोबत आढळून आले नाही. तरी संबंधित लाभार्थ्याचे आर्थिक स्थितीचे अहवाल प्राप्त करुन झालेल्या स्थित्यंतराबाबत लेखापरीक्षणास अनुपालन दर्शवावे.

**3.612 अनुसूचित जाती उपयोजना (SCP) प्लास्टिक ताडपत्री पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 160, दिनांक 30/03/2016 अन्वये रक्क्म रुपये 39,88,990/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी अवजारे खेरेदी करणयापुर्वी लाभार्थ्यांची अर्ज मागवून अर्जाची छाननी करुन पात्र लाभार्थ्याच्या यादीस कृषी समितीची मंजुरी घेण्यात आलेली नाही. सबब कृषी समितीच्या मंजुरीशिवाय लाभार्थ्याना कृषी अवजारे वाटप केलेले आहे. तरी लाभार्थी यादीस कृषी समितीची मंजुरी घेण्यात यावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे कडील परिपत्रक क्रमांक झेपीए/2008/प्रक्र446 वित्त 9, दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येणा-या योजनांचे नियोजन व अंमलबजावणी विशिष्ट मुदतीत पूर्ण करणेबाबत वेळापत्रक निर्देशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार निर्देशित वेळापत्रकाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी झाल्याचे दिसून येत नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83 (3) नुसार गुणवत्ता चाचणी प्रमाणपत्र घेतलेले नाही.

4) कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स व्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्रमांक विघयो/1611/प्र.क्र112/4/ दिनांक 03/06/2011 नुसार राबविल्या जाणा-या योजनांची प्रसिध्दी पंचायत समिती कार्यालयात देऊन ती यादी web site वर सुध्दा प्रसिध्द करुन योजनेला व्यापक प्रसिध्दी देणे आवश्यक असताना तशी कार्यवाही विभागाने केल्याचे आढळून आले नाही.

5) शासन परिपत्रक ग्रामविकास विभाग क्रमांक 1089/प्र.क्र.55364, दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थीचे रजिस्टर ठेवणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही न करण्यात आल्याने साहित्य दुबार प्रदान न झालेबाबत खात्री करता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स व्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्रमांक विघयो/1204/प्रक्र284/16 ए, दिनांक 13/08/2008 अन्वये अपंग व्यक्ती (समान संधी हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम 1995 व महाराष्ट्रातील अपंग व्यक्ती (समान संधी हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) नियम 2001 नुसार कृषी विभागाकडून राबविण्यात येणा-या योजनांतर्गत एकुण लाभधारक शेतक-यांपैकी 3 टक्के अपंग शेतक-यांना योजनेचा लाभ देणे बाबत कार्यवाही केलेली नसून 3 टक्के अपंग शेतक-यांना लाभा देण्यात आलेला नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास1094/सीआर 2239/37/67, दिनांक 01/03/1993 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना राबविल्यानंतर लाभ दिलेल्या लाभार्थीच्या स्थितीत काय सुधारणा झाली? याचा अहवाल सादर करणे बंधनकारक असतांना अशा प्रकारे अहवाल नस्तीसोबत आढळून आले नाही. तरी संबंधित लाभार्थ्याचे अर्थिक स्थितीचे अहवाल प्राप्त करुन झालेल्या स्थित्यंतराबाबत लेखापरीक्षणास अनुपालन दर्शवावे.

**3.613 आदिवासी उपयोजना ( क्षेत्राअंतर्गत ) तुषार संच खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** कृषी विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार यांचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणा दरम्यांन कृषी विभागाकडील आदिवासी उपयोजना (क्षेत्राअंतर्गत) जिल्हा परिषद स्तरावरुन लाभार्थी शेतक-यांसाठी तुषार संच खरेदी झालेली असून एकूण 37 संच प्रति संच रूपये 21,763.35/- याप्रमाणे जिल्हा परिषद स्तरावर झालेली असून रूपये 8,05,244/- एवढया किंमतीस खरेदी करण्यांत आलेले आहेत. उपरोक्तं प्रकरणी खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

1) अतिरिक्तं मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नंदुरबार यांच्या पुरवठा आदेशातील अटी व शर्तीमध्ये नमूद केल्याप्रमाणे तुषांर संच फीटींग केल्यानंतर 3 वर्षापर्यंत सुरु राहणेबाबत संबंधित पुरवठादाराने स्टॅम्पं पेपरवर लेखी हमी पत्र लिहून देणे आवश्यक असतांना विभागाने संबंधीत पुरवठादार संस्थेकडून लेखी हमी घेतलेली नाही. सदर प्रकरणी संबंधीत पुरवठादार संस्थेकडून हमी पत्र का लिहून घेण्यांत आले नाही? याबाबत विभागाने खुलासा सादर करणे आवश्यक आहे.

2) लाभार्थी निवड यादी पंचायत समिती / गटस्तरावर असल्यामुळे लाभार्थी निवड योग्यं प्रकारे झालेली आहे किंवा कसे? याबाबतची पडताळणी लेखापरिक्षणास करता आली नाही.

3) तसेच शासन निर्ण्य दिनांक 04/06/2014 मधील परिशिष्टं क्रमांक 2 मधील परिच्छेद क्रमांक 13 मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदरचे तुषार संच हे आय एस आय मार्कचेच असणे आवश्यक असतांना सदरचे संच आय एस आय मार्कचेच असल्याबाबत कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी तपासणी केल्याबाबतची कागदपत्रे संबंधित नस्तीसोबत आढळून आलेले नाही. त्यामुळे सदरचे तुषार संच हे आय एस आय मार्कचेच असल्याबाबत विभागाने लेखा परिक्षणास खात्री पटवावी.

**3.614 आदिवासी उपयोजना (क्षेत्राअंतर्गत) एचडीपीई पाईप खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** कृषी विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार यांचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणा दरम्यांन कृषी विभागाकडील आदिवासी उपयोजना (क्षेत्राअंतर्गत) जिल्हा परिषद स्तरावरुन एचडीपीई पाईपांची खरेदी झालेली असून त्यापैकी नवापूर तालुक्यातील 900 आदिवासी लाभार्थ्यांसाठी एकूण 2700 एचडीपीई पाईप (6 मिटर लांबीचा ) प्रति पाईप रूपये 470/- प्रमाणे रूपये 4,23,000/- एवढा खर्च झालेला आहे आणि जिल्हा स्तरावर एकूण 27,000 पाईपांची प्रति पाईप रुपये 470/- प्रमाणे खरेदीसाठी एकूण रक्कम रुपये 1,26,90,000/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

1) लाभार्थी प्रस्ताव सर्व गटस्तरावर / पंचायत समिती स्तरावर असल्यामुळे कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक वि प्रं-7/आयुयो/अंतरिम/मासु/14-15/460/2014, दिनांक 06/05/2014 मध्ये नमूद केलेल्या निकषानुसारच लाभार्थी निवड झालेली आहे किंवा कसे? याबाबतची खात्री लेखापरिक्षणांस करता आली नाही.

2) तसेच सदरच्या पत्रांत नमूद केल्याप्रमाणे संबंधित लाभार्थ्यांना सदर साहित्याचा जुलै ते ऑक्टोबर महिन्यांतच देणे आवश्यक आहे, असे नमूद केले आहे. परंतु, विभागाने जिल्हास्तरावर कृषी अवजारे / साहित्यं साठा नोंदवही नमुना नंबर-33 ठेवण्यांत आलेली नसल्यामुळे सदरचे एचडीपीई पाईप पुरवठा आदेश दिल्यानंतर पुरवठा संबंधीत तालुक्यातील गटविकास अधिकारी पंचायत समिती स्तरावर कधी पोच केला व संबंधीत गटविकास अधिकारी

संबंधीत लाभार्थ्यांना सदर पाईपांचा पुरवठा कधी केलेला आहे किंवा कसे? याची पडताळणी लेखापरिक्षणास करता आली नाही.

3) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-5 यांच्या दिनांक 06/05/2014 मधील मार्गदर्श्क सूचना क्रमांक-8 मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदर योजनेअंतर्गत निवड करण्यांत येणा-या प्रत्येक लाभार्थ्यासाठी योजना राबवितांना योजना राबविण्यांचा कालावधी दोन आर्थिक वर्षाचा राहील म्हणजेच लाभार्थीची निवड झालेले आर्थिक वर्ष व त्यापुढील आर्थीक वर्ष अशा दोन वर्षाच्या कालावधीत लाभ देणे आवश्यक राहिल. तेव्हा मागील आर्थीक वर्षात अपूर्ण लाभ दिलेल्या लाभार्थ्याचा उर्वरित लाभ परिपूर्ण लाभ देवून प्रकरणे प्रलंबीत राहाणार नाहीत आणि प्रस्तुत कालावधीतच संपुर्ण लाभ देण्याचे दृष्टीने नियोजन व अंमलबजावणी करावी, असे उपरोक्त पत्रामध्ये नमूद केलेले आहे. सदर प्रकरणी विभागाने अदयायावत साठा नोंदवही ठेवलेली नसल्यामुळे सदर प्रकरणी कृषी आयुक्तालयाचे दिनांक 06/05/2014 मधील मार्गदर्शक सूचनेनुसारच करण्यांत आलेली आहे किंवा कसे? याबाबतची पडताळणी करण्यासाठी संबंधीत गटविकास अधिकारी पंचायत समिती स्तरावरील मागील आर्थिक वर्षातील लाभार्थ्यांची कृषी योजनेअंतर्गत कोणत्या लाभार्थ्याला कोणत्या वर्षात कोणत्या कृषी अवजारांचा लाभ देण्यांत आलेला आहे? याबाबतच्या नोंदवहया तपासण्यासाठी लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देणेबाबत विभागाकडे अनेकवेळा तोंडी सूचना व मागणी करुन सुध्दा सदर नोंदवहया लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या नाहीत. त्यामुळे योजनेची अंमलबजाणी उपरोक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनुसारच कार्यवाही करण्यांत आलेली आहे किंवा कसे? याबाबत लेखापरिक्षणास पडताळणी करता आली नाही.

4) योजनेअंतर्गत निवड झालेला लाभार्थी अर्थसहाय्याचा दुरुपयोग करणार नाही. यासाठी योजना राबविणाऱ्या अधिका-यांनी वेळोवेळी भेटी देऊन तपासणी करणे आवश्यक आहे. तसेच लाभार्थी तपासणीत दिलेल्या भेटीची नोंद त्यांनी त्यांच्या दौरा दैनंदिनी नोंदविणे आवश्यक आहे. याबाबतदेखील विभागाने कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

5) कृषी आयुक्तालय, पुणे-5 यांच्या दिनांक 06/05/2014 सोबतच्या मार्गदर्शक सूचना क्रमांक-13 मध्ये नमूद केल्यानुसार सदर योजनेचा मासिक प्रगति अहवाल विहित प्रपत्र क्रमांक-1 (अ) आणि 1 (ब) मध्ये प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेपर्यंत कृषी अयुक्तालय व प्रकल्प अधिकारी एकात्मीक आदिवासी विकास विभाग यांनी नियमित पाठविणे आवश्यक असतांना विभागाने याबाबत देखील कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

6) सदर योजनेची तपासणी जिल्हा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) यांनी सर्व पंचायत समितीमध्ये संख्येच्या समप्रमाणांत 5 टक्के तपासणी करणे आवश्यक असतांना तशी तपासणी केल्याबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत आढळून आली नाहीत आणि कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी तपासणीचा अहवाल विहित नमुन्यातील प्रपत्र क्रमांक-2 मध्ये कृषी आयुक्तालयांस दर महिन्याच्या 10 तारखेपर्यंत सादर करणेबाबत मार्गदर्शक सुचना क्रमांक 14(4) मध्ये नमूद असतांना तशी देखील कार्यवाही विभागाकडून करण्यांत आलेली नाही.

**3.615 जिल्हा परिषदसेसमधून शेतक-यांना 50 टक्के अनुदानावर एचडीपीई पाईप पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा परिषद सेसमधून 50 टक्के अनुदानावर एचडीपीई पाईप पुरविणे योजनेबाबत प्रमाणक क्रमांक 166, दिनांक 23/12/2015 अन्वये रक्कम रुपये 13,99,895/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एचडीपीई पाईप मागणी नोंदविणे पूर्वी ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1069/555, दिनांक 05/09/1989 आणि परास-1098/प्र.क्र.73/34 दिनांक 20/10/1999 अन्वये वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना लाभार्थी निवड पध्दती ठरवून दिलेली आहे. त्या निवडीनंतर प्रपत्र अ मध्ये नोंदवही ठेवून लाभार्थी निवड यादी नमूद करुन पंचायत समिती स्तरावरील सभेत गटविकास अधिकारी यांचेमार्फत निवड करुन सर्व पंचायत समितीमार्फत लाभार्थ्यांची यादी, मागणी साहित्याची मेक घेवून त्या प्रमाणातच पुरवठा आदेश देणे आवश्यक असताना मागणी मोघमपणे नोंदविलेचे दिसून आलेले आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.46/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेची निवड प्रशासकीय, तांत्रिक मान्यता, निविदा प्रक्रिया, लाभार्थी निवड, साहित्य खरेदी वाटप इ. चे नियोजन अंमलबजावणी नियोजित वेळापत्रकानुसार करणेत आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1084/सीआर-1633, दिनांक 19/01/1985 अन्वये वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना लाभार्थी हिस्स्याची रक्कम प्रथम वसूल करुन नंतरच साहित्य खरेदी, पुरवठा, लाभार्थ्यांना वाटप करणे आवश्यक असताना, एचडीपीई पाईप वाटपावेळी लाभार्थी हिस्स्याची रक्कम वसूल केलेली असून जसजसे साहित्य वाटप होईल तसतसे पुरवठादारास लाभार्थी हिस्सा रक्कम प्रदान केलेली आहे.

4) गटस्तरावर एचडीपीई पाईप वाटप झालेनंतर निवडीचे प्रस्ताव तपासताना अटी-शर्तीनुसार काही लाभार्थ्यांची निवड झालेली नसून त्यांचे एचडीपीई पाईप प्रस्तावासोबतची कागदपत्रे अटी-शर्तीनुसार नाहीत. चुकीच्या लाभार्थी निवडीमुळे संबंधीताकडून लाभाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन परिपत्रक एयुडी-2001/प्र.क्र.2340/30, दिनांक 07/03/2001 अन्वये नियोजनाअभावी चुकीचा लाभार्थी निवड झाल्यास लाभार्थ्याकडून लाभाची रक्कम वसूल करताना प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांचेवरही जबाबदारी निश्चीत करुन रक्कम वसूलीची कार्यवाही आवश्यक आहे.

5) एचडीपीई पाईप जिल्हा परिषद कृषि विभागाने त्रयस्थ यंत्रणेकडून / शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय यांचेकडून तपासणी केले बाबत चाचणी अहवाल लेखापरीक्षणाला सादर केलेले नसल्याने स्पेसिफिकेशन नुसार साहित्य प्राप्त झाल्याची, दर्जाची खात्री, सत्यता लेखापरीक्षणाला पटत नाही. महाराष्ट्र शासन, कृषि व पदूम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 13/प्र.क्र.158/11 अे, दिनांक 27/09/2013 मधील अ.क्र.11 प्रमाणे रॅडम तपासणी टक्केवारी प्रमाणे केलेचे दिसून आलेले नाही.

6) पंचायत राज संस्थामार्फत जिल्हा परिषद स्तरावर खरेदी केलेल्या साहित्याची विक्रीपश्चात हमी दुरुस्ती करीता करारनामा करतांना मुंबई मुद्रांक अधिनिरयम 1958 कलम 34 अन्वये, “महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2009/प्र.क्र.514/वित्त 9, दिनांक 20/11/2009” प्रमाणे कार्य करारात नमुद केलेली रक्कम 10,00,000/- पेक्षा अधिक असेल तर पुढील एक लाखा करीता रूपये 100/- प्रमाणे मुंद्रांक शुल्कावर करारनामा करणे आवश्यक असतांना करारनामा न केल्याने रक्कम रूपये 1,900/- मुद्रांक शुल्काची संबधीताकडून वसुल करुन शासकीय लेखाशिर्षात भरणा करणे आवश्यक आहे.

7) संबंधीत पुरवठदाराकडून महाराष्ट्र शासन, कृषी, पदम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2013/प्र.क्र.158/11 अे, दिनांक 27/09/2013 उशिराने साहित्याचा पुरवठा केलेला असलेने प्रति आठवडा विलंबाने साहित्याच्या किमतीवर 3 टक्के दंडनीय रक्कम 75,181/- वसूल करुन जिल्हा परिषद सेस मध्ये भरणा करणेत यावी.

**3.616 जिल्हा परिषदसेसमधून शेतक-यांना 50 टक्के अनुदानावर बॅटरी ऑपरेटर नॅपसॅक स्प्रे पंप पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा परिषद सेसमधून 50 टक्के अनुदानावर बॅटरी ऑपरेटर नॅपसॅक स्प्रे पंप पुरविणे योजनेबाबत प्रमाणक क्रमांक 167, दिनांक 23/12/2015 अन्वये रक्कम रुपये 14,98,245/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बॅटरी ऑपरेटर नॅपसॅक स्प्रे पंप मागणी नोंदविणेपूर्वी ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1069/555, दिनांक 05/09/1989 आणि पंरास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 अन्वये वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना लाभार्थी निवड पध्दती ठरवून दिलेली आहे. त्या निवडीनंतर प्रपत्र अ मध्ये नोंदवही ठेवून लाभार्थी निवड यादी नमूद करुन पंचायत समिती स्तरावरील सभेत गटविकास अधिकारी यांचेमार्फत निवड करुन सर्व पंचायत समितीमार्फत लाभार्थ्यांची यादी, मागणी साहित्याची मेक घेवून त्याप्रमाणातच पुरवठा आदेश देणे आवश्यक असताना बॅटरी ऑपरेटर नॅपसॅक स्प्रे पंपची मागणी मोघमपणे नोंदविलेचे दिसून आलेले आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1084/सीआर-1633, दिनांक 19/01/1985 अन्वये वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना लाभार्थी हिस्स्याची रक्कम प्रथम वसूल करुन नंतरच साहित्य खरेदी, पुरवठा, लाभार्थ्यांना वाटप करणे आवश्यक असताना, बॅटरी ऑपरेटर नॅपसॅक स्प्रे पंप वाटपावेळी लाभार्थी हिस्स्याची रक्कम वसूल केलेली असून जसजसे साहित्य वाटप होईल तसतसे पुरवठादारास लाभार्थी हिस्सा रक्कम प्रदान केलेली आहे.

3) गटस्तरावर बॅटरी ऑपरेटर नॅपसॅक स्प्रे पंप वाटप झालेनंतर निवडीचे प्रस्ताव तपासताना अटी-शर्तीनुसार काही लाभार्थ्यांची निवड झालेली नसून त्यांचे बॅटरी ऑपरेटर नॅपसॅक स्प्रे पंप प्रस्तावासोबतची कागदपत्रे अटी-शर्तीनुसार नाहीत. चुकीच्या लाभार्थी निवडीमुळे संबंधीताकडून लाभाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक एयुडी-2001/प्र.क्र.2340/30, दिनांक 07/03/2001 अन्वये नियोजनाअभावी चुकीचा लाभार्थी निवड झाल्यास लाभार्थ्याकडून लाभाची रक्कम वसूल करताना प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांचेवरही जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसूलीची कार्यवाही आवश्यक आहे.

4) बॅटरी ऑपरेटर नॅपसॅक स्प्रे पंप जिल्हा परिषद कृषि विभागाने त्रयस्थ यंत्रणेकडून / शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय यांचेकडून तपासणी केले बाबत चाचणी अहवाल लेखापरीक्षणाला सादर केलेले नसल्याने स्पेसिफिकेशन नुसार साहित्य प्राप्त झाल्याची, दर्जाची खात्री ,सत्यता लेखापरीक्षणाला पटत नाही. महाराष्ट्र शासन, कृषि व पदूम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 13/प्र.क्र.158/11 अे, दिनांक 27/09/2013 मधील अ.क्र.11 प्रमाणे रॅडम तपासणी टक्केवारी प्रमाणे केलेचे दिसून आलेले नाही.

5) करारनामा न केल्याने रक्कम रूपये 2,100/- मुद्रांक शुल्काची रक्कम संबधीताकडून वसुल करुन शासकीय लेखाशिर्षात भरणा करणे आवश्यक आहे.

6) पुरवठदाराकडून महाराष्ट्र शासन, कृषी, पदम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2013/प्र.क्र158/11 अे, दिनांक 27/09/2013 उशीराने बॅटरी ऑपरेटर नॅपसॅक स्प्रे पंप पुरवठा केलेला असलेने प्रति आठवडा विलंबाने बॅटरी ऑपरेटर नॅपसॅक स्प्रे पंप नग पुरवठा नग किमतीवर 3 टक्के दंडनीय रक्कम 89,894/- वसूल करुन जिल्हा परिषदसेसमध्ये भरणा करणेत यावी.

**3.617 जिल्हा परिषद सेस फंड योजना सन 2015-16 अंतर्गत 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना हुक जॉइंट कॅनव्हास ताडपत्री पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** कृषी विभाग, जिल्हा परीषद अहमदनगरने जिल्हा परिषद सेस फंड योजना सन 2015-2016 अंतर्गत 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना हुक जॉइंट कॅनव्हास ताडपत्री पुरवठा केलेला आहे. सदरबाबत रक्कम रुपये 39,98,981/- खर्च करण्यात आला आहे. सदर योजनेत खालील नमूद केलेप्रमाणे अनियमितता आढळून आल्या.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/ प्र.क्र**.**446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्यासाठी वार्षिक नियोजन कालावधी निश्चित केलेला आहे. त्यानुसार प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.

2) ताडपत्री पुरवठा करतांना प्रथम लाभार्थी निवडची प्रकिया न करता अंदाजांनी मागणी केल्याचे दिसून येते.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1084/सीआर1633 दिनांक 19/01/1985 अन्वये वैयक्तीक लाभाच्या योजना राबविताना लाभार्थी हिस्सा प्रथमत: वसूल करुन नंतरच योजना राबवावी. असे असताना विभागाने लाभार्थी हिस्सा रक्कम साहित्य वाटपाचे वेळी वसूल केली असून जशी वसूली होईल, त्याप्रमाणे पुरवठादारास रक्कमा प्रदान केलेल्या आहेत.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1089/प्र.क्र.565/34, दिनांक 05/10/1989 व दिनांक 02/09/1993 अन्वये मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु, विभागाने याप्रमाणे नोंदवही ठेवलेली नाही.

5) शासनमान्य संस्थेकडील साहित्य तपासणी अहवाल लेखापरिक्षण पडताळणीस प्राप्त झाला नाही.

6) लाभार्थी हिस्सा 50 टक्के रक्कमा जमा केल्याबाबत चलने पडताळणीस उपलब्ध झाली नाहीत.

7) सदर योजनेबाबत उपयोगिता प्रमाणपत्र तपासणीस उपलब्ध झाले नाहीत.

8) तालुका स्तरावर शिल्लक साठा त्वरीत संबंधीत लाभार्थ्यांना वितरीत करुन पूर्तता दर्शवावी.

9) पंचायत समिती, कर्जत, पारनेरकडील साठा नोंदवहया व इतर अनुषंगीक अभिलेखे लेखापरिक्षण तपासणीस उपलब्ध झाले नाही.

**3.618 जिल्हा परिषद सेस शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर कडबाकुट्टी यंत्र पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** कृषी विभाग, जिल्हा परीषद अहमदनगरने जिल्हा परिषद सेस फंड योजना सन 2015-2016 अंतर्गत 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना कडबाकुट्टी यंत्र पुरवठा केलेला आहे. सदरबाबत प्रमाणक क्रमांक 503, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 99,87,803/- खर्च करण्यात आला आहे. सदर योजनेत खालील नमूद केलेप्रमाणे अनियमितता आढळून आल्या.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्र.446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्यासाठी वार्षिक नियोजन कालावधी निश्चित केलेला आहे. त्यानुसार प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.

2) पुरवठा करतांना प्रथम लाभार्थी निवड निश्चित न करता पुरवठा करण्यात आल्याचे दिसून येते.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1084/सीआर 1633, दिनांक 19/01/1985 अन्वये वैयक्तीक लाभाच्या योजना राबविताना लाभार्थी हिस्सा प्रथमत: वसूल करुन नंतरच योजना राबवावी. असे असताना विभागाने लाभार्थी हिस्सा रक्कम साहित्य वाटपाचे वेळी वसूल केली असून जशी वसूली होईल, त्याप्रमाणे पुरवठादारास रक्कमा प्रदान केलेल्या आहेत.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1089/प्र.क्र.565/34, दिनांक 05/10/1989 व दिनांक 02/09/1993 अन्वये मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतू, विभागाने याप्रमाणे नोंदवही ठेवलेली नाही.

5) करारनामा योग्य रकमेच्या स्टँप पेपरवर केलेला नाही.

6) पंचायत समिती, कर्जत, पारनेरकडील साठा नोंदवहया व इतर अनुषंगीक अभिलेखे लेखापरिक्षण तपासणीस उपलब्ध झाले नाही.

7) तसेच तालुका स्तरावर शिल्लक साठा त्वरीत संबंधीत लाभार्थ्यांना वितरीत करुन पूर्तता दर्शवावी.

8) सदर योजनेबाबत उपयोगिता प्रमाणपत्र तपासणीस उपलब्ध झाले नाही.

**3.619 आदिवासी क्षेत्राबाहेरील शेतक-यांना (ओ.टी.एस.पी) योजनेतुन दिलेल्या लाभातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर कामावर 6 प्रमाणकान्वये रक्कम रूपये 45,66,233/- खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रथम 4 प्रमाणकांबाबत शासन आदेश परिपत्रक दिनांक 20/03/2007 अन्वये दिनांक 15 फेब्रुवारी नंतर कोणत्याही प्रकारची खरेदी करण्यात येऊ नये, असे शासन आदेश आहेत. तथापि, प्रस्तुत प्रकरणी 15 फेब्रुवारी नंतर पुरवठा आदेश देऊन खरेदी करण्यात आलेली असल्याने शासन आदेशाचे पालन झाल्याचे दिसून येत नाही. तसेच योजना व खर्चाचे व्यवस्थित नियोजन झाले असते तर खरेदी 15 फेब्रुवारी पूर्वी करता आली असती.

2) प्रथम 4 प्रमाणकांबाबत योजनेच्या मार्गदर्शन सुचनेप्रमाणे लाभार्थ्याची निवड जुन 2014 अखेर होणे आवश्यक असताना निवड जुन 2014 नंतर झालेली दिसते.

3) प्रथम 4 प्रमाणकांबाबत ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1093/प्र.क्र.1239, दिनांक 01/09/2013 नुसार संबंधीत वित्तीय वर्षातच साहित्याची खरेदी व वाटप करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली नाही.

4) प्रथम 4 प्रमाणकांबाबत योजनेच्या मार्गदर्शन सुचनेतील 6.6 नुसार एकुण मंजुर निधीपैकी 3 टक्के निधी आदिवासी अपंग शेतकऱ्यांसाठी राखुन ठेवावा. परंतु, असे लाभार्थी प्रयत्न करुनही उपलब्ध झाले नाहीत, तर त्याबाबत आवश्यक अभिलेख संग्रही ठेऊन इतर अधिवासी शेतक-यांना लाभ देण्यात यावा, असे असताना तशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

5) अनुक्रमे 5 व 6 प्रमाणकांबाबत दर करारातील अट क्रमांक 2 नुसार महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महामंडळ या शासन नियुक्त पुरवठा संस्थेने पुरवठा केलेल्या औजारांची गुणवत्ता तपासण्यासाठी त्यांची स्वत:ची गुणवत्ता नियंत्रण यंत्रणा निर्माण करणे आवश्यक राहीत. पुरवठा संस्थेने कृषी औजारांची पुरवठा पुर्व व पुरवठा पश्चात गुणवत्ता तपासणी करुन त्याचे क्षेत्रिय स्तरावर अभिलेखे ठेवणे व आवश्यकतेनुसार आयुक्तालय व शासनास सादर करणे बंधणकारक राहीत, असे असतानासुध्दा पुरवठा पश्चात गुणवत्ता तपासणी प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1093/ प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार गावनिहाय व लाभार्थी निहाय तसेच प्रवंगनिहाय व कुटुंबनिहाय नोंदवही तालुकास्तरावर ठेवून लाभार्थीला लाभ दिलेनंतर त्या नोंदवहीमध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे. म्हणजे एकाच कुटुंबात दुबार लांभ दिला जाणार नाही. परंतु, याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

7) कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक विघयो/1608/ प्र.क्र.100/4अ, दिनांक 21/04/2009 अन्वये तसेच मार्गदर्शक सुचनांप्रमाणे स्थानिक लोकसंख्येच्या विचारानुसार एकुण लाभार्थीपैकी 30 टक्के लाभ महिलांना देण्यात यावा, असे असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**3.620 अभिकरण शुल्क येणेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत. कृषि विभाग, जिल्हा परिषद, पुणे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणाचे वेळी अभिकरण शुल्क वसुलीच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता कृषि विभाग, जिल्हा परिषद, पुणे यांना अर्धसमास पत्र क्रमांक 13, दिनांक 30/05/2017 अन्वये खुलासा मागविला असता कोणतेही उत्तर प्राप्त न झालेमुळे खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्राविवि/1099/50/क्र. 3458104, दिनांक 29/05/1999 नुसार अभिकरण तत्वावर जिल्हा परिषदेमार्फत ज्या योजना राबविण्यात येतात, त्यामध्ये एस. सी. पी. ही योजना देखील राबविण्यात येते. या योजनेतुन वरील शासन निर्णयानुसार सन सन 1973-74 ते 1998-99 पर्यंत चालविण्यात आलेल्या योजनेच्या अनुदानातुन 1 टक्के रकमा अभिकरण शुल्कात भरणे आवश्यक होते. त्यानुसार कार्यवाही झालेली नसल्यामुळे सन 1973-74 ते 1998-99 पर्यंत 1 टक्के अभिकरण शुल्कापोटी जिल्हा परिषद अभिकरणात रक्कम रुपये 13,81,115/- येणे बाकी आहे.

तसेच सन 1999-2000 ते 2015-2016 पासुन 5 टक्के अभिकरण शुल्क देय आहे. त्यापैकी 4 टक्के रक्कम अनुदान प्राप्त होताच कपात करुन घेण्यात येते. उर्वरित 1 टक्के रक्कम रुपये 3,99,634/- लेखापरीक्षण व अनुदान निर्धारण झालेनंतर देय आहे.

**3.621 शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर 5 एचपी ओपनवेल विद्युत पंप संच पुरविणे.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 28, दिनांक 07/12/2015 अन्वये रक्कम रुपये 33,10,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार पंचायत समिती उपकर निधीच्या योजना राबविण्यासाठी वेळापत्रक निश्चित केलेले आहे. त्यानुसार दिनांक 30 जुनपर्यंत प्रस्ताव स्विकृती, 30 सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव मंजूरी व जानेवारीअखेर लाभार्थ्यांस साहित्य वितरण करण्याच्या सुचना आहेत. प्रस्तुत प्रकरणी वेळापत्रकाचे पालन झालेले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1988 नुसार लाभार्थी हिश्याची रक्कम प्रथम वसुल केल्याशिवाय साहित्य खरेदी करु नये, अशा स्पष्ट सुचना असतांना त्याप्रमाणे सदर योजनेच्या बाबतीत पंचायत समितीने कार्यवाही केलेली नाही.

3) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर योजनेस दिनांक 08/09/2015 रोजी तांत्रिक मान्यता दिलेली आहे. तथापि, सदर मान्यतेमध्ये लाभार्थी पात्रतेसंबंधी अटी / शर्ती नमूद नाहीत. अटी / शर्ती नमूद नसलेने पात्र लाभार्थींच्या निकषासंबंधी पडताळणी करता आली नाही.

4) सदर योजना लाभार्थी हिश्यासह एकूण रुपये 67,33,000/- एवढ्या रक्कमेची असून महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 31/01/2013 अन्वये जिल्हा परिषद सभेची प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. विभागाने तशी मान्यता न घेता स्थायी समितीची मान्यता घेतलेली आहे.

5) महाराष्ट्र शासन, कृषी विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ/2013/प्र.क्र.158/11अे, दिनांक 27/09/2013 सोबत जोडलेल्या प्रपत्र 2 मधील मार्गदर्शक सुचना 12 नुसार कृषी विद्यापीठांनी पुरवठापश्चात गुणवत्ता तपासणी करुन देणे बंधनकारक राहील, असे नमूद आहे. त्याप्रमाणे पुरवठापश्चात तपासणी अहवाल नस्तीसोबत उपलब्ध नाहीत.

6) पुरवठादार संस्थेने जिल्हयातील 11 पंचायत समितींना डिलीव्हरी चलन क्रमांक 24101 ते 24111 नुसार दिनांक 23/10/2015 रोजी एकाच दिवशी साहित्याचा पुरवठा केलेला आहे. कृषी विभागाच्या दिनांक 27/09/2013 रोजीचे शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्राप्त 2 मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक 11 नुसार रँडम पध्दतीने करावयाच्या तपासणीबाबत टक्केवारी नमूद केली आहे. त्याप्रमाणे विभागाने कार्यवाही केलेली नाही.

**3.622 50 टक्के अनुदानावर 5 एचपी डिझेल इंजिन पुरविणे.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 127, दिनांक 24/02/2016 अन्वये रक्कम रुपये 9,98,250/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार पंचायत समिती उपकर निधीच्या योजना राबविण्यासाठी वेळापत्रक निश्चित केलेले आहे. त्यानुसार दिनांक 30 जुनपर्यंत प्रस्ताव स्विकृती, 30 सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव मंजूरी व जानेवारी अखेर लाभार्थ्यांस साहित्य वितरण करण्याच्या सुचना आहेत. प्रस्तुत प्रकरणी वेळापत्रकाचे पालन झालेले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1988 नुसार लाभार्थी हिश्याची रक्कम प्रथम वसुल केल्याशिवाय साहित्य खरेदी करु नये, अशा स्पष्ट सुचना असतांना त्याप्रमाणे सदर योजनेच्या बाबतीत पंचायत समितीने कार्यवाही केलेली नाही.

3) कृषी विकास अधिकारी यांनी सदर योजनेस दिनांक 28/10/2015 रोजी तांत्रिक मान्यता दिलेली आहे. तथापि, सदर मान्यतेमध्ये लाभार्थी पात्रतेसंबंधी अटी / शर्ती नमूद नाहीत. अटी / शर्ती नमूद नसलेने पात्र लाभार्थींच्या निकषासंबंधी पडताळणी करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, कृषी विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ/2013/प्र.क्र.158/11अे, दिनांक 27/09/2013 चे प्रपत्र 2 नुसार मार्गदर्शक सुचना नमूद आहेत. मार्गदर्शक सुचना क्रमांक 8 नुसार औजारांची मागणी नोंदविल्यानंतर पुरवठादार संस्थेने 45 दिवसांच्या कालावधीत औजारांचा पुरवठा करणे बंनधनकारक आहे. 45 दिवसांनंतर पुरवठा केल्यास औजारांच्या किंमतीच्या 3 टक्के रक्कम दंडात्मक वसूली म्हणून पुरवठा संस्थेच्या देयकातून एकरकमी वसूल करणे आवश्यक आहे. विभागाने पुरवठादार संस्थेस दिनांक 28/10/2015 रोजी पुरवठा आदेश दिले होते. त्यानुसार पुरवठादाराने 45 दिवसांत औजारांचा पुरवठा करणे आवश्यक असतांना विहीत कालावधीत पुरवठा न करता दिनांक 26/11/2015 रोजी साहित्याच्या पुरवठ्यासाठी दिनांक 15/01/2016 अखेर मुदतवाढ मागितलेली आहे. कृषी विकास अधिकारी यांनी दिनांक 27/11/2015 रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त शासन

निर्णयाचे उल्लंघन करुन दिनांक 15/01/2016 अखेर काय आधारे मुदतवाढ दिली? याबाबत लेखापरीक्षणाकडे साधार पुर्तता सादर करावी.

5) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ/2013/प्र.क्र.158/11 अे, दिनांक 27/09/2013 मधील 6 अन्वये शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण औजारे पुरविण्याची जबाबदारी पुर्णपणे महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ या पुरवठा संस्थेची राहिल व त्यासाठी औजारांच्या पुरवठापूर्व गुणवत्ता तपासणीसाठी पुरवठा संस्थेने स्वत:ची गुणवत्ता नियंत्रण यंत्रणा उभारणे बंधनकारक राहिल, असे नमूद आहे. त्याप्रमाणे पुरवठादाराने पुरविलेली औजारे गुणवत्तापुर्ण असलेबाबतचा चाचणी अहवाल नस्तीसोबत नसल्याने गुणवत्तेबाबत खात्री करता आली नाही.

6) पुरवठादार संस्थेने डिलीव्हरी चलन क्रमांक 24453 ते 24458 अन्वये 11 तालुक्यातील पंचायत समितींना औजाराचा पुरवठा केला आहे. तथापि, उपरोक्त नमूद क्रमांकाच्या डिलेव्हरी चलनावर दिनांक नमूद नसलेने संबंधीत पंचायत समितींना साहित्य प्राप्त कधी झाले? याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

**3.623 शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर कडबाकुट्टी यंत्र वाटप करणे (2 एचपी विद्युतचलित कडबा कुट्टीच्या मशिनसह)**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 49,98,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार पंचायत समिती उपकर निधीच्या योजना राबविण्यासाठी वेळापत्रक निश्चित केलेले आहे. त्यानुसार दिनांक 30 जुनपर्यंत प्रस्ताव स्विकृती, 30 सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव मंजूरी व जानेवारी अखेर लाभार्थ्यांस साहित्य वितरण करण्याच्या सुचना आहेत. प्रस्तुत प्रकरणी वेळापत्रकाचे पालन झालेले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1988 नुसार लाभार्थी हिश्याची रक्कम प्रथम वसुल केल्याशिवाय साहित्य खरेदी करु नये, अशा स्पष्ट सुचना असतांना त्याप्रमाणे सदर योजनेच्याबाबतीत पंचायत समितीने कार्यवाही केलेली नाही.

3) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर योजनेस दिनांक 20/08/2015 व दिनांक 16/11/2015 रोजी तांत्रिक मान्यता दिलेली आहे. तथापि, सदर मान्यतेमध्ये लाभार्थी पात्रतेसंबंधी अटी / शर्ती नमूद नाहीत. अटी / शर्ती नमूद नसलेने पात्र लाभार्थीच्या निकषासंबंधी पडताळणी करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय भांखस/2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग4, दिनांक 30/10/2015 मधील परिच्छेद क्रमांक 3.1.1.1 नुसार मालाच्या दर्जाबाबतची तपासणी केल्याबाबतचा चाचणी अहवाल दप्तरी उपलब्ध नाही.

5) विभागाने दिनांक 24/08/2015 रोजी दिलेल्या 294 नगांच्या पुरवठा आदेशान्वये पुरवठादार संस्थेने जिल्हयातील 11 पंचायत समित्यांना डिलीव्हरी चलन क्रमांक 21139 ते 21149 नुसार दिनांक 05/12/2015 रोजी एकाच दिवशी साहित्याचा पुरवठा केल्याचे साठा नोंदवहीवरुन दिसून येते. डिलीव्हरी चलनावर दिनांक नमूद नसलेने सर्व तालुक्यांना एकाच दिवशी पुरवठा झाला असल्याबाबत डिलीव्हरी चलनाआधारे खात्री करता आली नाही.

6) कृषी आयुक्तालय, पुणे यांचेकडील मार्गदर्शक सुचना क्रमांक सीपीएस/पंसऔ/शानि/06/07/282, दिनांक 19/12/2006 नुसार पुरवठा करावयाच्या साहित्याचे दराबाबत खुल्या बाजारात चौकशी करुन खरेदी केलेल्या साहित्याचे दर अधिक नसलेबाबत विभागाने खात्री केल्याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. विभागाने दिनांक 24/08/2015 व दिनांक 18/11/2015 अन्वये दिलेल्या पुरवठा आदेशाच्या प्रती संबंधीत गटविकास अधिकारी यांना दिलेल्या असून अनुक्रमांक 7 मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, पुरवठा झालेल्या सदरहु साहित्याची किंमत त्याच दर्जाच्या स्पेसिफिकेशनच्या खुल्या बाजारातील त्याच उत्पादकांच्या किंमतीपेक्षा अधिक असणार नाहीत. याची कृपया आपले स्तरावर खात्री करुन घ्यावी व याबाबत तफावत आढळल्यास तात्काळ या

कार्यालयाच्या निदर्शनास आणून द्यावे, असे नमूद आहे. त्यानुसार गटविकास अधिकारी यांनी खात्री केल्याबाबतची पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.

**3.624 शिल्लक साहित्याबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** कृषी विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांनी तालुका स्तरावर वितरीत केलेल्या साहित्याच्या नोंदी संबंधीतांच्या मालसाठा नोंदवहीवरुन तपासल्या असता दिनांक 31/03/2016 अखेर वाटप न झालेने जिल्हा परिषद निधी नाहक गुंतून पडला आहे. साहित्याचे पुर्ण वाटप न झालेने साहित्याच्या संख्येएवढे लाभार्थी लाभापासून वंचित राहिल्याने योजनेचा उद्देश सफल झाल्याचे दिसून येत नाही. याबाबत समर्पक स्पष्टीकरण लेखापरीक्षणास सादर करुन शिल्लक साहित्य वाटप केल्याची पुर्तता दाखवावी.

**3.625 जिल्हा परिषद स्वीय निधीतून 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना चाफकटर पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 39,90,000/- खर्च करण्यात आला आहे. सदरबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

कृषी विभाग, जिल्हा परिषद, सांगली यांनी जिल्हा स्वीय निधीतून 50 टक्के अनुदानावर चाफकटर खरेदी करणेकामी ई-निविदा मागविण्यात आली. पात्र 4 निविदाधारकापैकी कमी दराची निविदा मे.अर्णव सप्लायर्स, नांद्रे, तालुका मिरज यांची वाटाघाटीने प्रति नग रूपये 16,300/- दराने मान्यता दिली. तथापि, सदर पुरवठादाराने चाफकटर पुरवठा करणेबाबतक असमर्थता दर्शवून दिनांक 24/02/2016 रोजी निविदा प्रक्रीयेतून माघार घेतली. त्यामुळे दिनांक 03/05/2016 च्या अतिरिक्त  मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाने सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली. परंतु, प्रथम निविदा रद्द होणेपूर्वीस समांतर द्वितीय निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. सदर प्रक्रीयेमध्ये पात्र 3 निविदाधारकापैकी कमी दराच्या 2 निविदा धारकांना वाटाघाटीस प्रती 50 टक्के दराने प्रती नग रूपये 21,000/- पुरवठा आदेश देण्यात आला. या खरेदीबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2005/प्र.क्र.375/वित्त 9, दिनांक 30/12/2006 अन्वये रूपये 50 लाख वरील खरेदी निविदा जिल्हा स्तरावर मराठी / हिंदी व राज्य स्तरावरील मराठी, हिंदी, इंग्रजी वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करणे आवश्यक असता प्रस्तुत प्रकरणी अशी कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे खुल्या स्पर्धात्मक दराचा लाभ झाला नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय दिनांक 23/09/2013 नुसार ई-निविदा प्रणाली अंतर्गत शुद्धीपत्रक हे फक्त किती निविदा प्राप्त झाल्या? हे पाहून अल्प प्रतिसाद मिळाल्यास किंवा 3 पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास शेवटच्या दिवशी निविदा कालावधी संपण्यापूर्वी एक तास अगोदर प्रसिध्द करता येते आणि अशा कार्यवाहीसाठीचे शुध्दीपत्रक काढता येते. मात्र प्रस्तुत प्रकरणी निविदा कालावधीत एकूण 3 शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात आले आहे. सदर शुध्दीपत्रक हे नियमबाहयरित्या अटी, शर्ती मध्ये बदल, specification मध्ये बदल ईत्यादी कारणासाठी प्रसिध्द करण्यात आले आहे. तथापि, उपरोक्त शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे.

3) प्रस्तावित खरेदी ही लाभार्थी हिस्स्यासह रूपये 80 लाख ची असल्याने त्यास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची प्रशासकीय मंजुरी घेण्यात आली आहे. रूपये 50 लाखापेक्षा जादा रकमेच्या खरेदीसाठी शासन निर्णय क्रमांक झेडपीए/12/प्र.क्र.680/वित्त 9, दिनांक 31/01/2013 अन्वये प्रशासकीय विभागाची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही.

4) मे.अर्णव सप्लायर्स, नांद्रे, तालुका मिरज यांचा 16,300 प्रती नग प्रमाणे हप्ता मंजुरीच्या शिफारशीस दिनांक 07/01/2016 रोजी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिलेली असताना सदर पुरवठादारास त्वरित पुरवठा आदेश देणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. निविदा मंजुरीच्या अटी शर्तीमध्ये समावेश नसतानाही अट घालून दिनांक 08/02/2016 रोजी व तद्नंतर दिनांक 22/02/2016 रोजी सदर पुरवठाधारकास specification प्रमाणे चाफकटरचा नमुना कार्यालयास देण्यास मागणी करण्यात आली. सदर अट नियमबाहय असल्याने व मक्ता मंजुर केल्यानंतर मागणी केल्याने पुरवठादाराने दिनांक 24/02/2016 च्या पत्रानुसार

"बाजाराची स्थिती व जिल्हा परिषदेमधील चालू घडामोडीमुळे मी आपली मागणी वेळेत पुरवठा करू शकत नसल्याने मी निविदा प्रक्रियेतून माघार घेत आहे", असे स्पष्ट केले आहे.

5) परंतु, सदर पुरवठा दाराने निविदेप्रक्रियेतून माघार घेतल्यानंतर महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 रोजीच्या कार्यालयीन खरेदी नियम पुस्तिकेतील प्रकरण क्रमांक 5 मधील नियम क्रमांक 5.6 अन्वये निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार हा खरेदी कार्यालयाचा असतो. मात्र खरेदी नियम पुस्तिकेतील प्रकरण क्रमांक 2 मधील नियम क्रमांक 2.9.3 (ब) नुसार निविदा रद्द करण्यास जिल्हास्तरीय खरेदी समितीची मान्यता घेणे अवाश्यक असताना त्यानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

6) निविदा प्रक्रिया 2 दिनांक 05/01/2016 रोजी ई-निविदा प्रसिध्द केली आहे. मात्र महाराष्ट्र शासन, कृषी, पशु, दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ/2015/प्र.क्र.218/11 अे, दिनांक 23/11/2015 अन्वये सन 2015-2016 साठी अनुदानावर पुरवठा करावयाच्या कृषी अवजारे उपकरणे इत्यादीसाठी शासन दरकरार उपलब्ध असताना त्याप्रमाणे खरेदी करणे आवश्यक असता तसे न करता द्वितीय निविदा प्रक्रिया राबवून खरेदी केली आहे.

7) कृषी विभागाकडून एकाच वस्तूच्या खरेदीकरिता दोन वेगवेगळ्या निविदाप्रक्रिया राबविल्या गेल्या आहे. पहिल्या निविदेची मुदत दिनांक 23/11/2015 पर्यंत होती तत्पूर्वीच दुसऱ्या निविदेद्वारे खरेदी करण्यासाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर केला असता त्यावर वित्त विभागाने ठोस अभिप्राय नोंदविणे आवश्यक होते.

8) द्वितीय निविदा प्रक्रीयेमध्ये मे.परिक्षीत अग्रो टेक्निक, सांगली व मे.सुदर्शन अग्रो, सांगली यांचे दोघांचेही दर रूपये 22,900/- असल्याने दोघांनाही वाटाघटीस बोलाविण्यात आल्याचे दिसून येते व वाटाघाटीअंती रूपये 21,000/- दर मंजुर करण्यात येऊन 50 टक्के - 50 टक्के पुरवठा करणेस दोन्ही संस्थेस आदेश दिला. मंजुर करण्यात आलेल्या मे.परिक्षीत अग्रो टेक्निक, सांगली व मे.सुदर्शन अग्रो, सांगली यांचे कागदपत्रांची पडताळणी केली असता यांचे आयकर भरणा दाखल्यावरून व नफा तोटा पत्रकातील पत्त्यावरून असे दिसून येते की, यांच्या फर्म एकाच असून ते एकमेकांशी संबंधीत आहे. तसेच दोन्ही संस्थांचे मालक श्री.परीक्षित बाबुराव हेरले व श्री.बाबुराव सुदर्शन हेरले हे एकमेकांशी नातेसंबंधीत असल्याचे कागदपत्रांवरून दिसून येते. त्यामुळे स्पर्धा झालीच नाही व दिनांक 31/10/2015 च्या शासन निर्णयमधील नियम क्रमांक 2.6.3 चे उल्लंघन झाले आहे.

9) निविदेतील अट क्रमांक 8 अन्वये जर मक्ता मंजुर झालेनंतर चाफकटरचा पुरवठा न केल्यास किंवा काही माल पुरवून उर्वरित माल न पुरविल्यास सदर माल पुरवठा नवीन पुरवठा धारकाकडून करून घेण्यात येईल व त्यासाठी येणारा जाहिरात खर्च जर दर जास्त असल्यास जादा द्यावी लागणारी रक्कम ही मूळ पुरवठाधारकाकडून वसूल करण्यात येईल व ही रक्कम ठरविण्याचे संपूर्ण अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहे. तरी वरील अटीनुसार श्री.अर्णव सप्लायर्स नांद्रे यांच्या वर कोणतीही कार्यवाही केली नाही. त्याचवेळी दुसरी निविदा प्रक्रिया राबविली गेली व प्रती चाफकटर रूपये 21,000/- प्रमाणे खरेदी केले.

10) आयकर कपात केल्याबाबतचे चलने लेखापरीक्षणास सादर केली नाहीत.

11) पुरवठा आदेशामध्ये 5 टक्के सुरक्षा अनामत वसूल करणे आवश्यक असताना देयकामध्ये 4 टक्के प्रमाणे अनामत रक्कम वसूल केल्याचे दिसून येते.

12) उपरोक्त नमुद केले नुसार योजना राबवितांना महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.406/वित्त 09, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषदेने राबविलेल्या विविध योजनांचे अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सुचना नमुद केलेल्या असुन त्या सोबतचे परिशिष्ट ड नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनांमधील लाभार्थी निवड माहे 31 जुलै अखरे करणे आवश्यक आहे. तथापि, कृषी विभाग, जिल्हा परिषद, सांगली यांनी लाभार्थीची निवड न करताचा पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. तरी लाभार्थींची निवड केलेली नसतांना पुरवठा आदेश देणेत आलेला आहे.

13) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस/1093/प्र.क्र./1239/37, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थींचे गावनिहाय जिल्हास्तरावर मास्टर नोंदवही आवश्यक असता ती ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थीला दुबार लाभ दिला नसल्याची खात्री करता आली नाही.

14) साहित्याचे उपयोगिता प्रमाणपत्र / फलश्रुती अहवाल नस्तीसोबत उपलब्ध झाला नाही.

15) कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे यांचे दिनांक 04/10/2013 चे मार्गदर्शक सूचनानुसार कृषि विकास अधिकारी यांनी औजारांच्या पुरवठयाच्या संख्येनुसार रूपये 10,000/- पेक्षा कमी किमतीच्या औजारांचे एकूण पुरवठा संख्येच्या 2.50 टक्के रूपये 10,000/- ते रूपये 50,000/- पर्यंत किमंतीच्या औजारांकरीता एकूण पुरवठा संख्येच्या 1.5 टक्के व रूपये 50,000/- पेक्षा जादा किंमतीच्या औजारांकरीता एकूण पुरवठा संख्येच्या 0.50 टक्के रॅंडम पध्दतीने नमुने क्षेत्रीय स्तरावर काढून त्याची गुणवत्ता तपासणी अहवालाची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

16) लाभार्थी हिस्स्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

17) पंचायत समिती यांचे मागणीपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

18) साहित्य सुस्थितीत प्राप्त झालेबाबत तालुका कृषि अधिकारी यांचे प्रमाणपत्र उपलब्ध नाही.

19) संचालक, फलोत्पादन, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक कृषिआ/फलो-3/पिसंयो/2015-16/19431/2015, दिनांक 29/06/2015 मध्ये सदर योजनेसंदर्भात मागदर्शन सुचना नमुद केलेनुसार शेतक-यांकडून मागणी गोळा करण्याची जबाबदारी कृषी विकास अधिकारी यांची राहिल, असे नमुद केले असून सर्व प्रकारचे शेतकरी सदर योजनेचे लाभार्थी असून त्यांच्याकडून मागणी गोळा न करताच पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. तसेच या योजनेअंतर्गत सर्व प्रकारच्या शेतक-यांना (अनु.जाती) लाभ देण्यात यावा. अनु.जातीच्या लाभार्थ्यांना प्राधान्याने लाभ देण्यात यावा. लाभार्थी अल्पभुधारक / सिमांतिक असल्यास प्राधान्य देण्यात यावे, असे नमुद केलेले असताना उपरोक्त निकष लावून लाभार्थी निवड करण्यात आलेली नाही.

20) संचालक, फलोत्पादन, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक कृषिआ/फलो-3/पिसंयो/2015-16/19431/2015, दिनांक 29/06/2015 मध्ये सदर योजनेसंदर्भात मागदर्शन सुचना नमुद केलेनुसार खर्च झालेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र मोहिम संपल्यानंतर एक महिन्यांच्या आत कृषी विकास अधिकारी यांनी कृषी आयुक्तालयास सादर करावे, असे नमुद असताना तशी केलेली कार्यवाही लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही.

21) पुरवठा धारकाशी करण्यात आलेल्या करारनाम्यावर दिनांक नाही. तसेच सुदर्शन अॅग्रो यांच्याबरोबर केलेल्या करारपत्रात स्टॅम्प क्रमांक NF294866 हा पूर्णपणे कोरा आहे.

कृषी विभागाने प्रस्तावित चाफकटर खरेदीकरीता अवलंबलेली प्रक्रिया अवलोकनी घेता पहिल्या निविदेची मुदत दिनांक 23/11/2015 पर्यंत असताना दुसऱ्या निविदेला दिनांक 18/11/2015 रोजी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची प्रशासकीय मंजुरी घेण्यात आलेली आहे. म्हणजेच एकाच वस्तूच्या खरेदीकरिता नियमबाह्यरित्या दोन वेगवेगळ्या व समांतर निविदा प्रक्रियांचा अवलंब केला गेला. पहिल्या निविदा प्रक्रीयेतील निविदाधारकास वेळीच पुरवठा आदेश देण्याऐवजी अवाजवी विलंब करण्यात आला. त्यामुळे निविदा राबवण्याचा उद्देश सफल झाला नाही. तसेच महाराष्ट्र शासन, कृषी, पशु, दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ/2015/प्र.क्र.218/11 अे, दिनांक 23/11/2015 अन्वये सन 2015-2016 साठी अनुदानावर पुरवठा करावयाच्या कृषी अवजारे उपकरणे इत्यादीसाठी शासन दरकरार उपलब्ध असताना त्याप्रमाणे खरेदी करणे आवश्यक असते. परंतु, तसे न करता द्वितीय निविदा प्रक्रिया राबवून खरेदी केली आहे. प्रथम मंजुर झालेला दर रूपये 16,300/- नुसार पुरवठा केला असता व दिनांक 02/01/1992 च्या शासन निर्णयनुसार 200 पट जादा खरेदी करता आली असती. पहिल्या निविदेतील मंजुर पुरवठाधारकाचा प्रति नग रूपये 16,300/- दर पाहता व द्वितीय निविदेतील मंजुर पुरवठा धारकाचा प्रति नग रूपये 21,000/- दर पाहता सदर दरातील तफावत प्रति नग रूपये 4,700/- आहे. एकूण खरेदी नग संख्या 380 करीता रूपये 4,700/- प्रमाणे रूपये 17,86,000/- इतकी जिल्हा परिषद निधीचे नुकसान झाले आहे.

**3.626 आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत कुंडल, तालुका पलूस येथे सोलर स्ट्रीट दिवे बसविणे.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 57, दिनांक 22/12/2015 अन्वये रक्कम रुपये 18,45,120/- करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकीय मंजुरी दिलेले नकाशे व अंदाजपत्रक सादर केले नाही.

2) कामाचे निरीक्षण व तपासणी काम संबंधीत कार्यान्वित यंत्राणेकडून आणि जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडून अथवा शासन नियोजन विभाग अथवा सार्वजनिक बांधकाम खात्याने नेमून दिलेल्या अधिकाऱ्याकडून केलेबाबतचा अहवाल सादर केला नाही.

3) सदर योजनेअंतर्गत केलेल्या कामाचे नाव, वर्ष, खर्च इत्यादी तपशील दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक असून तशा पद्धतीचा फोटो लेखापरीक्षणास पहावयास मिळाला नाही.

4) MEDA यांची सन 2014-2015 साठी RC-2014-2015/CR-9-II/solar/635, दिनांक 13/02/2015 नुसार मंजुरी होती. तथापि, सन 2015-2016 साठी दरकरार उपलब्ध नसलेबाबतचे पत्र सादर करावे.

5) खरेदीची जाहिरात ही दोन वृत्तपत्रात देणे आवश्यक असताना एकाच वर्तमनपत्रात जाहिरात दिल्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

6) निविदेतील specification नुसार वालचंद कॉलेज, सांगली यांचा अहवाल नमूद नाही. तथापि, specification मधील compartment sholud be on top of poll with ms angle frame etc. rcc foundation should be m-20 ratio, foundation bolt should made for NE-8 material size is 750 mm x 12 बाबत तपासणी अहवाल सादर करावा.

7) ई-निविदेमधील अटी व शर्ती नुसार व कंत्राटच्या शर्तीनुसार करारनामा करणे आवश्यक असताना तसे आढळून आले नाही.

8) specification नुसार पुरवठा झाल्याचे दिसून येत नाही. त्यामध्ये खालीलप्रमाणे तफावत आढळून आली.

| | as per specification | as per supply |
|---|---|---|
| 1. | pole -ss 304 length 4600 mm | pole -ss 304 length 4572 mm |
| 2. | sectional length 1550 mm | sectional length 1524 mm |
| 3. | Base plate 210mm x 210mm x 10mm | Base plate 203mm x 203mm x 10mm |

9) वालचंद कॉलेज, सांगली यांचे inspection रिपोर्ट नंबर wce/mech/cons/aba/1416, दिनांक 10/07/2015 मध्ये फक्त सोलर बसविल्याचे परिमाण नमूद असून specification नुसार पुरवठा व वस्तू सुस्थितीत असल्याबाबत नमूद नाही.

10) डिलिवरी चलन मध्ये सरपंच / ग्रामविकास अधिकारी यांनी स्वाक्षरी केली असून सदर चलनामध्ये specification नुसार पुरवठा व वस्तू सुस्थितीत असल्याबाबत नमूद नाही.

**3.627 जिल्हा परिषद स्वीय निधीतून 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना बॅटरी कम हँड ऑपरेटेड नॅपसॅक स्प्रेअर्स पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 23) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 271, दिनांक 30/03/2016 अन्वये रक्कम रुपये 29,97,536/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे. सदरबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) पुरवठा साहित्याची तपासणी, औजारांचा पुरवठा करताना त्यासोबत उत्पादनस्थळी पुरवठापूर्व गुणवत्ता तपासणी केल्याचा अहवाल देणे आवश्यक असता, तसा अहवाल नस्तीसोबत पहावयास मिळाला नाही.

2) साहित्य सुस्थितीत प्राप्त झालेबाबत तालुका कृषि अधिकारी यांचे प्रमाणपत्र उपलब्ध नाही.

3) साहित्याचे उपयोगिता प्रमाणपत्र / फलश्रुती अहवाल नस्तीसोबत उपलब्ध झाला नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस/1093/प्र.क्र.1239/37, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थीचे गावनिहाय जिल्हास्तरावर मास्टर नोंदवही आवश्यक असता ती ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थीला दुबार लाभ दिला नसल्याची खात्री करता आली नाही.

5) कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे यांचे दिनांक 04/10/2013 चे मार्गदर्शक सूचनानुसार कृषि विकास अधिकारी यांनी औजारांच्या एकूण पुरवठा संख्येच्या 0.50 टक्के रॅंडम पध्दतीने नमुने क्षेत्रीय स्तरावर काढून त्याची गुणवत्ता तपासणी अहवालाची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2007/प्र.क्र.4871/वित्त-3, दिनांक 25/06/2014 अन्वये वैयक्तिक लाभाच्या योजना राबवितांना त्यात एकूण लाभार्थ्यापैकी 3 टक्के लाभार्थी अपंग प्रवर्गातील असावेत, असे स्पष्ट केले असताना सदर योजनेतून त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

7) कृषी विभाग, जिल्हा परिषद, सांगली यांनी लाभार्थीची निवड न करताचा दिनांक 03/03/2016 रोजी पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. तरी लाभार्थीची निवड केलेली नसतांना पुरवठा आदेश कसा देणेत आला?

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1096/17, दिनांक 09/10/2007 नुसार योजनासंबंधी जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर व्यापक प्रसिद्धी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झाल्याचे दिसत नाही. तसेच योजना अंमलबजावणीच्या कार्यपध्दतीत कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र शासन दिनांक 10/08/2010 यांचे पत्रानुसार साहित्याचे पुरवठा आदेश देण्यापुर्वी शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त करुन घेउन अर्जांची छाननी करुन पुर्व संमती घेणे आवश्यक होते. परंतु, याबाबत योग्य ती कार्यवाही झालेली नाही.

9) संचालक, फलोत्पादन, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक कृषिआ/फलो-3/पिसंयो/2015-16/19431/2015, दिनांक 29/06/2015 मध्ये सदर योजनेसंदर्भात मागदर्शन सुचना नमुद केलेनुसार खर्च झालेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र मोहिम संपल्यानंतर एक महिन्यांच्या आत कृषी विकास अधिकारी यांनी कृषी आयुक्तालयास सादर करावे, असे नमुद असताना तशी केलेली कार्यवाही लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही.

10) सदरबाबत स्थानिक बाजारपेठेतील दराची तुलना केलेबाबत लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही.

11) लाभार्थी हिस्स्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

12) सदर निविदा शुद्धीपत्रकानंतर उघडण्याची दिनांक 18/01/2016 ऐवजी दिनांक 25/01/2016 अशी करण्यात आली. शासन निर्णय दिनांक 23/09/2013 नुसार ई-निविदेतील अटी व शर्तीमध्ये बदल केल्यास त्यास प्रथम मागणी असे गृहीत धरून मागणीसाठी निविदा सूचना कालावधी 25 दिवस इतका आहे. तसेच शासन निर्णय दिनांक 30/10/2015 नुसार 25 लाखावरील खरेदीस प्रथम मागणी 2 आठवडे इतकी मुदत आहे. या निविदेतील वस्तुमध्ये मोठा बदल असताना जिल्हा परिषदेते फक्त 7 दिवस इतकीच वाढीव मुदत दिली आहे.

13) प्रथम निविदेतील मूळ अटीमध्ये स्प्रे पंप आयएसआय प्रमाणित अथवा आयएसओ प्रमाणपत्र असलेला असणे आवशयक होते व नवीन अटीमध्ये फक्त आयएसओ प्रमाणपत्र जोडणे आवशयक असल्याचे नमूद केले आहे. वास्तविक सदरची अट बदलण्याची काहीच आवश्यकता नव्हती. शासन निर्णय दिनांक 02/01/1992 नुसार आयएसआय मार्कचे साहित्य खरेदीबाबतचे सूचना असताना ही अट बदलल्याचे दिसून येते.

14) सभापती, कृषी विभाग, जिल्हा परिषद, सांगली यांनी त्यांचे पत्र दिनांक 06/01/2016 रोजी पत्र देऊन बटरी ऑपरेटेड स्प्रे पंप ऐवजी बॅटरी कम हॅंड ऑपरेटेड नॅपसॅक स्प्रे पंपाची शेतकऱ्यांच्या मागणीनुसार खरेदी करण्यात यावी, असे नमूद केले आहे. तशा प्रकारची सूचना ई-निविदेमध्ये केली असून शेतकऱ्यांची मागणीपत्रे लेखापरीक्षणास पहावयास मिळाली नाही.

15) काही पंचायत समितीला मागणी नसताना मागणीपेक्षा जास्त पुरवठा झाल्याचे दिसून येते.

**3.628 अल्प भूधारक शेतक-यांना ताडपत्रीचा 50 टक्के अनुदानावर पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 49,99,104/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती स्तरावरून प्रस्ताव मागवून लाभार्थी निश्चित करून मागणी जिल्हा परिषदेकडे नोंदविणे आवश्यक होते व त्याप्रमाणे खरेदी प्रक्रिया राबविणे आवश्यक होते, तथापि तशी कृती झालेली नाही.

2) लाभार्थी हिस्सयाची 50 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 5,63,904/- लाभार्थ्याकडून वसूल केलेली नाही. तरी लाभार्थी हिस्सा रक्कम रूपये 5,63,904/- वसूल करून पूर्तता दाखवावी.

3) गटविकास अधिकारी, करवीर यांचे दिनांक 22/05/2015 च्या मागणी पत्रानुसार 200 नग ताडपत्रीची मागणी केली होती. तथापी पुरवठा आदेश करवीर गटासाठी 561 नगांचा देणेत आलेला आहे. तसेच पन्हाळा गटासाठी 100 नगाची मागणी होती तथापि पुरवठा आदेश 235 नगाचा देणेत आलेला आहे. त्यामुळे मागणीपेक्षा जादा 496 नगाचा पुरवठा आदेश दिला आहे. त्याची रक्कम रूपये 15,71,328/- वसूलपात्र करावी.

4) सहसंचालक उद्योग मुंबई यांचे दर करारातील शेडयूल 2 मधील अट क्र.10 नुसार पुरवठा दाराची रक्कम 90 टक्के व 10 टकके प्रमाणे देणे आवश्यक असताना एकत्रीत 100 टक्के रक्कम प्रदान एकाचवेळी केली आहे.

5) सदर साहित्याचा चाचणी अहवाल नसताना रक्कम अदा केली आहे.

**3.629 सन 2015-16 करिता विघयो अंतर्गत बॅटरी स्प्रे पंप खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** सदरबाबत रक्कम रूपये 43,44,795/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक सुकृआ 2015/प्र.क्र.2185/11 अे, दिनांक 23/11/2015 मधील अट क्र.10 प्रमाणे पुरवठादार संस्थेने विक्री पश्चात सेवा सुविधा केंद्राची यादी जिल्हा परिषदेस कळविणे आवश्यक आहे.

2) अट क्र.7 प्रमाणे राज्यस्तरीय तांत्रिक समितीने शिफारास केलेले उत्पादक / पुरवठादार यादीत मे. पडगीलवार ॲग्रो इंडस्ट्रीज, नागपूर यांचे नांव असलेले शिफारास पत्र दप्तरी उपलब्ध नाही.

3) वर्क ऑर्डर दिनांक 23/03/2016 मधील अट क्र.11 प्रमाणे विक्री पश्चात एक वर्षाची हमी देणे कालावधीत एकही पंप खराब न झालेबाबत सक्षम अधिकारी यांचा अहवाल दप्तरी नाही.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सीआर/ 2239/34/67, दिनांक 01/09/1993 नुसार सदर योजनेचा लाभ दिल्यानंतर लाभार्थींच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा झाल्याबाबत अहवाल दप्तरी उपलब्ध नाही.

**3.630 विशेष घटक योजना - तुषार संच खरेदी.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत 5 प्रमाणकान्वये एकूण रक्कम रूपये 1,60,57,181/- इतके खर्च करण्यात आले आहे. सदरची खरेदी ई-निविदाद्वारे मे.जैन इरिगेटर्स यांचेकडून खरेदी करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन परिपत्रक दिनांक 20/03/2007 अन्वये 15 फेब्रुवारी नंतर त्या वित्तीय वर्षात कोणतेही खरेदी करता येत नाही. असे असतांना दिनांक 17/03/2015 रोजी 961 तुषारसिंचन संच खरेदीचा पुरवठा आदेश दिला आहे. शासन परिपत्रकाचे उल्लंघन झाले आहे.

2) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 7 नुसार संचाची तपासणी सेंट्रल इंस्टीट्युट ऑफ प्लास्टीक इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नोलॉजी सिपेट, औरंगाबाद किंवा कृषि विद्यापीठ इत्यादीकडून करवून घेणे आवश्यक असतांना ते शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव यांचेकडून घेतली आहे.

3) शासन निर्णय दिनांक 27/09/2013 चे प्रपत्र 2 मधील मार्गदर्शक सुचनानुसार प्राप्त तुषारसिंचन संचाची चाचणी तपासणीसाठी कृषि विभागाने संबंधीत प्रयोगशाळेकडे पाईप संच तपासणी करणेबाबत पत्रव्यवहार तपासणीस

सादर केले नाहीत, अथवा विहित टक्केवारीप्रमाणे तुषारसंचाची तपासणी केल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे खरेदी करण्यांत आलेले तुषारसिंचन संच योग्य दर्जा व गुणवत्तेचे असल्याबाबत लेखापरिक्षणात खात्री देता येत नाही.

4) पुरवठा आदेशांतील अटीप्रमाणे तालुक्यांना तुषार सिंचन पाईप संच प्राप्त झाल्यानंतर संबंधीत गटविकास अधिकारी यांनी दिनांकित पोहोच देणे आवश्यक आहे. जिल्हयातील कोणत्याच गटविकास अधिकारी यांनी अशाप्रकारे पोहोच दिलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सीआर/2239/34/67, दिनांक 01/09/1993 नुसार सदर योजनेचा लाभ दिल्यानंतर लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये झालेल्या सुधारणाबाबत अहवाल घेतलेला नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1086/सीआर/1074/57, दिनांक 29/09/1983 अन्वये फलश्रुती अहवाल प्राप्त केलेला नाही.

6) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक विप्र/7/विघयो/अंतरिम मासू/2012-12/380/2012, दिनांक 02/05/2012 अन्वये योजनेची माहिती सर्वांना व्हावी, या दृष्टिने नमुद केलेनुसार लाभार्थ्यांना देण्यात आलेली लाभाच्या यादीस ग्रामसभेत प्रसिध्दी देण्यात आली नाही. सदर योजनेस पाहिजे तेवढ्या प्रमाणात प्रसिध्दी देण्यात आली नसल्याने योग्य व गरजू लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाल्याबाबत पडताळणी करता आले नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सीआर/2239/34/67, दिनांक 01/09/1993 नुसार गावनिहाय, कुटूंबनिहाय / लाभार्थी निहाय व प्रवर्गनिहाय तालुकास्तरांवर व जिल्हास्तरांवर नोंदवही ठेवण्यात आलेल्या नाहीत.

8) योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टिने विभागीय कृषि सहसंचालक यांनी 0.75 टक्के व कृषि विकास अधिकारी यांनी 5 टक्के व जिल्हा कृषि विकास अधिकारी यांनी 10 टक्के तसेच कृषि अधिकारी, विशेष घटक योजना पंचायत समिती स्तर यांनी 100 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. सदर तपासणीचा अहवाल पहावयास मिळाला नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2007/प्र.क्र.481/वित्त-3, दिनांक 12/10/2007 नुसार एकूण निवड झालेल्या लाभार्थ्यांच्या 3 टक्के लाभार्थी अपंग असणे आवश्यक आहे. सदर योजनेमध्ये तशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परित्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र./178, दिनांक 09/10/1997 नुसार लाभार्थ्यांस वस्तुंचे वाटप त्याच वित्तीय वर्षात व वळेत होणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. प्रत्यक्षात लाभार्थ्यांना लाभ पुढील वर्षात देण्यात आल्यामुळे योजनेचा मुळ हेतु साध्य झालेला नाही.

11) लाभार्थ्यांचे मुळ प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध करून न दिल्यामुळे लाभार्थ्यांची निवड योग्य पद्धतीने झाल्याची खात्री करता आली नाही.

**3.631 विशेष घटक योजना - 5 एच पी पाणबुडी विदुयत मोटार / 3 एचपी पेट्रोल इंजिन खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 1,85,19,839/- ची खरेदी करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरीलप्रमाणे रुपये 21,000/- किंमतीचे 5 एचपी पाणबुडी विद्युत मोटार असून त्यासाठी रुपये 20,000/- मर्यादित शासन अनुदान आहे. उर्वरित रुपये 1,000/- लाभार्थी हिस्सा आहे. खरेदी करण्यात आलेल्या 919 नग 5 एच पी पाणबुडी विद्युत मोटारीचे प्रत्येकी रुपये 1,000/- प्रमाणे एकूण रक्कम रूपये 9,19,000/- वसुल करणे आवश्यक असतांना लाभार्थ्यांकडून वसुल केले नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1094/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्सा वसुल केल्याशिवाय योजना राबविण्यात येवू नये. पर्यायाने रक्कम रूपये 9,19,000/- लाभार्थी हिस्सा वसुल झाल्याचे दिसून येत नाही. याबाबत

समर्पक खुलासा करुन लाभार्थी हिश्याची रक्कम रूपये 9,19,000/- विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषि उदयोग विकास महामंडळ मर्यादित उस्मानाबाद यांचेकडे भरणा केल्याचे दर्शवून अनुपालन करावे.

2) पुरवठा आदेशांतील अटीप्रमाणे तालुक्यांना ताडपत्री प्राप्त झाल्यानंतर संबंधीत गटविकास अधिकारी यांनी दिनांकित पोहोच देणे आवश्यक आहे. जिल्हयातील कोणत्याच गटविकास अधिकारी यांनी अशाप्रकारे पोहोच दिलेली नाही.

3) शासन निर्णय दिनांक 27/09/2013 चे प्रपत्र 2 मधील मार्गदर्शक सुचनानुसार पुरवठा केलेल्या साहित्य किती प्रमाणात चाचणी तपासणी करुन घ्यावयाचे याबाबत सुचना नमुद केले आहेत. या योजनेतून खरेदी केलेल्या पाणबुडी मोटार 919 नगातून 0.5 टक्के प्रमाणे पाणबुडी मोटार तपासणी करणे आवश्यक असतांना अशाप्रकारे 5 नग तपासणी केलेली नाही अथवा चाचणी तपासणीसाठी कृषि विभागाने संबंधीत प्रयोगशाळेकडे 5 नग पाणबुडी मोटार तपासणी करणेबाबत पत्रव्यवहार तपासणीस सादर केले नाहीत. त्यामुळे खरेदी करण्यांत आलेले पाणबुडी मोटार योग्य दर्जा व गुणवत्तेचे असल्याबाबत लेखापरिक्षणात खात्री देता येत नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सीआर/2239/34/67, दिनांक 01/09/1993 नुसार सदर योजनेचा लाभ दिल्यानंतर लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये झालेल्या सुधारणाबाबत अहवाल घेतलेला नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1086/सीआर/1074/57, दिनांक 29/09/1983 अन्वये फलश्रुती अहवाल प्राप्त केलेला नाही.

5) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक विप्र/7/विघयो/अंतरिम मासू/2012-12/380/2012, दिनांक 02/05/2012 अन्वये योजनेची माहिती सर्वांना व्हावी, या दृष्टिने नमुद केलेनुसार लाभार्थ्यांना देण्यात आलेली लाभाच्या यादीस ग्रामसभेत प्रसिध्दी देण्यात आली नाही. सदर योजनेस पाहिजे तेवढ्या प्रमाणात प्रसिध्दी देण्यात आली नसल्याने योग्य व गरजू लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाल्याबाबत पडताळणी करता आले नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सीआर/2239/34/67, दिनांक 01/09/1993 नुसार गावनिहाय, कुटूंबनिहाय / लाभार्थीनिहाय व प्रवर्गनिहाय तालुकास्तरांवर व जिल्हास्तरांवर नोंदवही ठेवणेत आलेली नाही. त्यामुळे एकाच कुटूंबात दूबार लाभ दिल्याची खात्री करता आली नाही.

7) 3 एच पी पेट्रोल इंजिन पुरवठा आदेश दिनांक 19/03/2016 अन्वये 30 दिवसात (अट क्रमांक 11 प्रमाणे) करावे, असे नमुद आहे. परंतु, पंचायत समिती, कुर्ईवाडी कडील पोहोच पावतीप्रमाणे इंजिनचा पुरवठा दिनांक 30/03/2016, 2 आठवडे विलंबाचे रुपये 1,398/- दंड वसुलात आणावे.

8) योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टिने विभागीय कृषि सहसंचालक यांनी 0.75 टक्के व कृषि विकास अधिकारी यांनी 5 टक्के व जिल्हा कृषि विकास अधिकारी यांनी 10 टक्के तसेच कृषि अधिकारी, विशेष घटक योजना, पंचायत समिती स्तर यांनी 100 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. सदर तपासणीचा अहवाल पहावयास मिळाला नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2007/प्र.क्र.481/वित्त-3, दिनांक 12/10/2007 नुसार एकूण निवड झालेल्या लाभार्थ्यांच्या 3 टक्के लाभार्थी अपंग असणे आवश्यक आहे. सदर योजनेमध्ये तशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परित्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र./178, दिनांक 09/10/1997 नुसार लाभार्थ्यांस वस्तुंचे वाटप त्याच वित्तीय वर्षात व वळेत होणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. प्रत्यक्षात लाभार्थ्यांना लाभ पुढील वर्षात देण्यात आल्यामुळे योजनेचा मुळ हेतु साध्य झालेला नाही.

11) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृओ-2013/प्र.क्र.158/11 अे, दिनांक 27/09/2013 सोबतचे प्रपत्र-2 मार्गदर्शक सूचना क्रमांक 19 नुसार औजारांचे दर त्याच औजाराच्या खुल्या बाजारातील दरापेक्षा तुलनेने कमी आहे किंवा कसे? हे जाणून घेतलेची कार्यवाही केलेचे दिसून येत नाही.

12) लाभार्थ्यांचे मुळ प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध करून न दिल्यामुळे लाभार्थ्यांची निवड योग्य पद्धतीने झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

**3.632 शिल्लक साहित्याबाबत (पंचायत समिती, पंढरपूर).**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती पंढरपूरकडील सन 2015-2016 चे लेखापरीक्षणावेळी कृषी विभागास जिल्हा परिषद सेस योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या साहित्याची साठा नोंदवही नमुना नंबर 33 ची तपासणी केली असता वाटप न केल्याने शिल्लक राहिल्याचे आढळून आले.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनासाठी प्रभावी अंमलबजावणी व नियोजन विशिष्ट मुदतीत होण्यासाठी दिलेल्या कार्यक्रम पत्रिकेनुसार कार्यवाही करणेबाबत सूचित केले असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

2) सन 2015-2016 मध्ये जिल्हा परिषद सेस योजनांतर्गत प्राप्त साहित्यापैकी काही साहित्य विना वाटप पडून असल्याचे दिसून आले. सदर साहित्य त्वरित वाटप न झाल्याने जिल्हा परिषदेचे एकूण रुपये 12,74,469/- एवढी रक्कम विनाकारण गुंतून पडली आहे. तसेच साहित्य त्वरित वाटप न केल्याने खराब व ना दुरुस्त होऊन निरुपयोगी होण्याची शक्यता आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1089/प/55/34, दिनांक 05/10/1989 अन्वये वैयक्तिक लाभ देण्यात आलेल्या लाभार्धी मास्टर नोंदवही वर्षनिहाय व गावनिहाय ठेवणे आवश्यक आहे. मास्टर नोंदवही न ठेवल्यामुळे एकाच कुटुंबातील व्यक्तींना लाभ दिला आहे का? याची तपासणी करता आली नाही.

**3.633 जिल्हा परिषदसेस फंडातून 75 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना पिक संरक्षण उपाय योजना अंतर्गत ताडपत्री पुरविणे.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रूपये 14,89,806/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ताडपत्री खरेदी बाबत निविदा प्रसिध्दी दिनांक 21/12/2015 प्रमाणे दैनिक तरूण भारत वर्तमानपत्रात तसेच दैनिक अमरावती मंडल नुसार करण्यात आली. सदर जाहीर निविदा सुचनेप्रमाणे ई निविदा पध्दतीने ताडपत्री आकार 6 x 6 मीटर 450 जीएसएम आयएसआय मार्क करीता प्रति चौरस मीटर प्रमाणे ताडपत्री खरेदी करीता ई निविदा मागविण्यात आल्या. ई निविदेव्दारे ताडपत्री खरेदी प्रक्रीया मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, कृषी विकास अधिकारी तसेच महाव्यवस्थापक, जिल्हा उदयोग केंद्र अमरावती यांचे खरेदी समितीव्दारे राबविण्यात आली.

उपरोक्त ई निविदा प्रक्रीये संबंधीचे अभिलेखे तपासले असता एकुण 11 निविदा प्राप्त होवुन त्यापैकी 10 निविदाधारकांच्या निविदा ग्राह्य धरण्यात आल्या. सर्वात कमी दराची निविदा मे.लॅम्बीकॅब ॲन्ड पेपरर्स प्रा.लि.औरंगाबाद प्रति चौरस मीटर 75/- रुपये स्विकृत करण्यात आली. सदर दरास कृषी विषय समिती ठराव क्र 2, दिनांक 22/01/2016 दरास मंजुरी घेतल्याचे आढळून येते. प्राप्त झालेल्या 10 निविदा धारकांच्या नमुद केलेल्या दरांची पडताळणी केली असता चार निविदा धारकांनी प्रति चौरस मीटर प्रमाणे दर नमुद केल्याचे तर सहा निविदा धारकांनी प्रति ताडपत्री (6 x 6 मी) प्रमाणे दर नमुद केल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. याप्रमाणे निविदा धारक बॅग पॉली इंटरनॉशनल दिल्ली यांनी नमुद केलेला दर रूपये 2,167/- प्रति ताडपत्री असा नमुद आहे. तो 6 x 6 मीटर प्रमाणे रुपये 60.19 प्रती चौ.मीटर इतका येतो म्हणजेच हा दर सर्वात कमी असल्याचे निर्देशनास येते. सबब उपरोक्त प्रमाणे राबविलेली खरेदी प्रक्रीया त्रुटीपुर्ण असल्याचे दिसुन येते. त्यामुळे उद्योग, उर्जा विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 प्रमाणे खरेदी प्रक्रीया राबविण्यात

आली नाही. रुपये 60.19 इतक्या कमी दराने बाजारात ताडपत्री उपलब्ध असल्यामुळे पुरवठादारासोबत वाटाघाटी केल्या असत्या किंवा नव्याने निविदा राबविली असती तर विभागास फ़ायदा झाला असता.

2) पुरवठा पुर्व शासन मान्य संस्थेचा तपासणी अहवाल उपलब्ध झाला नाही.

3) लाभार्थी यादी मंजुरी कृषी विषय समिती सभा ठराव क्र.2, दिनांक 27/10/2015 नुसार ताडपत्री करीता 430 लाभार्थींना मंजुरी देण्यात आली. लाभार्थी यादी उपलब्ध झाली नाही. सबब 311 ताडपत्रींची खरेदी निवड यादीला कृषी विषय समितीची मंजुरी नसतांना खरेदी केली आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक परांस 1084/सीआ/ 1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार खरेदीपुर्वी लाभार्थी हिस्सा जमा करणे आवश्यक असतांना त्यापुर्वीच पुरवठा आदेश देवून साहित्य प्राप्त झाल्यानंतर लाभार्थींचे अर्ज व चलानद्वारे लाभार्थी हिस्सा भरणा करुन साहित्य वाटप केल्याचे आढळून आले आहे त्यामुळे योजनेचा उददेश सफल झाला नाही.

5) योजना राबवितांना पंचायत समिती स्तरावरुन लाभार्थीची यादी मागवून पंचायत समितीनिहाय लाभार्थीची निवड करणे आवश्यक असतांना लाभार्थी निवड यादी तपासणीकरीता उपलब्ध झाली नाही त्यामुळे लाभार्थी निवडीबाबत पडताळणी करता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2007/ प्र.क्र.4871/वित्त-3, दिनांक 05/10/2012 नुसार जिल्हा परिषद स्वउत्पन्नामधील वैयक्तीक लाभाच्या योजनेतील एकुण पात्र लाभार्थ्यापैकी 3 टक्के लाभार्थी अपंग प्रवर्गातील असावेत असे आदेश आहेत. त्यानुसार 3 टक्के अपंगाना लाभ दिल्याबाबत निवड यादी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे शासनाचे उपरोक्त आदेशानुसार कार्यवाही केल्याबाबत खात्री करता आली नाही.

7) पंचायत समिती स्तरावरील लाभार्थी अर्जाची तपासणी केली असता पंचायत समिती स्तरावर लाभार्थीचे अर्ज आवक करुन त्यास क्रमांक देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे आढळून आले नाही. तसेच लाभार्थीचे अर्जावर ग्रामपंचायतीचे शिफारसपत्र आढळून आले नाही.

8) सदर योजनेचा लाभ हा सन 2015-16 या वित्तीय वर्षात देणे आवश्यक असतांनी पंचायत समीती चांदुरबाजार, चिखलदरा, भातकुली, नांदगाव, अचलपुर, धारणी, मोर्शी, अंजनगाव, धामणगाव यांनी साहीत्याचे वाटप सन 2016-17 या वित्तीय वर्षात केलेले आहे. त्यामुळे योजनेचा उद्देश सफल झाला नसल्याचे दिसते. खुलासा करावा.

**3.634 आदिवासी उपयोजना (टिएसपी) अंतर्गत 100 टक्के अनुदानावर डिझेल इंजिन व पेट्रोडिझेल इंजिन पंपसेट पुरवण्याबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5 व 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 39,66,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकीय मंजुरी दिनांक 05/06/2015 व मार्गदर्शक सूचना दिनांक 11/04/2015 अन्वये लाभार्थ्यांची निवड महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/ प्र.क्र440/वित 9, दिनांक 20/06/2008 अन्वये परिशिष्ट ई अन्वये तरतुदीनुसार योजना राबवितांना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही करावयाची असतांना जिल्हा परिषद निवड समितीने लाभार्थ्यांची निवड अर्ज प्राप्त होण्यापुर्वी संख्यात्मक निवड केली आहेत.

2) अपंग व्यक्ती हक्कांचे सरंक्षण अधिनियम 1995 तसेच महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक अपंग 2011/प्र.क्र.011/सुधार 03, दिनांक 07/01/2001 अन्वये अपंगासाठी 3 टक्के अपंग शेतकऱ्यांची निवड करुन लाभ देणेत आलेला नाही.

3) दिनांक 11/04/2015 तांत्रिक मान्यतेच्या मार्गदर्शक तत्वानुसार परिच्छेद क्रमांक 6.3 ते 6.8 प्रमाणे शेतकरी लाभार्थ्यांना साहित्य वाटप लोकप्रतिनिधीमार्फत केल्याचे फोटो प्राप्त झाले नाही.

4) महाराष्ट्र शासन, कृषी व पशुसंवर्धन विभाग, शासन निर्णय क्रमांक 2011, दिनांक 22/11/2011 नुसार प्रपत्र 2 मार्गदर्शक सुचना क्रमांक 11 नुसार रॅन्डम पध्दतीने साहित्याची तपासणी करणे आवश्यक असतांना तसा तपासणी अहवाल उपलब्ध झाला नाही.

5) तांत्रिक मान्यतेच्या मार्गदर्शक तत्वानुसार परिच्छेद बाब 10.2 अन्वये साहित्याचे वाटप केल्यानंतर साहित्यांचे वाटप तपासणी अधिकाऱ्यांनी विभागीय कृषीसहसंचालक 0.75 टक्के, कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद 5 टक्के, कृषी अधिकारी (विघयो) पंचायत समिती 10 टक्के, कृषी अधिकारी (विघयो) पंचायत समिती स्तर 100 टक्के तपासणी करुन शेरे भेटीपुस्तकात देणे आवश्यक होते. तसा तपासणी भेटीचा अहवाल प्राप्त झाला नाही.

6) आदिवासी शेतकऱ्यांला (टिएसपी) अंतर्गत साहित्य वाटपामुळे शेतीच्या उत्पन्नात वाढ होऊन जिवनमान बदलाबाबतचा अहवाल प्राप्त झाला नाही.

7) पंचायत समिती धारणी व चिखलदरा येथील साठापंजीची तपासणी केली असता पंचायत समिती धारणीला व चिखलदराला पुरवठा आदेश अन्वये 65 नग धारणीला व 44 नग चिखलदराला डिझेल इंजिनचा पुरवठा करण्यात आला. परंतु प्रत्यक्ष पंचायत समिती स्तरावर 109 नग डिझेल इंजिन पैकी धारणीला 62 नग वाटप करण्यात आले व 3 नग डिझेल इंजिन साठा शिल्लक आहेत व चिखलदराला 44 नग वाटप करण्यात आले व 8 नग डिझेल इंजिन साठा शिल्लक आहेत. त्यामुळे धारणीचे 3 लाभार्थी व चिखलदराचे 8 लाभार्थी असे एकुण 11 लाभार्थ्यांना लाभापासून वंचीत ठेवण्यात आले. (परिच्छेद क्रमांक 5)

8) पंचायत समिती चिखलदरा येथील साठापंजीची तपासणी केली असता पंचायत समिती चिखलदराला पुरवठा आदेश अन्वये 94 नग पेट्रोडिझेल इंजिनचा पुरवठा करण्यात आला. परंतु प्रत्यक्ष पंचायत समिती स्तरावर 94 नग पेट्रोडिझेल इंजिन पैकी 83 नग वाटप करण्यात आले व 11 नग पेट्रोडिझेल इंजिन साठा शिल्लक आहेत. त्यामुळे 11 लाभार्थ्यांना लाभापासून वंचीत ठेवण्यात आले. (परिच्छेद क्रमांक 6)

**3.635 अनुसुचीत जाती/नवबौदध शेतक-यांना 100 टक्के अनुदानावर 75 MM HDPE पाईप पुरविणे.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.466/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट "ई" मध्ये नमुद केल्याप्रमाणे योजना राबविणेसंबंधी ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही होणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2007/ प्र.क्र.4871/वित्त-3, दिनांक 05/10/2012 नुसार जिल्हा परिषद स्वउत्पन्नामधील वैयक्तीक लाभाच्या योजनेतील एकुण पात्र लाभार्थ्यापैकी 3 टक्के लाभार्थी अपंग प्रवर्गातील असावेत असे आदेश आहेत. त्यानुसार 3 टक्के अपंगाना लाभ दिल्याबाबत निवड यादी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे शासनाचे उपरोक्त आदेशानुसार कार्यवाही केल्याबाबत खात्री करता आली नाही. पुर्तता करावी.

3) पंचायत समिती स्तरावरील लाभार्थी अर्जाची तपासणी केली असता पंचायत समिती स्तरावर लाभार्थीचे अर्ज आवक करुन त्यास क्रमांक देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे आढळून आले नाही. तसेच लाभार्थीचे अर्जावर ग्रामपंचायतीचे शिफारसपत्र् आढळून आले नाही

4) पंचायत समिती स्तरावर साहीत्याचा पुरवठा करतांना डिलेव्हरी मेमो नुसार पोहोच दिनांकामध्ये खाडाखोड असल्याचे आढळून येते. पंचायत समिती धारणी पोहोच दिनांक 19/02/2016 1 दिवस उशीरा साहित्य पोहचविले 608 नग पाईप, पंचायत समिती धामणगाव पोहोच दिनांक 28/02/2016 उशीरा 10 दिवस 1064 नग 45 दिवसानंतर पुरवठा करण्यात आल्यामुळे 3 टक्के दंड वसुली आवश्यक होती. सबब रुपये 8,64,424/- किंमतीच्या 3 टक्के एकुण रूपये 25,933/- शासन निर्णय दिनांक 23/11/2015 अट क्र 8 नुसार कपात करणे आवश्यक होते. सबब जादा प्रदान रक्कम रूपये 25,933/- पुरवठादाराकडून कपात होणे आवश्यक आहे.

5) सदर योजनेचा लाभ हा सन 2015-2016 या वित्तीय वर्षात देणे आवश्यक असतांनी साहित्याचे वाटप सन 2016-2017 या वित्तीय वर्षात केलेले आल्याने योजनेचा उददेश सफल झाला नसल्याचे दिसते.

6) सदर साहीत्याचा पुरवठा कोणत्या वाहनाने करण्यात आला त्या वाहनाचा वाहन क्रमांक व प्रकार साठा पुस्तकावर नमुद नसल्याने प्रत्यक्षात साहीत्याचा पुरवठा कशाने करण्यात आला याबाबत पडताळणी करता आली नाही.

7) लाभार्थ्यांचे अर्जासोबत विहीर व विज कनेक्शन असल्याबाबतची अभीलेखे जोडण्यात आलेले नाहीत व ब-याच लाभार्थ्यांच्या अर्जासोबत करारनामे तथा पोचपावत्या नाहीत.

**3.636 विशेष घटक योजने अंतर्गत नॅप सॅक स्प्रेअर पंप पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** याबाबत रक्कम रूपये 13,09,000/- खर्च करण्यात आला असून यावर पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) आयुक्तालय, पुणे यांचे उपरोक्त मार्गदर्शक सुचना नुसार विशेष घटक योजनेअंतर्गतची लाभार्थीची एकूण संख्या 1190 असून नॅपसॅक स्प्रेअर पंप ची दरकरारनुसार किमत रुपये 1,266/- असून लाभार्थीना अनुदानाची मर्यादा फक्त रुपये 1,100/- असल्याने उर्वरित पंपाची किमत रुपये 166/- लाभार्थीकडून वसुली करणे अपेक्षीत होते व त्याप्रमाणे प्रत्येक लाभार्थीची उर्वरित रक्कम लाभार्थी स्वत:हून भरण्यास तयार असलेबाबत लेखी संमतीपत्र घेणे अपेक्षीत असतांना त्याप्रमाणे पंचायत समितीनिहाय नस्तीत लावण्यात आले नाही.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपी/2008/प्र.क्र.446/विस-9, दिनांक 20/06/2008 मध्ये नमुद तरतुदी नुसार योजनेच्या लाभार्थी निवडी पासुन ते लाभ देणे पर्यतचे वेळापत्रकानुसार कालमर्यादा पाळण्यात आल्या नाहीत.

3) महाराष्ट्र शासन, कृषी आयुक्तालय, पुणे दिनांक 04/10/2013 च्या मार्गदर्शक सुचनेतील क नुसार औजारांच्या वाटपानंतर प्रत्येक लाभार्थ्यांकडून अवजार सुस्थितीत मिळाल्याचे लेखी प्रमाणपत्र घ्यावे व त्याची अभिलेख्यात नोंद घ्यावे. तसे नस्तीत आढळले नाही.

4) सर्व पंचायत समिती अंतर्गत लाभार्थीची निवड यादी प्राप्त झाली नाही त्यामुळे दुबार लाभार्थी व त्याच निवड लाभार्थी यादी नुसार लाभार्थ्याना लाभ झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

5) कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मस्त्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय दिनांक 22/11/2011 नुसार प्रपत्र 2 मार्गदर्शक सुचना मुद्दा क्रमांक 11 नुसार रॅडम पध्दतीने अवजारांची तपासणी करणे आवश्यक असतांना तसा तपासणी अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

6) पंचायत समिती बाळापूर येथील लाभार्थी संख्या 195 x 166 = रुपये 32,370/- लाभार्थी हिस्स्याचा चेक पंचायत समितीने कृषी विकास अधिकारी यांचे नावे देण्यात आलेला आहे. परंतु, सदर लाभार्थी हिस्सा पुरवठाधारकास दिल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास आढळले नाही.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/1239, दि.01/09/1993 व परिपत्रक क्रमांक मागास-2002/प्र.क्र.78/का-1412, दिनांक 07/08/2003 अन्वये सदर योजनेचे मुल्यमापन व फलश्रुती अहवाल आढळला नाही.

**3.637 जिल्हा परिषद उपकर निधीतुन 90टक्के अनुदानावर सर्वसाधारण शेतकऱ्यांना पॉवर स्प्रे पंप पुरविण्याच्या योजनेतील अनियमीतेबाबत. (वाढीव योजना)**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** याबाबत रक्कम रूपये 12,85,200/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र 446/वित्त- 9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषदांनी योजना राबविताना विहीत वेळापत्रकानुसार योजना राबविणेबाबत शासनाचे निर्देश आहेत. सदर परिपत्राकातील परिशिष्ट ई नुसार जिल्हा परिषदेच्या वैयक्तिक लाभांच्या

योजनाकरीता वेळापत्रक विहीत करण्यात आलेले असुन त्याप्रमाणे योजना राबविण्याची कार्यवाही न झाल्यामुळे शासन निर्देशाचा भंग झाला आहे.

2) पॉवर स्प्रे पंप साहीत्याचा पुरवठा पंचायत समितीस्तरावर करण्यात आलेला आहे. पंचायत समिती स्तरावरील साठा पुस्तकांची पडताळणी केली असता, पॉवर स्प्रे पंप वाटप सन 2014-2015 पर्यंत त्याच आर्थिक वर्षात करण्यात आलेले दिसुन येत नाही. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1096/प्र.क्र.178/05 दिनांक 09/10/1997 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.41/33, दिनांक 17/01/2001 मध्ये नमुद केलेल्या कालावधीत साहीत्याचे वितरण न झाल्यामुळे सदर आदेशाचे उल्लंघन केले असून नियमबाहयता झालेली आहे. तरी नियमबाहयतेबाबत खुलासा करण्यात यावा. तसेच सदर योजनेचे लाभार्थीचे अर्ज व अभिलेखे पडताळणी केले असता तसेच साहित्याचे वाटपा संबधीचे अभिलेखे पडताळणी केले असता, या परीच्छेदासोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार त्रुटया/ अनियमितता आढळून आलेल्या आहेत. तरी सदर त्रुटया/ अनियमितता परीपुर्तीसह सप्रमाण अनुपालन दाखवावे.

3) निवड केलेल्या लाभार्थी यादीमध्ये 3टक्के अपंग लाभार्थ्यांची निवड करणे आवश्यक असुन एकुण लाभार्थी 280 च्या 3 टक्के नुसार 8 अपंग लाभार्थ्यांची निवड करुन त्यांना योजनेचा लाभ देणे आवश्यक असतांना तशा प्रकारे कार्यवाही करण्यात आलेली आहे किंवा कसे, याबाबत कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणास पहावयास मिळाले नाही. खुलासा करावा.

4) लाभार्थ्यांचे गावनिहाय मास्टर रजिस्टर ठेवण्यात आले नाही. त्यामुळे संबंधीतांनी योजनेचा लाभ यापुर्वी व इतर योजनामधुन घेतला नसल्याची खात्री करता आली नाही. सबब संबंधीतांनी दुबार लाभ घेतला नसल्याचे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

5) पंचायत समिती बार्शिटाकळी, तेल्हारा व बाळापुर येथील संबधीत योजनेचे अर्ज, साठापुस्तके व संबधीत अभिलेखे लेखापरीक्षणात वारंवार तोंडी तसेच लेखी अर्धसमास पत्र देऊन उपलब्ध् करण्यात आले नाही. त्यामुळे सदर योजनेचा लाभ सदर विभागातील शेतक-यांना झाला किंवा कसे, याबाबत पडताळणी करता आली नाही. तसेच सदर साहित्य शिल्लक असून लाभार्थी लाभापासुन वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**3.638 अपारंपारीक उर्जास्त्रोत कार्यक्रमांतर्गत वितरीत सौर उर्जा दिवे लावणेबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 17) -** याबाबत रक्कम रूपये 8,79,138/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए /2008/प्र.क्र. 446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 परिशिष्ट (इ) नुसार जिल्हा परिषदांनी वैयक्तिक लाभाच्या योजना राबवितांना योग्य वेळापत्रकानुसार योजना राबविल्याचे दिसुन येत नाही. नियम बाहयतेबाबत खुलासा व्हावा.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1086/5534, दिनांक 05/10/1989 नुसार मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तसे केले नाही.

3) उद्योग, उर्जा विभाग शासन निर्णय दिनांक 11/09/2007 नुसार 10 टक्के लाभार्थी हिस्सा वसुली केल्याबाबत अनुपालन दर्शवावे.

4) पुरवठा आदेशातील अटी व शर्ती नुसार एकुण रक्कम रुपये 9,76,820/- या रकमेवर 10 टक्के रक्कम रुपये 97,682/- 1 वर्षापर्यंत सुरक्षा ठेव म्हणुन ठेवणेबाबत नमुद आहे. मात्र विभागाने रुपये 8,79,138/- वर 10 टक्के रक्कम रुपये 87,913/- एवढी रक्कम सुरक्षा ठेव कपात केली आहे. तफावतीची रक्कम रुपये 9,769/- कमी कपात केल्याचे स्पष्ट होते. कमी कपातीचे रक्कमेबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन अनुपालन दर्शवावे. अनियमिततेबाबत खुलासा करावा.

5) पुरवठा आदेश क्रमांक 1516 दिनांक 24/08/2015 नुसार पुरवठा दिनांक 30/09/2015 पर्यंत करणे आवश्यक आहे. अन्यथा विलंबावर प्रति आठवडा 0.5 टक्के प्रमाणे दंडाची रक्कम वसुल करण्यात यावी. असे नमुद

असतांना ग्रामपंचायतींना विलंबाने पुरवठा करण्यात आला असल्याने संबंधीताकडुन 0.5 टक्के दंडाची परीगणीत करुन संबंधीताकडुन येणारी रक्कम वसुल करावी.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पीआरसी 1083/67 दिनांक 02/07/1993 नुसार लाभार्थी ग्रामपंचायतींकडुन विनियोग प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना तसे केले नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1082/645/34 दिनांक 29/07/1989 अन्वये उपयोगीता प्रमाणपत्र मुल्यमापन अहवाल सादर करण्यात आला नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 50 (4) नुसार नमुना नमुना 10 ची पावती देणे आवश्यक असतांना तशा प्रकारची पावती नस्तीत आढळली नाही.

**3.639 पर्यावरण संतुलित समृध्द योजना अंतर्गत 90 टक्के अनुदानावर ग्रामपंचायतींना पथदिवे वाटप योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रूपये 9,73,761/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक अपारु 2007/ प्र.क्र.5901 उर्जा -7, दिनांक 11/09/2007 अन्वये 10 टक्के लाभार्थी हिस्सा प्रथम जमा करणे आवश्यक आवश्यक आहे व त्यांतर पुरवठा आदेश देणे आवश्यक आहे. परंतु, उपरोक्त विवरणातील माहिती अन्वये अदयापपर्यत पंचायत समिती, वाशिम मधील 15 ग्रामपंचायत व पंचायत समिती, मानोरा मधील 90 ग्रामपंचायतीने लाभार्थी हिस्सा भरणा करण्यात आला नाही. करीता 105X169=17,745/- वसुल करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. करीता रुपये 17,745/- वसुल करण्यात यावी.

2) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक अपारु 2007/ प्र.क्र.5901 उर्जा -7, दिनांक 11/09/2007 अन्वये सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी 5,000 व त्यावरील लोकसंख्येची तसेच शासनाच्या विविध कार्यक्रमात जसे संत गाडेगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, अक्षय प्रकाश योजना व दरकरात नमुद केल्याप्रमाणे तंटामुक्ती, पर्यावरण संतुलन ग्राम योजना, हगणदरीमुक्त योजनेत सहभाग घेतलेली गावे प्राथम्याने निवड करण्यात यावी, असे नमुद आहे. परंतु, लेखापरिक्षणास ग्रामपंचायत निवडीबाबतचे अभिलेखे अर्धसमास पत्र क्रमांक 3/12/05/2017, 8/18/05/2015,11/22/05/2017 मागणी करुनही उपलब्ध् करुन देण्यात आले नाही. करीता ग्रामपंचायतीची निवड कशा प्रकारे केली? याची पडताळणी करता आली नाही. याबाबत खुलासा करावा.

3) दरकरारातील अट क्रमांक 4 अन्वये दरकरारधारक हे सदर योजनेतील फिटिग्जची स्थापना व इतर संबंधित कामे सार्वजनिक बांधकाम विभाग (विदयुत) यांचेकडील नोंदणीकृत विदयुत ठेकेदाराकडुन करतील. परंतु, लेखापरिक्षणास पथदिव्यांची स्थापना नोंदणीकृत विदयुत ठेकेदाराकडुन केल्याबाबत ठेकेदाचे नोंदणी प्रमाणपत्र लेखापरिक्षणास सादर केले नाही. ग्रामपंचायतीने फक्त सरपंच/ सचिव यांचे स्वाक्षरीने पथदिवे आस्थापित केल्याचे प्रमाणपत्र दिले. परंतु, नोंदणीकृत ठेकेदाराचे प्रमाणपत्र उपलब्ध् झाले नाही

4) दरकरारातील अट क्रमांक 5 अन्वये चाचणी देणे आवश्यक आहे. परंतु, पुरवठा पुर्व व पुरवठा नंतरचा चाचणी अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही. करीता साहित्य SPECIFICATION प्राप्त झाल्याबाबत खात्री पटत नाही. त्याचप्रमाणे साहित्याची चाचणी दिल्याबाबतचे अभिलेखेही उपलबध् झाले नाही. करीता एकुण कामाच्या किमतीच्या 5 टक्के रक्कम दंड आकारेल परंतु विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. करीता रुपये 11,10,330/- च्या 5 टक्के रुपये 55,517/- दंड आकारणे आवश्यक आहे. सदर रक्कम वसुल करुन शासनखाती भरणा करण्यात यावी.

5) अट क्रमांक 11 अन्वये जिल्हा परिषद एकुण पुरवठा आदेशाच्या 10 टक्के रक्कम सुरक्षा अनामत म्हणुन ठेवुन घेतील एक वर्षाच्या हमी कालावधी याशस्वीरित्या पुर्ण केल्यानंतर जिल्हा परिषद दरकरारधारकास परत करतील. विभागाने प्रमाणकात 10 टक्के सुरक्षा ठेव कपात रुपये 1,11,033/- दर्शविण्यात आली. परंतु, प्राप्त अनुदान 90 टक्के रुपये 9,99,297/- व लाभार्थी हिस्सा 10 टक्के - रुपये 1,11,033/- एकुण रुपये 11,10,330/-

पैकी 10 टक्के रुपये 1,11,033/- व 2.30 आयकर रुपये 25,536/- कपात करुन पुरवठादरास रुपये 9,73,761/- अदा केले. परंतु, दिनांक 23/06/2015 ला लाभार्थी हिस्सा जमा करण्यात आला नव्हता. म्हणजे 10 टक्के सुरक्षा ठेव जमा ठेवण्यात आली नाही. फक्त प्रमाणकात दर्शविण्यात आले आहे. नियमबाहयतेबाबत खुलासा करावा.

6) योजनेच्या अंमलबजावणी बाबत अट क्रमांक 1 अन्वये फिटिग्जची आस्थापना करतांना मेन स्विच आस्थापित करावा. परंतु, सार्वजनिक बांधकाम विभाग (विदयुत) यांचेकडील नोंदणीकृत विदयुत ठेकेदाराचा INSTALLTION REPORT उपलब्ध् झाला नाही. करीता मेन स्वीच आस्थापीत केल्याबाबत खात्री पटत नाही. खुलासा करावा.

7) निधीचा खर्च व जबाबदारी मधील अट क्रमांक 1 अन्वये अनुदान दिनांक 31/05/2015 पर्यंत खर्च करावयाची जबाबदारी जिल्ही परिषदेची राहिल. परंतु, खर्च दिनांक 31/05/2015 नंतर नियमबाहयपणे करण्यात आला. याबाबत खुलासा करावा.

9) अर्थसहाय्य खर्च झाल्यानंतर निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र महा उर्जास न चुकता पाठविण्यात यावे. परंतु, असे प्रमाणपत्र पाठविल्याबाबत अभिलेखे लेखापरिक्षणास उपलबध् केला नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक-परांस 1084/सीआ/1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार खरेदीपुर्वी लाभार्थी हिस्सा जमा करणे आवश्यक असतांना विभागाने ग्रामपंचायतीने लाभार्थी हिस्सा चलान दिनांक 24/08/2015 ला भारणा केला आहे. परंतु, ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्रान्वये दिनांक 23/05/2015 ते 26/5/2015 पथदिवे आस्थापित करण्यात आले. यावरुन लाभार्थी हिस्सा भरणा करण्यापुर्वी पुरवठा करण्यात आला. याबाबत खुलासा करण्यात यावा.

11) ग्रामपंचायत लोणी खुर्द तालुका रिसोड जिल्हा वाशिम यांना पर्यावरण संतुलित समृध्द योजना व ओ.टी.एस.पी. मधुन पथदिवे वाटप करण्यात आले. एकाच ग्रामपंचायतीला दुबार लाभ देण्यात आला. याबाबत खुलासा करावा.

12) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक-पीआरसी-1089/प्र.क्र.55, दिनांक 05/10/1989 अन्वये योजनेची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना योजनेची मास्टर नोंदवही तपासणी करीता उपलब्ध झाली नाही.

## 3.640 अनुसुचित जाती उपयोजना अंतर्गत फवारणी पंप वाटप. (हस्तचलित)

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदर बाबत रक्कम रूपये 1,70,910/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सकृऔ/2013/ प्र.क्र.158/11-अे, दिनांक 27/09/2013 मधील अट क्रमांक 2 व 10 नुसार पुरवठा पुर्व गुणवत्ता तपासणी अहवाल दिल्याशिवाय पुरवठा संस्थाने अवजारांचा पुरवठा करु नये, असे नमुद असतांना पुरवठा पुर्व गुणवत्ता तपासणी अहवाल न देताच नियमबाहयपणे पुरवठा करण्यात आला.

2) अट क्रमांक 8 अन्वये औजारांची मागणी नोंदविल्यानंतर 45 दिवसांच्या कालावधीत अवजारांचा पुरवठा करण्याची जबाबदारी संबंधित पुरवठा संस्थांची राहिल. त्यानंतर केलेल्या पुरवठयावर एकुण किंमतीच्या 3 टक्के दंडाची वसुली करणे आवश्यकता असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. पुरवठा आदेश दिनांक 11/036/2015 प्राप्त दिनांक डिलेव्हरी चलान अन्वये दिनांक 24/08/2015 ला दिला. तसेच पंचायत समिती, रिसोड यांचे साठा पुस्तकाअन्वये पान क्रमांक 19 दिनांक 10/07/2015 ला प्राप्त करीता 3 टक्के रककम 5,127/- करुन शासनखाती भरणा करण्यात यावी.

3) अट क्रमांक 11 व 12 अन्वये क्षेत्रीयस्तरावर नमुने संबंधित अधिकाऱ्यानी रॅन्डम पध्दतीने काढुन पुरवठादारास देणे आवश्यक व नमुने काढल्याबाबत व संबंधित संस्थेस पाठविल्याबाबत अभिलेखे आढळले नाही. नमुने काढल्यानंतर 30 दिवसाच्या नमदतीत नमुने तपासणी अहावला देणे पुरवठादारस देणे आवश्यक राहिल. परंतु, पुरवठा पाश्चात गुणवत्ता तपासणी अहवाल के. के. वाघ कॉलेज, वाशिम यांचे पत्र क्रमांक 207/210/211/

10/07/2016 ला प्राप्त झाला. परंतु, पुरवठा त्यानंतर प्राप्त झाला. याबाबत खुलासा करावा. नमुने तपासणीस दिल्याबाबत खात्री पटत नाही

4) अट क्रमांक 16 अन्वये क्षेत्रीय अधिकाऱ्याने कोणत्याही परिस्थितीत आवश्यकतेपेक्षा अधिक औजारांची मागणी नोंदवु नये, असे नमुद असतांना पंचायत समिती, वाशिम यांची मागणी 28 फवारणी पंपाची असतांना 34 नगांचा पुरवठा आदेश देण्यात आला. तसेच पंचायत समिती, रिसोड यांची मागणी 52 व पुरवठा 52 नगांचा करण्यात आला. परंतु, त्यांना कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांचे पत्र क्रमांक कृषी/विघयो/230/2016, दिनांक 10/02/2016 नुसार 25 नग, कृषी अधिकारी पंचायत समिती, वाशिम यांना दिले. परंतु, त्याबाबत वाशिम पंचायत समिती यांचे साठा नोंदवहीची तपासणी केली असता याबाबत नोंद घेवुन वितरण केल्याबाबत नमुद नाही. करीता 25 नग वितरीत केल्याची खात्री पटत नाही. तसचे पंचायत समिती, रिसोड यांचा येथील 1 नग विनावितरण पडुन आले व पंचायत समिती, वाशिम यांना 6 नगांचा पुरवठा जादा करण्यात आला. असे एकुण 32 नगांचा पुरवठा आदेश जादा देण्यात आला. करीता तेवढया जादा रकमेचा शासनावर अधिभार पडला करीता मागणी नोंदविणाऱ्या अधिकाऱ्याकडुन 32x1266=40,512/- रुपये वसुल करुन शासनखाती भरणा करण्यात यावे.

5) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक विघयो -1514/ प्र.क्र.97/4 अे, दिनांक 07/07/2014 मधील परिशिष्ट 3 मधील अट क्रमांक 10 मधील 10 अन्वये लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या बाबवार अर्थसहाय्याची योजना निहाय, बाब निहाय व लाभार्थी निहाय नोंद करण्याकरीता पंचायत समिती स्तरावर व जिल्हा परिषद स्तरावर रजिस्टर ठेवण्यात यावी. त्याची तपासणी जिल्हा कृषी अधिकारी, विशेष घटक योजना, कृषी विकास अधिकारी यांनीही नोंदवहया तपासणी करण्यात यावी. परंतु, अशा प्रकारची नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही. लाभार्थ्यांना पुर्ण अर्थसहाय्य देण्यात आल्याबाबत शहानिशा करता आली नाही. पंचायत समिती स्तरावरील साठा नोंदवहीची तपासणी केली असता वाशिम पंचायत समितीला मागणी केलेल्या 13 लाभार्थींना लाभ न देता नियमबाहयपणे मागणी नसणाऱ्या लाभार्थींना लाभ दिल्याचे निदर्शनास आले.

6) जावक क्रमांक जिपवा कृषी/विघयो/434/2016/ कार्यालय कृषी, जिल्हा परिषद, वाशिम दिनांक 31/03/2016 ला धनादेश क्रमांक 341247/31/03/2016 पुरवठादारास पाठविण्यात आला. परंतु, पोच पावती अप्राप्त आणि पुरवठा दाराचे पत्र महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महामंडळ मर्यादित विभागीय कार्यालय यांचे पत्र क्रमांक विकाअ /कृअक्र2016/864, दिनांक 28/07/2016 अन्वये रुपये 1,70,910/- रककम येणे बाकी असे नमुद आहे. करीता संबंधितास धनादेश प्राप्त झाल्याबाबतची खात्री पटत नाही. तफावतीबाबत खुलासा करावा.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरसी-1089/प्र.क्र.55/ दिनांक 05/10/1989 अन्वये योजनेची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना योजनेची मास्टर नोंदवही तपासणी करीता उपलब्ध झाली नाही.

8) संचालक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक विप्र.7/आक्र.यो/ अंमरिम.मासु/ 459/2014-15, दिनांक 31/05/2014 मधील तरतुदीनुसार योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टीने सहसंचालक यांनी योजनेची 75 टक्के कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी 5 टक्के कृषी विकास अधिकारी (विशेष घटक योजना) यांनी 10 टक्के तथा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) पंचायत समिती यांनी योजनेची 100 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आल्याबाबतचा अहवाल दप्तरी तपासणी करिता उपलब्ध झाला नाही.

**3.641 अनुसुचित जाती उपयोजना अंतर्गत इलेक्ट्रिक मोटार पंप वाटप खर्चातील अनियमितेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रूपये 32,80,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संचालक, कृषी आयुक्तालय, पुणे यांचे आदेश क्रमांक 210 दिनांक 11/04/2015 मधील परिशिष्ट एक नुसार बाबनिहाय अनुज्ञेय उच्चतम अनुदान मर्यादेच्या अधिन राहुन 20,000/- रुपये लाभ देय व वस्तुची किंमत त्यापेक्षा जादा असल्यास उर्वरित रककम लाभार्थीकडुन घेण्यात यावी. त्यानुसार इलेक्ट्रीक मोटारपंप किंमत रुपये 21,000/- देय रक्कम रुपये 20,000/- उर्वरित रुपये 1,000/- प्रति लाभार्थीकडुन भरणा करणे आवश्यक आहे. परंतू, पंचायत समिती, वाशिम, रिसोड, मानोरा यांनी संबंधित पुरवठादरास चलानव्दारे सदर रक्कम भरणा केल्याबाबत दस्ताऐवज दाखविले नाही. करीता त्यांना सदर रक्कम भरणा केल्याबाबत खात्री पटत नाही. करीता पंचायत समिती वाशिम 28 नग x 1000/- = 28,000/- , रिसोड - 35 नग x 1,000/- = रुपये 35,000/- व मानोरा 3 नग x1,000/- = रुपये 3,000/- असे एकुण रुपये 66,000/- भरणा केले नाही. करीता वसुल करण्यात यावे. पुरवठा आदेश देण्यापुर्वीच लाभार्थ्यांकडुन सदर रककम वसुल करणे आवशयक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

साठा नोंदवही नुसार पुरवठा प्राप्त दिनांक 28/03/2016 ते 31/03/2016 नुमुद व पंचायत समिती, मालेगाव मंगरुळपिर व कारंजा यांनी माहे जुन 2016 ला चलान भरणा केल्याचे निदर्शनास येते नियमबाहयतेबाबत खुलासा करावा.

2) निवडक लाभार्थी अर्जाची तपासणी केली असता एकाच कुटुंबातील लाभार्थ्यांना लाभ दिल्याचे निदर्शनास आले. परंतु, त्यांची कुटुंब विभक्त असल्याबाबतचे दस्ताऐवज निदर्शनास आले नाही. करीता इतर लाभार्थी लाभापासुन वंचित राहिल्याचे निदर्शनास येते.

3) महाराष्ट्र शासन, कृषी, पशूसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक विघयो -1514/ प्र.क्र.97/4 अे, दिनांक 07/07/2014 मधील परिशिष्ट 3 मधील अट क्रमांक 10 मधील 10 अन्वये लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या बाबवार अर्थसहाय्याची योजना निहाय, बाब निहाय व लाभार्थी निहाय नोंद करण्याकरीता पंचायत समिती स्तरावर व जिल्हा परिषद स्तरावर रजिस्टर ठेवण्यात यावी. त्याची तपासणी जिल्हा कृषी अधिकारी, विशेष घटक योजना व कृषी विकास अधिकारी यांनीही नोंदवहया तपासणी करण्यात यावी. परंतु, अशा प्रकारची नोंदवही लेखापरिक्षणास उपलबध् करुन देण्यात आली नाही. करीता लाभार्थ्यांना पुर्ण अर्थसहाय्य देण्यात आल्याबाबत शहानिशा करता आली नाही. पंचायत समिती स्तरावरील साठा नोंदवहीची तपासणी केली असता काही पंचायत समितीला मागणी केलेल्या लाभार्थीना लाभ न देता नियमबाहयपणे मागणी नसणाऱ्या 36 लाभार्थीना लाभ दिल्याचे निदर्शनास आले.

4) संचालक, कृषी आयुक्तालय, पुणे यांचे आदेश क्रमांक 210, दिनांक 11/04/2015 मधील सुचना अन्वये सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता व विदयुत कनेक्शन लाभधारकाकडे असल्याची खात्री कृषी अधिकारी, पंचायत समिती यांनी करावी व त्यानुसार लाभ दयावा. परंतु, लाभार्थ्यांच्या अर्जासोबत विदयुत कनेक्शन असल्याबाबत दस्ताऐवज लेखापरिक्षणास उपलब्ध् झाले नाही. विदयुत कनेक्शन असल्याबाबतची खात्री पटत नाही. याबाबत खुलासा करावा.

5) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सकृऔ/2015/ प्र.क्र.218/11-अे, दिनांक 23/11/2015 अट क्रमांक 11 व 12 अन्वये क्षेत्रीयस्तरावर नमुने संबंधित अधिकाऱ्यानी रॅन्डम पध्दतीने काढुन पुरवठादारास देणे आवश्यक व नमुने काढल्याबाबत व संबंधित संस्थेस पाठविल्याबाबत अभिलेखे आढळले नाही.

6) महाराष्ट्र शासन, कृषी, पशूसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक विघयो -1514/ प्र.क्र.97/4 अे, दिनांक 07/07/2014 मधील परिशिष्ट 3 मधील अट क्रमांक 10 मधील 10 अन्वये लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या बाबवार अर्थसहाय्याची योजना निहाय , बाब निहाय व लाभार्थी निहाय नोंद करण्याकरीता पंचायत समिती स्तरावर व जिल्हा परिषद स्तरावर रजिस्टर ठेवण्यात यावी. त्याची तपासणी जिल्हा कृषी अधिकारी, विशेष घटक योजना व कृषी विकास अधिकारी यांनीही नोंदवहया तपासणी करण्यात यावी. परंतु, अशा प्रकारची नोंदवही लेखापरिक्षणास उपलबध् करुन देण्यात आली नाही. करीता लाभार्थ्यांना पुर्ण अर्थसहाय्य देण्यात आल्याबाबत शहानिशा करता आली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक-पीआरसी-1089/प्र.क्र.5, दिनांक 05/10/1989 अन्वये योजनेची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना योजनेची मास्टर नोंदवही तपासणी करीता उपलब्ध झाली नाही.

8) संचालक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक विप्र.7/आक्र.यो/ अंमरिम.मासु/ 460/ 2014-15, दिनांक 02/06/2014 मधील तरतुदीनुसार योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टीने सहसंचालक यांनी योजनेची 75 टक्के कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी 5 टक्के कृषी विकास अधिकारी (विशेष घटक योजना) यांनी 10 टक्के तथा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) पंचायत समिती यांनी योजनेची 100 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आल्याबाबतचा अहवाल दप्तरी तपासणी करिता उपलब्ध झाला नाही.

**3.642 अनुसुचित जाती उपयोजना अंतर्गत डिझल इंजिन खरेदी (विशेष घटक योजनाअंतर्गत) बाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदर बाबत रक्कम रूपये 46,60,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1)सन 2014-2015 व 2015-2016 या वित्तीय वर्षात निवड झालेल्या लाभार्थांना दोन वर्षाचे कालावधित कामास देय अनुदानाचे मर्यादेपर्यंत लाभार्थाच्या गरजेनुसार पुर्ततः डिझेल इंजिन चा लाभ देण्यात आलेला आहे. त्या संदर्भात नस्तीमधील कागदपत्राची पडताळणी करतांना पंचायत समिती, वाशिम यांना सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे डिझल इंजीन एकुन नग 55 देण्यात आले आहे. परंतु, याबाबत पंचायत समिती, वाशिम यांनी याबाबत अभिलेखे सादर करण्याबाबत अर्धसमास पत्र 1 ते 11 दिनांक 08/05/2017 ते 22/05/2017 पर्यंत देण्यात आले असुनसुदधा लेखापरिक्षणास तपासणीस सादर केले नाही. त्यामुळे या योजनेचा उददेश सफल झाला किंवा नाही, यांची खात्री करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.440/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 मधिल परिशिष्ट ई मध्ये नमुद केल्यानुसार योजना राबविणे संबंधी ठरवुन दिलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. झालेल्या नियमबाहयतेबाबतचा खुलासा होणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक-पंरास 1084/ सीआर/ 1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार खरेदीपुर्वी लाभार्थी हिस्सा जमा करणे आवश्यक असतांना त्यापुर्वीच पुरवठा आदेश देवुन साहित्य प्राप्त झाल्यानंतर लाभार्थीचे अर्ज व चलानद्वारे लाभार्थी हिस्सा भरणा करुन साहित्य वाटप केल्याचे आढळुन आले आहे.

4) शासनाचे दिनांक 23/11/2015 च्या मार्गदर्शक सुचनेनुसार महाराष्ट्र राज्य, कृषी उघोग विकास महामंडळ या शासन नियुक्त पुरवठा संस्थेने व कृषी विद्यापीठाने पुरवठा केलेल्या साहित्याची गुणवत्ता तपासणीकरीता स्वतःची गुणवत्ता नियंत्रण यंत्रणा तसेच पुरवठा संस्थानी कृषी साहित्याची पुरवठा पुर्व व पुरवठा पश्चात गुणवत्ता तपासणी करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. तसेच तपासणी केलेल्या साहित्याचाच पुरवठा आदेशानुसारच साहित्याचा पुरवठा करण्यात आला किंवा कसे, याबाबतची खात्री करता आली नाही.

5) शासनाने वर निश्चित केलेले डिझल इंजिनचा लाभार्थाना लाभ देण्यापुर्वी लाभार्थाकडे सिंचना-साठी पाण्याची उपलब्धता असल्याची खात्री कृषी अधिकारी पंचायत समिती यांनी करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच दस्तऐवज तपासणीस उपलब्ध झाले नाही.

6) ऑईल इंजीनचा लाभार्थाना लाभ देणेसंबंधी पंचायत समितीचे स्तरावरुन लाभार्थाच्या मागणी अहवालाची पडताळणी करतांना कोणत्याही पंचायत समितीचे स्थरावरुन मागणी अहवालावर मागणी सादर करण्यात आल्याबाबतचा आवक क्रमांक व दिनांक नमुद करण्यात आला नसल्यामुळे साहित्याची मागणी चालु वित्तीय वर्षातच करण्यात आली किंवा कसे, याबाबतची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे साहित्याची निवडीबाबतची बाबत स्पष्ट

होत नाही. पर्यायाने मागणी नसतांना साहित्याची खरेदी करुन पुरवठा करण्यात आला असल्यामुळे नियमबाहय शासनाच्या निधिचा दुरुपयोग करण्यात आल्याबाबतची शक्यता नाकारता येत नाही. या बाबतचे स्पष्टीकरण सादर करावे.

7) पुरवठा दाराचे स्तरावरुन पंचायत समिती स्तरावर पुरवठा केलेल्या डिझल इंजिन साहित्याचे डिलिव्हरी मेमो तपासले असता, त्यावर दिनांक नमुद करण्यात आला नसल्यामुळे पुरवठा आदेशानुसारच विहित कालावधीत साहित्याचा पुरवठा करण्यात आला किंवा कसे, याबाबतची पडताळणी करता आली नाही. शासन निर्णय दिनांक 27/11/2015 मधिल मागदर्शक सुचना नुसार बाब क्रमांक 8 मध्ये नमुद केल्यानुसार विहित कालावधित साहित्याचा पुरवठा करण्यात आला नसल्यास साहित्याच्या किंमतीच्या 3 टक्के रक्कम दंडात्मक वसुली म्हणुन पुरवठादाराच्या देयकामधुन एकरक्कमी वसुल करणे आवश्यक आहे. तथापी, त्याप्रमाणे कार्यवाही करुन सप्रमाण खात्री पटवावी.

8) वरील योजनेची नस्तीची तपासणीअंती नस्तीसोबत लाभार्थी निवडीची यादी जोडण्यात आली आहे. परंतु, त्या यादीतील लाभार्थांना लाभ न देता इतर 8 लाभार्थांना लाभ देण्यात आला आहे.

9) श्री.अनिल लक्ष्मण भागत या लाभार्थाला साठा रजिस्टरला पान क्रमांक 101वर अनुक्रमांक 16 अनुक्रमांक 1 वर एकाच लाभार्थाचे नांव दर्शवुन लाभ देण्यात आला आहे. तसेच श्री. सुरेश माणिक कांबळे रा. कळंबा यांना सुदधा दोनदा लाभ दिल्याचे साठा पुस्तकावरुन दिसुन येत आहे. तरी साहित्याची किंमत रुपये 20,000 X 2 = रुपये 40,000/- वसुल पात्र ठरते.

10) लाभार्थ्यांना देण्यात येणा-या बाबवार अर्थसहाय्याची योजनानिहाय बाबनिहाय व लाभार्थीनिहाय नोंद करण्याकरीता पंचायत समिती स्तरावर रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे व त्यामध्ये लाभार्थाना देण्यात आलेल्या अनुदानाची बाबनिहाय नोंद ठेवण्यात यावी. तथापि, तशी नोंदवही तपासणी करीता उपलब्ध झाली नाही. तसेच कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद स्तरावर लाभार्थांना देय व देण्यात आलेला लाभ घटकाची नोंद नोंदवहीत ठेवणे आवश्यक आहे. परंतु, तशी नोंदवही ठेवण्यात आल्याबाबत दप्तरी तपासणीस उपलब्ध झाली नाही. तसेच सदरच्या नोंदवहीची तपासणी जिल्हा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना)यांनी स्वांक्षाकीत करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे पंचायत समिती स्तरावरील नोंदवहया व अभिलेखे जिल्हा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) यांनी तपासुन तशी नोंद नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. तसेच कृषी विकास अधिकारी यानी पंचायत समिती स्तरावरील व जिल्हा परिषद स्तरावरील प्रत्येक नोंदवहीची तपासणी करणे आवश्यक आहे. तसेच तपासणी केल्याबाबतचे अभिलेखे दप्तरी उपलब्ध झाले नाही.

### 3.643 अपारंपारीक उर्जा कार्यक्षम पथदिवे योजना राबविणेबाबत.

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रूपये 9,76,820/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उघोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक अप्राऊ-2007/प्र.क्र.590/ उर्जा-7, दिनांक 11/09/2007 अन्वये अनुक्रमांक 3 मधिल वरील शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे सदर योजनेची अंमलबजावणी रुपये 5,000/- व त्यावरील जास्त लोक संख्येची गावे, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, अक्षय प्रकाश योजना यात सहभाग घेतलेली गावे, तंटामुक्त, पर्यावरण संतुलीत समुदध ग्राम योजना, हगनदारी मुक्त योजनेत सहभाग घेतलेली गावे यामध्ये प्राथम्याने करावयाची आहे. परंतु, या बाबत कोणतेच कागदपत्र लेखापरिक्षणास तपासणीस सादर केली नाही. त्यामुळे कृषी विभागाने 37 गावाची जी निवड केली, ती कशाचे आधारे केली? या बाबत कोणतेच अभिलेखे तपासणीस सादर केली नसल्याने या योजनेचा उददेश सफल झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) पंचायत समिती, कारंजा येथील या योजनेची कागदपत्राची पडताळणी केली असता पंचायत समिती कारंजा अंर्गत 9 गावाची निवड करण्यात आली आहे. या गावाची पथदिव्याची मागणीची अभिलेखे तपासणी असता दिनांक 09/06/2015 ते 10/06/2015 पर्यतची आहे आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांचा पथदिव्याचा पुरवठा आदेश दिनांक 22/05/2015 चा आहे आणि ग्रामपंचायतचे हमीपत्र याच तारखेचे

आहे. आणि ग्रामपंचायचा ठराव सुदधा पुरवठा आदेशानंतरचा आहे. पथदिव्याची मागणी ही पुरवठा आदेशानंतरची असल्यामुळे पुरवठा आदेश कशाचे आधारे देण्यात आला? या बाबत खुलासा करावा.

3) पंचायत समिती, वाशिम, मंगरुळपीर, मानोरा, मालेगाव आणि रिसोड यानी या योजनेबाबत कोणतेच अभिलेखे लेखापरिक्षणास तपासणीस सादर केली नाही. वारंवार तोंडी सुचना तसेच अर्धसमाज पत्र क्रमांक 1 ते 11 देऊन सुदधा अभिलेखे तपासणीस सादर केली नाही.

4) लेखापरिक्षणासाठी आवश्यक अभिलेखे उपलब्ध न झाल्यास महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक लेखाप-2013/7/13/वित्त-8, दिनांक 11/12/2013 व आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे पत्र क्रमांक वि.आ./लेखा-3आसथा/विकास/31/2013, दिनांक 03/04/2013 नुसार योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येईल व त्याबाबत सर्वस्वी जबाबदारी आपली राहील, असे असतांनी सुदधा संबधितांनी या योजनेचे सर्व अभिलेखे तपासणीस सादर केली नाही. तरी वरिष्ठ अधिकारी यांनी संबधितावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**3.644 जि.प. सेस 2015-16 योजने अंतर्गत शेतक-यांना साहित्य पुरवठा करणे योजनेतील अनियमितता**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 3,51,18,917/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीएअ 2008/ प्र.क्र.466/वित्त-9 दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्याचे वेळापत्रक ठरविण्यात आले असुन लाभार्थी निवड 31 मे पर्यंत, योजनेस प्रशासकिय व तांत्रिक मान्यता 30 जुन पर्यंत, निविदा प्रकिया 31 ऑगष्टपर्यंत पुर्ण करुन साहित्य खरेदिचे पुरवठा आदेश देणे 30 सप्टेंबरपर्यंत, लाभार्थांना साहित्य वाटप 30 नोव्हेंबर पर्यंत व पुरवठादाराचे देयक अदा करणे 31 जानेवारीपर्यंत व विनीयोग दाखले मार्च अखेर प्राप्त करावयाचे आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे सदर योजनेचा उद्देश सफल झाला नसल्याचे उपरोक्त तक्त्यावरुन स्पष्ट दिसुन येते.

2) शासन परिपत्रक दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद सेस 2015-16 योजने अंतर्गत नॅपसॅक स्प्रे पंप 16 लिटर आऊटसाईड चेंबर - 3511 नग चा पुरवठा आदेश दिनांक 30/09/2015 पर्यंत देणे आवश्यक असतांना दिनांक 31/03/2016 ला दिला आहे. महाराष्ट्र शासन, कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृओ-2013/प्र,क्र.158/11अे, दिनांक 27/09/2013 नुसार शासनाचे महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळासोबत दरकरार अस्थित्वात होता व त्यानुसार नॅपसॅक स्प्रे पंप 16 लिटर आऊटसाईड चेंबर - 3511 नग चे प्रती नग रुपये 1,266/- दराने रुपये 44,44,926/- देय ठरते, परंतू विभागाने नविन दर सुधार शासन निर्णय दिनांक 23/11/2015 नुसार खरेदी केल्यामुळे प्रती नग रुपये 1,424/- x 3,511 नग = रुपये 49,99,664/- प्रदान केले आहे. सदर योजनेची अंमलबजावणी शासन निर्णय दिनांक 20/06/2008 मधील वेळापत्रकाप्रमाणे राबविली असती तर प्रती नग रुपये 158/- x 3,511 नग = रुपये 5,54,738/- बचत झाले असते व त्यातुन आणखी 438 लाभर्थांना लाभ देता आला असता. परंतु विभागाचे दिरंगाईमुळे रुपये 5,54,738/- जादा प्रदान झाले आहे. सबब, सबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन रक्कम रुपये 5,54,738/- वसुलपात्र ठरते.

3) सदर योजने अंतर्गत लाभार्थी निवड न करता साहित्य मोघम स्वरुपात खरेदी केले असुन साहित्य वाटपाच्या वेळेस अर्ज वाटपाच्या वेळेस मागवुन घेतल्याचे व लाभार्थी हिस्सा वसुल केल्यानंतर साहित्य वाटप केल्याचे निदर्शनास येते.

4) पंचायत समिती येथिल साठा नोंदवहयांची तपासणी केली असता, खालीलप्रमाणे साहित्य अजुन पावेतो वाटपा अभावी शिल्लक पडुन आहेत, त्यामुळे जिल्हा परिषदेचा निधी गुंतवून राहीला आहे. शासन निर्णय दिनांक 27/09/2013 मधील दिलेल्या मार्गदर्शक सुचना क्र. 16 नुसार अधिक औजाराची मागणी नोंदविल्यामुळे वाटपाविना औजारे शिल्लक राहिल्यास त्यांच्या किंमती एवढ्या रक्कमेची वसुली मागणी नोंदविणा-या अधिकाऱ्यांकडून एकरकमी वसुल करण्यात येईल अशे आदेश आहेत. साठा नोंदवही तपासणीत सदर योजनेमधुन खरेदी केलेले साहित्य शिल्लक असल्याचे निदर्शनात आले आहे. सबब, रक्कम रुपये 1,31,525/- सबंधीताकडुन वसुल करुन शासनखाती भरणा करावी.

5) महाराष्ट्र शासन, कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृओ-2013/प्र,क्र.158/11अे, दिनांक 27/09/2013 मधील दिलेल्या मार्गदर्शक सुचना क्र. 8 नुसार औजारांची मागणी नोंदविल्यानंतर 45 दिवसांच्या कालावधीत औजारांचा पुरवठा करण्याची जबाबदारी पुरवठा संस्थांची आहे. 45 दिवसानंतर पुरवठा केलेल्या औजारांचा किमंतीच्या 3 टक्के रक्कम दंडात्मक वसुली म्हणुन पुरवठा संस्थेच्या देयकातून एकरकमी वसुल करण्यात येईल असे आदेश आहेत. साठा नोंदवहयांची तपासणी केली असता वरिल दिलेल्या तपशिलानुसार पंचायत समितीला साहित्य प्राप्त झाल्याचे नमुद केले आहे. पंचायत समितीला साहित्य प्राप्त झाल्यानंतर लगेचच लाभधारक शेतक-यांना वाटप करणे आवश्यक होते, परंतु साहित्य प्राप्त झालेल्या दिनांकापासुन 2 ते 4 महिने विलंबाने वाटप केल्याचे निदर्शनात येते. पंचायत समितीला प्राप्त डिलेव्हरी चलानांची तपासणी केली असता त्यावर डिलेव्हरी चलानाचा दिनांक नमुद केल्याचे आढळले नाही व त्यासोबत ट्रान्सपोर्टरचे Consignment Note पंचायत समितीला किंवा विभागातील प्रमाणकासोबत / नस्तीमध्ये कुठेही आढळत नाही. पुरवठा संस्थेने पुरवठा केलेल्या औजारांचा किंमतीच्या 3 टक्के दंडात्मक कार्यवाही होऊ नये याकरीता ट्रान्सपोर्टरचे Consignment Note सादर केले नाही तसेच, डिलेव्हरी चलानावर 45 दिवसाच्या आतील साहित्य प्राप्तीबाबत दिनांक नमुद केल्याचे निदर्शनात येते. सदर शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचना क्र.10 नुसार पुरवठा संस्थेने औजारांचा पुरवठा पुर्व गुणवत्ता तपासणी अहवाल दिल्याशिवाय पुरवठा संस्थेने औजारांचा पुरवठा करु नये अशी अट असतांना प्लॅस्टीक ताडपत्री पंचायत समितीला दिनांक 29/06/2015 ते 30/06/2015 ला प्राप्त झाल्याने नमुद केले आहे, परंतू पुरवठा पुर्व गुणवत्ता तपासणी अहवाल दिनांक 30/01/2016 चा असुन त्याची प्रत जिल्हा परिषदेला आवक नोंदनी क्र.336 दिनांक 01/02/2016 द्वारे प्राप्त आहे. औजारांचा पुरवठा पुर्व गुणवत्ता तपासणी अहवाल जिल्हा परिषदेला सादर करणेपुर्वी साहित्य पुरवठा दिनांक 29/06/2015 ते 30/06/2015 ला कशाच्या आधारे केला ? जिल्हा परिषद सेस 2015-16 अंतर्गत खरेदी केलेल्या इतर साहित्यांच्याबाबतीत औजारांचा पुरवठा पुर्व गुणवत्ता तपासणी अहवालावर दिनांक नमुद केला नसुन जिल्हा परिषदेने त्यावर आवक नोंदनी क्रमांकची नोद घेतल्याचे आढळले नाही. सदर अभिप्रायाबाबत समर्पक खुलासा सादर करावा अन्यथा औजारांचा पुरवठा विलंबाने झाल्यामुळे 3 टक्के दंडाची रक्कम रुपये 6,03,694/- खालीलप्रमाणे पुरवठादाराकडुन वसुल करुन शासनखाती जमा करावी.

6) सदर शासन निर्णय दिनांक 27/09/2013 मधील दिलेल्या मार्गदर्शक सुचना क्र.14 नुसार लाभधारक शेतक-यांकडुन वसुल करावयाची रक्कम प्राप्त झाल्यानंतरच औजारांचे वाटप करण्याची जबाबदारी संबंधीत आधिका-यांची आहे. परंतु, साहित्य प्राप्त दिनांक व लाभार्थी हिस्सा भरणा केलेल्या दिनांकामध्ये तफावत दिसुन येते. ताडपत्री प्राप्त दिनांक 29/06/2015 ते 30/06/2015 असुन लाभार्थी हिस्सा दिनांक 11/01/2016 ते 10/10/2016 ला भरणा केला आहे. 7.5 एच.पी इलेक्ट्रीक मोटरपंप प्राप्त दिनांक 21/11/2015 ते 23/11/2015 असुन लाभार्थी हिस्सा दिनांक 29/01/2016 ते 10/01/2017 ला भरणा केला आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1997 नुसार ज्या वित्तिय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तिय वर्षात साहीत्याचे वाटप व्हावयास पाहीजे, तथापि, जिल्हा परिषद सेस 2015-16 योजने अंतर्गत खरेदी केलेले साहित्य (नॅपसॅक स्प्रे पंप) पुढील आर्थिक वर्षात मार्च 2017 पर्यंत वाटप केल्याचे साठा नोंदवही तपासणीत आढळून आले आहे.

7) महाराष्ट्र शासन, कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृओ-2013/प्र,क्र.158/11अे, दिनांक 27/09/2013 मधील दिलेल्या मार्गदर्शक सुचना क्र.19 नुसार दरकारामध्ये निश्चित केलेल्या औजारांचे दर त्याच औजाराच्या खुल्या बाजारातील दरापेक्षा तुलनेने जास्त आढळल्यास, अशा औजारांच्या किंमती इतकी रक्कम संबंधीत पुरवठा संस्थेकडून वसुल करण्यात येईल अशी अट असतांना सुध्दा सदर योजने अंतर्गत साहित्याचे दरपत्रके मागविल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे खुल्या बाजारातील दरापेक्षा जादा दराने औजारांची खरेदी केली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

8) गावनिहाय / शेतकरीनिहाय वाटपाची मास्टर नोंदवही ठेवलेली नसल्याने एकाच लाभर्थाला अनेक योजनांमधुन किंवा ह्याच योजनेतून दुबार लाभ दिला गेल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**3.645 आदिवासी उपयोजना (टि.एस.पी) 2014-15 योजने अंतर्गत शेतक-यांना साहित्य पुरवठा करणे योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,89,34,420/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद, कृषी विभाग, यवतमाळ यांनी सन 2014-15 मध्ये आदिवासी उपयोजने अंतर्गत योजना राबविण्याकरीता रक्कम रुपये 2,02,50,780/- ची तरतुद केलेली होती, उपलब्ध तरतुदीनुसार सदर योजना सन 2014-15 मध्ये राबवून त्याचे प्रदाने सुध्दा सन 2014-15 या वित्तीय वर्षामध्येच करणे आवश्यक होते. परंतु, सदर योजना सन 2014-15 मध्ये न राबविता त्यावर एकूण रक्कम रुपये 1,91,25,520/- सन 2015-16 या वित्तीय वर्षात नियमबाह्य प्रदान केले आहे.

2) शासन परिपत्रक दिनांक 20/03/2007 अन्वये 15 फेब्रुवारीनंतर त्या वित्तीय वर्षात कोणतीही खरेदी आदेश देता येत नसतांना वरिलप्रमाणे साहित्यांचा मार्च 2015 मध्ये साहित्य खरेदीचा पुरवठा आदेश महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांना नियमबाह्यपने दिल्याचे निदर्शनात येते.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/ प्र.क्र.446/वित्त-9 दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्याचे वेळापत्रक ठरविण्यात आले असुन लाभार्थी निवड 31 मे पर्यंत, योजनेस प्रशासकिय व तांत्रिक मान्यता 30 जुन पर्यंत, निविदा प्रकिया 31 ऑगष्टपर्यंत पुर्ण करुन साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश देणे 30 सप्टेंबरपर्यंत, लाभार्थांना साहित्य वाटप 30 नोव्हेंबर पर्यंत व पुरवठादाराचे देयक अदा करणे 31 जानेवारीपर्यंत व विनीयोग दाखले मार्च अखेर प्राप्त करावयाचे आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे सदर योजनेचा उद्देश सफल झाला नसल्याचे दिसुन येते.

4) पंचायत समिती येथिल साठा नोंदवह्यांची तपासणी केली असता, खालीलप्रमाणे साहित्य अजुन पावेतो वाटपा अभावी शिल्लक पडुन आहेत, त्यामुळे जिल्हा परिषदेचा निधी गुंतवून राहीला आहे. शासन निर्णय दिनांक 27/09/2013 मधिल दिलेल्या मार्गदर्शक सुचना क्र.16 नुसार अधिक औजाराची मागणी नोंदविल्यामुळे वाटपाविना औजारे शिल्लक राहिल्यास त्यांच्या किंमतीएवढ्या रक्कमेची वसुली मागणी नोंदविणा-या अधिकाऱ्यांकडून एकरकमी वसुल करण्यात येईल अशे आदेश आहेत. साठा नोंदवही तपासणीत खालीलप्रमाणे सदर योजनेमधुन खरेदी केलेले साहित्य शिल्लक असल्याचे निदर्शनात आले आहे. सबब, रक्कम रुपये 40,600/- सबंधीताकडुन वसुल करुन शासनखाती भरणा करावी.

5) महाराष्ट्र शासन, कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृओ-2013/प्र,क्र.158/11अे, दिनांक 27/09/2013 मधील दिलेल्या मार्गदर्शक सुचना क्र.8 नुसार औजारांची मागणी नोंदविल्यानंतर 45 दिवसांच्या कालावधीत औजारांचा पुरवठा करण्याची जबाबदारी पुरवठा संस्थांची आहे. 45 दिवसानंतर पुरवठा केलेल्या औजारांचा किंमतीच्या 3 टक्के रक्कम दंडात्मक वसुली म्हणुन पुरवठा संस्थेच्या देयकातून एकरकमी वसुल करण्या येईल असे आदेश आहेत. सदर योजने अंतर्गत खरेदी केलेल्या साहित्याच्या साठा नोंदवहया लेखापरिक्षणात उपलब्ध न केल्यामुळे प्रत्यक्ष वाटप दिनांक नमुद करता येत नाही. परंतु, जिल्हा परिषद, कृषी विभागातील उपरोक्त साहित्य पुरवठा केल्याबाबत डिलेव्हरी चलानांची पडताळणी केली असता दंडात्मक कारवाई होऊ नये त्याकरीता डिलेव्हरी चलानवरील दिनांक हाताने लिहीलेला असुन पंचायत समितीला प्राप्त दिनांक 45 दिवसांचे आत नमुद केल्याचे निदर्शनात येते, परंतु, पुरवठा संस्था महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचे औजारांचा पुरवठा पुर्व गुणवत्ता तपासणी अहवालावर दिनांक नमुद नसुन किंवा हाताने लिहीलेला असुन जिल्हा परिषद कृषी विभागाला जुलै 2015, ऑक्टोंबर 2015 व फेब्रुवारी 2016 ला प्राप्त झाल्याचे विभागाचे आवक नोंदनी वरुन निदर्शनात येते. यावरुन मार्च 2015 चे पुरवठा आदेश असतांना साहित्य माहे जुलै 2015, ऑक्टोंबर 2015 व फेब्रुवारी 2016 मध्ये पंचायत समितीला पुरवठा केल्याचे स्पष्ट होते. डिलेव्हरी चलान सोबत ट्रान्सपोर्टरचे Consignment Note विभागातील प्रमाणकासोबत / नस्तीमध्ये कुठेही आढळले नाही. महाराष्ट्र शासन, कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृओ-2013/प्र,क्र.158/11अे, दिनांक 27/09/2013 मधील दिलेल्या मार्गदर्शक सुचना क्र.10 नुसार औजारांचा पुरवठा पुर्व गुणवत्ता तपासणी अहवाल दिल्याशिवाय संस्थेने औजारांचा पुरवठा करु नये असे स्पष्ट आदेश असतांना

पुरवठा पुर्व गुणवत्ता तपासणी अहवाल जिल्हा परिषदेला सादर करणेपुर्वी साहित्यांचा पुरवठा कशाच्या आधारे केला ? याबाबत खुलासा होणे अभिप्रेत आहे.

उपरोक्त अभिप्रायाबाबत समर्पक खुलासा सादर करावा अन्यथा औजारांचा पुरवठा विलंबाने झाल्यामुळे 3 टक्के दंडाची रक्कम रुपये 5,68,033/- खालीलप्रमाणे पुरवठादाराकडुन वसुल करुन शासनखाती जमा करावी.

6) महाराष्ट्र शासन, कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृओ-2013/प्र.क्र.158/11अे, दिनांक 27/09/2013 मधिल दिलेल्या मार्गदर्शक सुचना क्र.19 नुसार दरकारामध्ये निश्चित केलेल्या औजारांचे दर त्याच औजाराच्या खुल्या बाजारातील दरापेक्षा तुलनेने जास्त आढळल्यास, अशा औजारांच्या किंमतीइतकी रक्कम संबंधीत पुरवठा संस्थेकडून वसुल करण्यात येईल अशी अट असतांना सुध्दा सदर योजने अंतर्गत साहित्याचे दरपत्रके मागविल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे खुल्या बाजारातील दरापेक्षा जादा दराने औजारांची खरेदी केली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) गावनिहाय / शेतकरीनिहाय वाटपाची मास्टर नोंदवही ठेवलेली नसल्याने एकाच लाभर्थीला अनेक योजनांमधुन किंवा ह्याच योजनेतून दुबार लाभ दिला गेल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**3.646 विशेष घटक 2014-15 योजने अंतर्गत शेतक-यांना साहित्य पुरवठा करणे योजनेतील अनियमितता**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 2,45,41,181/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद, कृषी विभाग, यवतमाळ यांनी सन 2014-15 मध्ये विशेष घटक योजने अंतर्गत योजना राबविण्याकरीता रक्कम रुपये 4,21,45,449/- ची तरतुद केलेली होती, उपलब्ध तरतुदीनुसार सदर योजना सन 2014-15 मध्ये राबवून त्याचे प्रदाने सुध्दा सन 2014-15 या वित्तीय वर्षामध्येच करणे आवश्यक होते. परंतु, सदर योजना सन 2014-15 मध्ये न राबविता त्यावर एकूण रक्कम रुपये 2,45,41,181/- सन 2015-16 या वित्तीय वर्षात नियमबाह्य प्रदान केले आहे.

2) शासन परिपत्रक दिनांक 20/03/2007 अन्वये 15 फेब्रुवारीनंतर त्या वित्तीय वर्षात कोणतीही खरेदी आदेश देता येत नसतांना खालिलप्रमाणे साहित्यांचा मार्च 2015 मध्ये साहित्य खरेदीचा पुरवठा आदेश महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांना नियमबाह्यपणे दिल्याचे निदर्शनात येते.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/ प्र.क्र.446/वित्त-9 दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्याचे वेळापत्रक ठरविण्यात आले असुन लाभार्थी निवड 31 मे पर्यंत, योजनेस प्रशासकिय व तांत्रिक मान्यता 30 जुन पर्यंत, निविदा प्रकिया 31 ऑगष्टपर्यंत पुर्ण करुन साहित्य खरेदिचे पुरवठा आदेश देणे 30 सप्टेंबरपर्यंत, लाभार्थींना साहित्य वाटप 30 नोव्हेंबर पर्यंत व पुरवठादाराचे देयक अदा करणे 31 जानेवारीपर्यंत व विनीयोग दाखले मार्च अखेर प्राप्त करावयाचे आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे सदर योजनेचा उद्देश सफल झाला नसल्याचे दिसुन येते.

4) पंचायत समिती येथिल साठा नोंदवह्यांची तपासणी केली असता, खालीलप्रमाणे साहित्य अजुन पावेतो वाटपा अभावी शिल्लक पडुन आहेत, त्यामुळे जिल्हा परिषदेचा निधी गुंतवून राहीला आहे. शासन निर्णय दिनांक 27/09/2013 मधील दिलेल्या मार्गदर्शक सुचना क्र.16 नुसार अधिक औजाराची मागणी नोंदविल्यामुळे वाटपाविना औजारे शिल्लक राहिल्यास त्यांच्या किंमतीएवढ्या रक्कमेची वसुली मागणी नोंदविणा-या अधिकऱ्यांकडून एकरकमी वसुल करण्यात येईल अशे आदेश आहेत. साठा नोंदवही तपासणीत खालीलप्रमाणे सदर योजनेमधुन खरेदी केलेले साहित्य शिल्लक असल्याचे निदर्शनात आले आहे. सबब, रक्कम रुपये 2,73,500/- सबंधीताकडुन वसुल करुन शासनखाती भरणा करावी.

5) महाराष्ट्र शासन, कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृओ-2013/प्र.क्र.158/11अे, दिनांक 27/09/2013 मधिल दिलेल्या मार्गदर्शक सुचना क्र.8 नुसार औजारांची मागणी नोंदविल्यानंतर 45 दिवसांच्या कालावधीत औजारांचा पुरवठा करण्याची जबाबदारी पुरवठा संस्थांची आहे. 45 दिवसानंतर पुरवठा केलेल्या औजारांचा किमंतीच्या 3 टक्के रक्कम दंडात्मक वसुली म्हणुन पुरवठा संस्थेच्या देयकातून एकरकमी वसुल करण्या येईल असे

आदेश आहेत. साठा नोंदवहयांची तपासणी केली असता औजारांचा पुरवठा विलंबाने झाल्याचे निदर्शनात आल्यामुळे 3 टक्के दंडाची रक्कम रुपये 2,18,952/- खालीलप्रमाणे पुरवठादाराकडुन वसुल करुन शासनखाती जमा करावी.

6) महाराष्ट्र शासन, कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृओ-2013/प्र,क्र.158/11अे, दिनांक 27/09/2013 मधिल दिलेल्या मार्गदर्शक सुचना क्र.19 नुसार दरकारामध्ये निश्चित केलेल्या औजारांचे दर त्याच औजाराच्या खुल्या बाजारातील दरापेक्षा तुलनेने जास्त आढळल्यास, अशा औजारांच्या किंमती इतकी रक्कम संबंधीत पुरवठा संस्थेकडून वसुल करण्यात येईल अशी अट असतांना सुध्दा सदर योजने अंतर्गत साहित्याचे दरपत्रके मागविल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे खुल्या बाजारातील दरापेक्षा जादा दराने औजारांची खरेदी केली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) गावनिहाय / शेतकरीनिहाय वाटपाची मास्टर नोंदवही ठेवलेली नसल्याने एकाच लाभर्थीला अनेक योजनांमधुन किंवा ह्याच योजनेतून दुबार लाभ दिला गेल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**3.647 आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील (ओ. टि.एस.पी) 2014-15 योजने अंतर्गत शेतक-यांना साहित्य पुरवठा करणे योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत रक्कम रूपये 46,57,120/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा परिषद, कृषी विभाग, यवतमाळ यांनी सन 2014-15 मध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील (ओ.टि.एस.पी) अंतर्गत योजना राबविण्याकरीता रक्कम रुपये 69,62,930/- ची तरतुद केलेली होती, उपलब्ध तरतुदीनुसार सदर योजना सन 2014-15 मध्ये राबवून त्याचे प्रदाने सुध्दा सन 2014-15 या वित्तीय वर्षामध्येच करणे आवश्यक होते. परंतु सदर योजना सन 2014-15 मध्ये न राबविता त्यावर एकुण रक्कम रुपये 46,57,120/- सन 2015-16 या वित्तीय वर्षात नियमबाह्य प्रदान केले आहे.

2) शासन परिपत्रक दिनांक 20/03/2007 अन्वये 15 फेब्रुवारीनंतर त्या वित्तीय वर्षात कोणतीही खरेदी आदेश देता येत नसतांना वलिलप्रमाणे साहित्यांचा मार्च 2015 मध्ये साहित्य खरेदीचा पुरवठा आदेश महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांना नियमबाह्यपणे दिल्याचे निदर्शनात येते.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीएअ 2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्याचे वेळापत्रक ठरविण्यात आले असुन लाभार्थी निवड 31 मे पर्यंत, योजनेस प्रशासकिय व तांत्रिक मान्यता 30 जुन पर्यंत, निविदा प्रकिया 31 ऑगष्टपर्यंत पुर्ण करुन साहित्य खरेदिचे पुरवठा आदेश देणे 30 सप्टेंबरपर्यंत, लाभार्थांना साहित्य वाटप 30 नोव्हेंबर पर्यंत व पुरवठादाराचे देयक अदा करणे 31 जानेवारीपर्यंत व विनीयोग दाखले मार्च अखेर प्राप्त करावयाचे आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे सदर योजनेचा उद्देश सफल झाला नसल्याचे उपरोक्त तक्त्यावरुन स्पष्ट दिसुन येते.

4) पुरवठा आदेशानुसार नग पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले. परंतु, पंचायत समितीने सदर योजनेच्या साठा नोंदवहया लेखापरीक्षणात सादर न केल्यामुळे खरेदी केलेले साहित्य किती शिल्लक आहेत याबाबत पडताळणी करता आली नाही. सन 2014-15 मध्ये राबविण्यात येणा-या सदर योजनेचे साहित्य खरेदीचे प्रदाने सन 2015-16 मध्ये झाल्यामुळे साठा नोंदवहया लेखापरीक्षणात सादर करणे आवश्यक होते, परंतु न केल्यामुळे साहित्याची पोच पंचायत समितीला झाली किंवा नाही किंवा शिल्लक राहिलेल्या साठ्याबाबत अभिप्राय देता येत नाही सबब, संपुर्ण साहित्य दिनांकनिहाय वाटप झालेबाबत खात्री पटवून अनुपालन सादर करावे.

5) महाराष्ट्र शासन, कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृओ-2013/प्र,क्र.158/11अे, दिनांक 27/09/2013 मधिल दिलेल्या मार्गदर्शक सुचना क्र.10 नुसार औजारांचा पुरवठा पुर्व गुणवत्ता तपासणी अहवाल दिल्याशिवाय संस्थेने औजारांचा पुरवठा करु नये असे स्पष्ट आदेश असतांना पुरवठा पुर्व गुणवत्ता तपासणी अहवाल जिल्हा परिषदेला सादर करणेपुर्वी साहित्यांचा पुरवठा कश्याच्या आधारे केला ? याबाबत खुलासा करावा.

6) महाराष्ट्र शासन, कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृओ-2013/प्र,क्र.158/11अे, दिनांक 27/09/2013 मधील दिलेल्या मार्गदर्शक सुचना क्र.19 नुसार दरकारामध्ये निश्चित केलेल्या औजारांचे दर त्याच

औजाराच्या खुल्या बाजारातील दरापेक्षा तुलनेने जास्त आढळल्यास, अशा औजारांच्या किंमती इतकी रक्कम संबंधीत पुरवठा संस्थेकडून वसुल करण्यात येईल अशी अट असतांना सुध्दा सदर योजने अंतर्गत साहित्याचे दरपत्रके मागविल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे खुल्या बाजारातील दरापेक्षा जादा दराने औजारांची खरेदी केली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) गावनिहाय / शेतकरीनिहाय वाटपाची मास्टर नोंदवही ठेवलेली नसल्याने एकाच लाभर्थाला अनेक योजनांमधुन किंवा ह्याच योजनेतून दुबार लाभ दिला गेल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**3.648 जिल्हा परिषद सेस फंड 2015-16 अंतर्गत 50 टक्के सुटीवर एच डी पी ई पाईप पुरवीणे योजना खर्चातील अनियमीततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 906, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 14,99,300/- खर्च करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद सेस फंड अंतर्गत सन 2015-16 चे मुळ अंदाजपत्रकात एच डी इ पी पाईप या योजनेसाठी रुपये 15,00,000/- तरतुद करण्यात आली आहे. त्यानुसार पढील योजना राबविली आहे. त्यावर लेखापरीक्षणाचे खालिलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2013/प्र.क्र.63/11 अे, दिनांक 07/06/2013 नुसार महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महांमडळ एकमेव पुरवठादार संस्था म्हणून नियुक्त केली आहे. वरील साहित्यची खरेदी महाराष्ट्र शासन कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015/प्र.क्र.218/11 अे, दिनांक 23/11/2015 नुसार शासनाने महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचे सोबत केलेल्या दरकरारा नुसार एच डी पी ई पाईप 5800 नग @ 517 प्रति नग असे एकुण रुपये 14,99,300/- अनुदानाची रक्कम प्रति पाईप 258.5 प्रमाणे खरेदी केली आहे. परंतु या योजनेच्या मान्यते पासुन ते पुरवठा आदेश देईपर्यतच्या कालावधीत महाराष्ट्र शासन कृषी ,पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2013/प्र.क्र.158/11 अे, दिनांक 27/09/2013 नुसार शासनाने याच संस्थे बरोबर दरकरार अस्थिस्तवात होता व त्यातील दर प्रति पाईप रुपये 470/- प्रति नग होते तसेच त्यातील अट क्र 20 नुसार प्रस्तुत शासन निर्णयाव्दारे निश्चित करण्यात आलेले दर हे तालुका स्तरापर्यत पुरवठयासाठी असुन ते नव्याने दर निश्चित होई पर्यत लागु राहतील असे स्पष्ट निर्देश दिलेले असतांना शासन निर्णयानुसार नवीन दराने खरेदी केल्यामुळे प्रति पाईप रुपये 47/- जादा दराने खरेदी करण्यात आली.

2) शासन निर्णय दिनांक 23/11/2015 नुसार खरेदी केल्यामुळे प्रति पाईप रुपये 47/- जादा प्रदान करावे लागले. सदर शासन निर्णय प्राप्त झाल्या नंतर कृषी विभाग, जिल्हा परिषद बुलडाणा यांनी अंत्यत तप्तरतेणे दिनांक 24/11/2015 रोजी प्रशासकीय मान्यता आदेश, तांत्रिक मान्यता आदेश व पुरवठा आदेश एकाच दिवशी देण्यात आले. परंतु कृषी विषय समिती ने ठराव क्रमांक 2, दिनांक 16/10/2015 रोजी मान्यता दिल्या नंतर याच कार्यक्षमतेने वरील प्रकारचा निर्णय घेतला असता तर निश्चितच मागील शासन निर्णय दिनांक 27/09/2013 नुसार कमी दराने खरेदी करणे शक्य होते. त्यानुसार अनुदानाची रक्कम ही रुपये 235/- दयावी लागली असती नविन दराने खरेदी केल्यामुळे रुपये 258.50 दयावी लागली. त्यामुळे प्रती पाईप रुपये 23.50 असे एकुण 5800 नग पाईप चे एकुण रुपये 1,36,300/- शासकीय अनुदानाचे नुकसान झाले आहे. निष्काळजी पणे योजना राबवील्यामुळे शेतकऱ्यांचे सूध्दा रूपये 1,36,300/- चे आर्थीक नुकसान झाले आहे. एकुण नुकसानीची रक्कम रुपये 2,72,600/- याची वसुली होणे आवाश्यक आहे.

3) वरील योजना काळजीपुर्वक व ग्रामविकास व जलसधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मध्ये दिलेल्या वेळापत्रका प्रमाणे पाळली असती तर एकूण रुपये 2,72,000/- बचत झाली असती व 50 टक्के अनुदानाचे अनुषांगणे एकुण 290 पाईप ची जादा खरेदी करुन आणखी 29 लाभार्थ्याला लाभ देता आला असता, परंतु विभागाचे दिरंगाईमुळे सदर लाभ देता आला नाही याबाबत जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1084/सी आर/ 1622/प्र.क्र.197, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिश्याची रक्कम प्रथम वसुल केल्याशिवाय साहित्य खरेदी करु नये अशा स्पष्ट सुचना असतांना सदर योजनेच्या बाबतीत साहित्य वाटपाचे वेळेस लाभार्थी हिश्याची रक्कम वसुल करण्यात आली आहे याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक प.रा.स/1096/ प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1997 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात साहीत्याचे वाटप व्हावयास पाहीजे असे निर्देशीत केले आहे. तथापि पंचायत समितीकडील साठा पुस्तके पडताळणी केले असता पुढील आर्थिक वर्षात झाल्याचे आढळते.

**3.649 जिल्हा परिषद सेस अंतर्गत 50 टक्के अनुदानावर 3 एच पी विद्युत पंप पुरविणे योजना खर्चातील अनियमीततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 908, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 24,94,800/- खर्च करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद सेस फंड अंतर्गत सन 2015-16 चे मुळ अंदाजपत्रकात एच डी इ पी पाईप या योजनेसाठी रुपये 25,00,000/- तरतुद करण्यात आली आहे. त्यानुसार पुढील योजना राबविली आहे. त्यावर लेखापरीक्षणाचे खालिल प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2013/प्र.क्र.63/11 अे, दिनांक 07/06/2013 नुसार महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महांमडळ एकमेव पुरवठादार संस्था म्हणुण् नियुक्त केली आहे. वरील साहित्यची खरेदी महाराष्ट्र शासन कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015/प्र.क्र.218/11 अे, दिनांक 23/11/2015 नुसार शासनाने महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महामंडळ यांचे सोबत केलेल्या दर करारा नुसार 3 एच पी विद्युत पंप 288 नग @ 17325 प्रति नग असे एकुण रुपये 24,94,800/- अनुदानाची रक्कम प्रति नग विद्युत पंप 8662.50 प्रमाणे खरेदी केली आहे. परंतु या योजनेचया मान्यते पासुन ते पुरवठा आदेश देईपर्यतच्या कालावधीत महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2013/प्र.क्र.158/11 अे, दिनांक 27/09/2013 नुसार शासनाने याच संस्थे बरोबर दरकरार अस्थिस्तवात होता व त्यानुसार 3 एच पी विद्युत पंप प्रति नग रुपये 16,500/- होती. त्यातील अट क्र 20 नुसार प्रस्तुत शासन निर्णयाव्दारे निश्चित करण्यात आलेले दर हे तालुका स्तरापर्यत पुरवठयासाठी असुन ते नव्याने दर निश्चित होईपर्यत लागु राहीतील असे स्पष्ट निर्देश दिले आहे. शासन निर्णयानुसार नवीन दराने खरेदी केल्यामुळे प्रति नग विद्युत पंप रुपये 825/- जादा दराने खरेदी करण्यात आली.

2) शासन निर्णय दिनांक 23/11/2015 नुसार खरेदी केल्यामुळे प्रति नग विद्युत पंप रुपये 825/- जादा प्रदान करावे लागले. सदर शासन निर्णय प्राप्त झाल्या नंतर कृषी विभाग, जिल्हा परिषद बुलडाणा यांनी अंत्यत तत्परतेने दिनांक 24/11/2015 रोजी प्रशासकी मान्यता आदेश, तांत्रिक मान्यता आदेश व पुरवठा आदेश एकाच दिवशी देण्यात आले. वरील योजनेची सुरुवात जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 07, दिनांक 24/6/2015, कृषी विषय समितीची सभा दिनांक 05/05/2015 ठराव क्रमांक 2, व प्रशासकीय मान्यता स्थायी समिती ठराव क्रमांक 10 दिनांक 04/11/2015 अन्वये मान्यता घेवुन सुरुवात केली त्याच कार्यक्षमतेने वरील प्रकारचा निर्णय घेतला असता तर निश्चितच मागील शासन निर्णय दिनांक 27/09/2013 नुसार कमी दराने खरेदी करणे शक्य होते. त्यानुसार अनुदानाची रक्कम ही रुपये 8,250/- द्यावी लागली असती नविन दराने खरेदी केल्यामुळे रुपये 8662.5 द्यावी लागली. त्यामुळे प्रती विदुयत पंप 412.50 असे एकुण 288 नग विद्युत पपांचे एकुण रुपये 1,18,800/- शासकीय अनुदानाचे नुकसान झाले आहे. निष्काळजीपणे योजना राबवील्यामुळे शेतक-याचे सुध्दा रुपये 1,18,800/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. एकुण नुकसानीची रक्कम रुपये 2,37,600/- ची वसुली होणे आवाश्यक आहे.

3) वरील योजना काळजी पुर्वक व शासनने दिलेल्या महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मध्ये दिलेल्या वेळापत्रका प्रमाणे पाळली असती तर एकुण रक्कम रुपये 2,37,600 /- बचत झाली असती व 50 टक्के अनुदानाचे अनुषंगाने एकुण 14 नग विद्युत पंप जादा खरेदी करुन आणखी 14 लाभार्थ्याला लाभ देता आला असता परंतु विभागाचे दिरंगाईमुळे सदर लाभ देता आला नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक प.रा.स.1084/सी आर/1622/प्र.क्र.197, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिश्याची रक्कम प्रथम वसुल केल्या शिवाय साहित्य खरेदी करु नये अशा स्पष्ट सुचना असतांना सदर योजनेच्या बाबतीत साहित्य वाटपाचे वेळेस लाभार्थी हिश्याची रक्कम वसुल करण्यात आली आहे या बाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1997 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात साहित्यचे वाटप व्हावयास असे निर्देशीत केले आहे. तथापि पंचायत समितीकडील साठा पुस्तके पडताळणी केले असता पुढील आर्थीक वर्षात झाल्याचे आढळते.

6) पंचायत समिती मोताळा यांना पंचायत समिती संग्रामपुरकडुन 11 नग प्राप्त झाले आहे. त्यापैकी 6 नग वाटप करण्यात आले, परंतु 5 नगाचा कोणताच हिशोब नाही कोणाला दिले. कधी दिले याची नोंद नाही. अथवा साठा रजिस्टरला सुध्दा उपलब्ध नाही. महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015/प्र.क्र.218/11 अे, दिनांक 23/11/2015 मधील प्रपत्र 2 मधील अट क्र 16 अन्वये क्षेत्रीय अधिका-यानी कोणत्याही परिसिथतीत आवश्यकते पेक्षा अधिक औजाराची मागणी नोंदवु नये अधिक औजाराची मागणी नोंदविल्यामुळे वाटपविना औजारे शिल्लक राहील्यास त्यांच्या किंमती एवढ्या रक्कमेची वसुली मागणी नोंदविणा-या अधिका-यांकडुन एकरकमी वुसल करण्यात येईल 5 नगाचे एकुण रुपये 43,312/- शासकीय अनुदानाची रक्कम संबंधीताकडून वसुल करणे आवश्यक आहे.

**3.650 जिल्हा परिषद सेस अंतर्गत 50 टक्के अनुदानावर 5 एच पी विद्युत पंप पुरवीणे योजना खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 907, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 24,99,000/- खर्च करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद सेस फंड अंतर्गत सन 2015-16 चे मुळ अंदाजपत्रकात एच डी इ पी पाईप या योजनेसाठी रुपये 25,00,000/- तरतुद करण्यात आली आहे. त्यानुसार पुढील योजना राबविली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2013/प्र.क्र.63/11 अे, दिनांक 07/06/2013 नुसार महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महांमडळ एकमेव पुरवठादार संस्था म्हणुन नियुक्त केली आहे. वरील साहित्यची खरेदी महाराष्ट्र शासन कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015/प्र.क्र.218/11 अे, दिनांक 23/11/2015 नुसार शासनाने महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महामंडळ यांचे सोबत केलेल्या दरकरारा नुसार 5 एच पी विद्युत पंप 238 नग @ 21000 प्रति नग असे एकुण रुपये 24,99,000/- अनुदानाची रक्कम प्रति नग विद्युत पंप रुपये 10,500/- प्रमाणे खरेदी केली आहे. परंतु या योजनेच्या मान्यते पासुन ते पुरवठा आदेश देईपर्यतच्या कालावधीत महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2013/प्र.क्र.158/11 अे, दिनांक 27/09/2013 नुसार शासनाने याच संस्थे बरोबर दरकरार अस्थित्स्तवात होता व त्यानुसार 3 एच पी विद्युत पंप प्रति नग रुपये 20,000/- होती. त्यातील अट क्र 20 नुसार प्रस्तुत शासन निर्णयाव्दारे निश्चित करण्यात आलेले दर हे तालुका स्तरापर्यत पुरवठयासाठी असुन ते नव्याने दर निश्चित होईपर्यत लागु राहीतील असे स्पष्ट निर्देश दिले

आहे. नविन दर सुधार शासन निर्णयानुसार खरेदी केल्यामुळे प्रति नग विद्युत पंप रुपये 1,000/- जादा दराने खरेदी करण्यात आली.

2) शासन निर्णय दिनांक 23/11/2015 नुसार खरेदी केल्यामुळे प्रति नग विद्युत पंप रुपये 825/- जादा प्रदान करावे लागले. सदर शासन निर्णय प्राप्त झाल्या नंतर कृषी विभाग, जिल्हा परिषद बुलडाणा यांनी अंत्यत तप्तरतेने दिनांक 24/11/2015 रोजी प्रशासकी मान्यता आदेश, तांत्रिक मान्यता आदेश व पुरवठा आदेश एकाच दिवशी देण्यात आले. वरील योजनेची सुरुवात जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 07, दिनांक 24/06/2015, कृषी विषय समितीची सभा दिनांक 05/05/2015 ठराव क्रमांक 2, व प्रशासकीय मान्यता स्थायी समिती ठराव क्रमांक 10, दिनांक 04/11/2015 अन्वये मान्यता घेवुन सुरुवात केली. त्याच कार्यक्षमतेने वरील प्रकारचा निर्णय घेतला असता तर निश्चितच मागील शासन निर्णय दिनांक 27/09/2013 नुसार कमी दराने खरेदी करणे शक्य होते. त्यानुसार अनुदानाची रक्कम ही रुपये 10,000/- द्यावी लागली असती नविन दराने खरेदी केल्यामुळे रुपये 10,500/- द्यावी लागली. त्यामुळे प्रती विदुयत पंप रुपये 500/- असे एकुण 238 नग विद्युत पपांचे एकुण रुपये 1,19,000/- शासकीय अनुदानाचे नुकसान झाले आहे. निष्काळजीपणे योजना राबवील्यामुळे शेतक-याचे सूध्दा रूपये 1,19,000/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. एकुण नुकसानीची रक्कम रुपये 2,38,000/- ची वसुली होणे आवाश्यक आहे.

3) वरील योजना काळजी पुर्वक व शासनने दिलेल्या महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलंसधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मध्ये दिलेल्या वेळापत्रका प्रमाणे पाळली असती तर एकुण रुपये 2,37,600 /- बचत झाली असती व 50 टक्के अनुदानाचे अनुषंगाने एकुण 12 नग विद्युत पंप जादा खरेदी करुन आणखी 12 लाभार्थ्याला लाभ देता आला असता परंतु विभागाचे दिरंगाईमुळे सदर लाभ देता आला नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलंसधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार लाभार्थी निवड 31 मे अखेर करुन लाभार्थ्यास प्रत्यक्ष लाभ 30 नोव्हे अखेर पर्यत देणे आवश्यक होते. या करीता सदरहु शासन परिपत्रकान्वये योजनेची अमंलबजावणी काटेकोरपणे विहीत कालावधीत पुर्ण व्हावी यासाठी वेळापत्रक आखुन देण्यात आलेले आहे. परंतु या बाबीकडे सुध्दा दुर्लक्ष करण्यात आले त्यामुळे योजनेचा योग्य परीणाम दिसुन आला नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1084/सी आर/1622/प्र.क्र.197, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिश्याची रक्कम प्रथम वसुल केलयाशिवाय साहित्य खरेदी करु नये अशा स्पष्ट सुचना असतांना सदर योजनेच्या बाबतीत साहित्य वाटपाचे वेळेस लाभार्थी हिश्याची रक्कम वसुल करण्यात आली आहे या बाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1096/प्र.क्र.178/ 05, दिनांक 09/10/1997 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात साहित्यचे वाटप व्हावयास पाहीजे असे निर्देशीत केले आहे. तथापि, पंचायत समितीकडील साठा पुस्तके पडताळणी केले असता पुढील आर्थिक वर्षात झाल्याचे आढळते.

**3.651 विशेष घटक उपयोजना अंतर्गत सन 2014-15 मधील लाभार्थ्यांना 3 एच पी विद्युत पंप पुरवीणे योजना खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 300, दिनांक 29/03/2016 अन्वये रक्कम रुपये 30,14,550/- खर्च करण्यात आला आहे.

विशेष घटक योजने अंतर्गत सन 2014-15 मध्ये निवड झालेल्या लाभार्थ्यांना 3 एच पी ओपनवेल संच पुरविण्यात आले. त्यावर लेखापरीक्षणाचे खालिलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) या योजनेकरीता विभागीय कृषी, सहसंचालक अमरावती विभाग, अमरावती यांचे पत्र क्रमांक जा क्र/ लेखा/ब 3/अनु/01614/2256/2015, दिनांक 04/07/2015 अन्वये एकुण रुपये 4,81,03,000/- प्राप्त झाले. दिनांक

20/08/2015 रोजी सदर रक्कम कोषागारातुन काढण्यात आली. विभागाने लाभार्थी निवड पुर्ण कलेली असतांना दिनांक 23/06/2015 चे शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त असतांना, तांत्रिक मान्यता दिलेली असतांना, पुर्ण रक्कम विभागाकडे जमा असतांना केवळ प्रशासकीय दिरंगाईमुळे पुरवठा आदेश उशीरा दिल्यामुळे साहित्य जादा दराने खरेदी केली. वरील योजनेतील साहित्य खरेदी मागील (दिनांक 27/09/2013) शासन निर्णयातील दरानुसार खरेदी करणे आवश्यक होते. परंतु तसे न करता नवीन दरकरारा (दिनांक 23/11/2015) नुसार जादा दराने खरेदी केली आहे.

2) महाराष्ट्र शासन, कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2013/प्र.क्र.63/11-अे, दिनांक 07/06/2013 नुसार महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महांमडळ एकमेव पुरवठादार संस्था म्हणुन नियुक्त केली आहे. परंतु या योजनेसाठी आवश्यक मान्यता घेतलेल्या असतांना लाभार्थी निवड पुर्ण असतांना पुरवठा आदेश देण्यास दिरंगाई करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2013/प्र.क्र.158/11अे, दिनांक 27/09/2013 नुसार शासनाने याच संस्थे बरोबर दरकरार अस्थिस्तवात होता.

सप्टेंबर 2013 चे दरकरारानुसार या विद्युत पंपाची किंमत प्रति नग रुपये 16,500/- प्रती नग असुन प्रति नग रुपये 825/- निश्चितच बचत करुन इतर लाभार्थीना लाभ देता आला असता एकुण 174 नग प्रति नग रुपये 825/- प्रमाणे एकुण रुपये 1,43,550/- प्रशासकीय दिरंगाई मुळे जादा प्रदान झाले आहे. याची वसुली होणे आवश्यक आहे.

3) पंचायत समिती बुलडाणा 23 नग देऊळगांव राजा 9 नग विना वाटप पडुन आहे. महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015/प्र.क्र.218/11अे, दिनांक 23/11/2015 मधील प्रपत्र 2 मधील अट क्र 16 अन्वये क्षेत्रीय अधिका-यांनी कोणत्याची परिस्थितीत आवश्यकते पेक्षा अधिक औजाराची मागणी नोंदवु नये अधिक औजाराची मागणी नोंदविल्यामुळे वाटपविना औजारे शिल्लक राहील्यास त्यांच्या किंमती एवढ्या रक्कमेची वसुली मागणी नोंदविणा-या अधिका-यांकडुन एकरकमी वुसल करण्यात येईल 32 नगाचे एकुण रुपये 5,54,400/- शासकीय अनुदानाची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

**3.652 विशेष घटक उपयोजना अंतर्गत सन 2014-15 मधील लाभार्थ्यांना मेळघाट स्पेशल बैलगाडी पुरवीणे योजना खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 319, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 52,44,750/- खर्च करण्यात आला आहे. विशेष घटक योजनेअंतर्गत सन 2014-15 मध्ये निवड झालेल्या लाभार्थ्यांना मेळघाट स्पेशल बैलगाडी संच पुरविण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) या योजनेकरीता विभागीय कृषी, सहसंचालक अमरावती विभाग, अमरावती यांचे पत्र क्रमांक जा क्र/ लेखा/ब 3/अनु/01614/2256/2015, दिनांक 04/07/2015 अन्वये एकुण रुपये 4,81,03,000/- प्राप्त झाले. दिनांक 20/08/2015 रोजी सदर रक्कम कोषागारातुन काढण्यात आली. परंतु विभागाने लाभार्थी निवड पुर्ण झालेली असतांना, दिनांक 23/06/2015 चे शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त असतांना, तांत्रिक मान्यता दिलेली असतांना, पुर्ण रक्कम विभागाकडे जमा असतांना केवळ प्रशासकीय दिरंगाईमुळे पुरवठा आदेश उशीरा दिल्यामुळे साहित्य जादा दराने खरेदी केली. वरील योजनेतील साहित्य खरेदी मागील (दिनांक 27/09/2013) शासन निर्णयातील दरानुसार खरेदी करणे आवश्यक होते. परंतु तसे न करता नवीन दरकरारा (दिनांक 23/11/2015) नुसार जादा दराने खरेदी केली आहे.

2) महाराष्ट्र शासन, कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2013/प्र.क्र.63/11-अे, दिनांक 07/06/2013 नुसार महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महांमडळ एकमेव पुरवठादार संस्था म्हणुन नियुक्त केली आहे. या योजनेसाठी आवश्यक मान्यता घेतलेल्या असतांना लाभार्थी निवड पुर्ण असतांना पुरवठा आदेश देण्यास दिरंगाई करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन

निर्णय क्रमांक सुकृऔ 2013/प्र.क्र.158/11-अे, दिनांक 27/09/2013 नुसार शासनाने याच संस्थे बरोबर दरकरार अस्थिस्तवात होता. सप्टेंबर 2013 चे दरकरारानुसार या बैलगाडीची किंमत प्रति नग रुपये 14,125/- प्रती नग असुन प्रति नग रुपये 625/- निश्चितच बचत करुन इतर लाभार्थीना लाभ देता आला असता एकुण 370 नग प्रति नग रुपये 625/- प्रमाणे एकुण रुपये 2,31,250/- प्रशासकीय दिरंगाईमुळे जादा प्रदान झाले आहे, याची वसुली होणे आवश्यक आहे.

3) पंचायत समिती बुलडाणा 2 नग विना वाटप पडुन आहे. महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015/प्र.क्र.218/11-अे, दिनांक 23/11/2015 मधील प्रपत्र 2 मधील अट क्र 16 अन्वये क्षेत्रीय अधिका-यानी कोणत्याची परिस्थितीत आवश्यकते पेक्षा अधिक औजाराची मागणी नोंदवु नये. अधिक औजाराची मागणी नोंदविल्यामुळे वाटपविना औजारे शिल्लक राहील्यास त्यांच्या किंमती एवढ्या रक्कमेची वसुली मागणी नोंदविणा-या अधिका-यांकडुन एकरकमी वुसल करण्यात येईल 2 नगाचे एकुण रुपये 28,250/- शासकीय अनुदानाची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

**3.653 विशेष घटक उपयोजना अंतर्गत सन 2014-15 मधील लाभार्थ्याना मेळघाट स्पेशल बैलगाडी पुरवीणे योजना खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 337, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 46,50,000/- खर्च करण्यात आला आहे.

विशेष घटक योजने अंतर्गत सन 2014-15 मध्ये निवड झालेल्या लाभार्थ्याना विदर्भ स्पेशल बैलगाडी संच पुरविण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती जळगांव जामोद 6 नग विना वाटप पडुन आहे. महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015/प्र.क्र.218/11-अे, दिनांक 23/11/2015 मधील प्रपत्र 2 मधील अट क्र 16 अन्वये क्षेत्रीय अधिका-यानी कोणत्याची परिस्थितीत आवश्यकते पेक्षा अधिक औजाराची मागणी नोंदवु नये अधिक औजाराची मागणी नोंदविल्यामुळे वाटपविना औजारे शिल्लक राहील्यास त्यांच्या किंमती एवढ्या रक्कमेची वसुली मागणी नोंदविणा-या अधिका-यांकडुन एकरकमी वसुल करण्यात येईल 6 नगाचे एकुण प्रति नग रुपये 15,000/- प्रमाणे रुपये 90,000/- शासकीय अनुदानाची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

**3.654 50 टक्के अनूदानावर प्लॉस्टीक ताडपत्री जादा दराने खरेदीमुळे झालेले नुकसान व इतर अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये **49,98,154/-** खर्च करण्यात आला आहे**.** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-2015/प्र.क्र.111/अर्थ-3, दिनांक 30/06/2015 नियम क्रमांक 15 अन्वये कोणत्याही खरेदी करणा-या अधिका-यांनी रूपये 1 कोटी वरील खरेदी दरकरारावर न करता स्पर्धात्मक निविदेद्वारे करावी असे शासनाचे निर्देश असतांना सुध्दा सन 2015-16 मध्ये रूपये 1 कोटी पेक्षा जास्त किमतीची ताडपत्रि खरेदी रूपये 2850.20 प्रति ताडपत्रि या शासकिय दरकरारानूसार पुरवठादाराकडून केलेली आहे.

पंचायत समिती हिंगणा यांनी 300 GSM (6*6) साइज व गुणवत्ता असलेली वरील तिच ताडपत्रि इ. निविदेद्वारे रूपये 1,695/- प्रति ताडपत्रि या दराने खरेदी केलेली आहे. उपरोक्त निर्णयानूसार ताडपत्रि खरेदी न केल्यामुळे प्रति ताडपत्रि रूपये 1155.20 प्रमाणे जादा दर आकारून रूपये 40,50,131/- जादा प्रदान करण्यात आलेले आहे. याकडे शासनाचे लक्ष वेधण्यात येत आहे.

2) पुरवठा आदेश क्रमांक जिपना/कृषि/जि.प.सेसफंड/प्लॉ.ताडपत्रि/2146(B), दिनांक 29/06/2015 अन्वये मे. लॅमीफॅब अॅण्ड पेपर (प्रा.) लि. औरंगाबाद यांना 6*6 मि. 300 GSM जाडिची ताडपत्रि 1753 नगाचा आदेश दिलेला होता. त्याअनुषंगाने डिलीव्हरी मेमो नंबर 1432 नूसार पंचायत समिती नागपूरला 342 नग दिनांक 01/08/2015 ला पुरवठा केलेला आहे. तसेच डिलीव्हरी मेमो नंबर 1433 नुसार पंचायत समिती कामठीला 238 नग दिनांक

02/08/2016 ला पुरवठा केलेला आहे. पुरवठा आदेश अट क्र.3 अन्वये मालाचा पुरवठा 30 दिवसाचे आत न झाल्यास अट क्र.4 अन्वये दरकरारातील कलम 17 नूसार दंड आकारावयाचा आहे.

सदर कलमान्वये कमीत कमी 0.5 टक्के साहित्य खरेदी रक्कमेवर दंड आकारावयाचा आहे. त्यानुसार नागपूर पंचायत समितीला मालाचा पुरवठा 1 दिवस उशिरा झालेला आहे. तसेच कामठी पंचायत समितीला साहित्याचा पुरवठा 2 दिवस उशिरा झालेला आहे. त्यानूसार रूपये 8,269/- दंडाची रक्कम पुरवठादाराकडून वसुल करावी.

3) लेखापरीक्षणास पंचायत समितीनिहाय प्राप्त व निवड केलेल्या लाभार्थी अर्जाची नस्ती व लाभार्थी निवडिची मंजूर यादी मागणी करूनही सादर न केल्याने लाभार्थी अर्ज व निवड योग्य असल्याचे प्रमाणित करता येत नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1996 अन्वये साहित्य खरेदीपूर्वी लाभार्थी निवड करणेबाबत निर्देश असतांना लाभार्थींची निवड सभेत केल्याबाबत सभेच्या लाभार्थ्यींच्या नावनिहाय मंजूर यादया व ठराव सादर केलेले नाही.

5) उपरोक्त पुरवठा आदेशाच्या अटी व शर्तीनूसार सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी संपूर्ण लाभार्थ्यांकडून लाभार्थी हिस्सा वसुल करून त्याचे धनादेश / धनाकर्ष साहित्य पुरवठादाराचे नावाने जिल्हा परिषदेमार्फत पाठविण्याबाबत निर्देश असतांना सुध्दा नागपूर जिह्यातील 13 पंचायत समितीमार्फत लाभार्थी हिस्सा वसुल करून त्याचे धनादेश / धनाकर्ष जिल्हा परिषदेमार्फत पुरवठादारास प्रदान केल्याबाबतचा पोचपावत्या / दस्तावेज नस्तीबध्द नसल्याने प्रत्यक्षात लाभार्थी हिस्सा वसुल झाला अथवा नाही, याचा बोध होत नाही. तसेच पुरवठा आदेशातील अटीचे उल्लंघन झालेले आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1020/प्र.क्र./14/38, दिनांक 07/01/2001 अन्वये लाभार्थी हिस्सा वसुल करून साहित्य खरेदी करणेबाबत निर्देश असतांना लेखापरीक्षण वेळेपर्यंत लाभार्थी हिस्सा वसुल केल्याबाबत दस्ताऐवज नसल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झालेले असून केवळ जिल्हा परिषद सेसनिधी खर्च करणे हेतूनेच खरेदी केल्याचे दिसून येते.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 चे परिशिष्ट इ नूसार विहित वेळापत्रकानूसार दिलेल्या कालावधीत योजना न राबविण्यात आल्याने योजनेचा मुळ उद्देश सफल झालेला नाही व वरील शासन परिपत्रकाचे उल्लंघन झालेले आहे. सदर योजना हि सन 2015-16 ची होती व सन 2015-16 मध्ये पुरवठा आदेश व प्रत्यक्ष पुरवठा झालेला असतांना सुध्दा पुरवठादारास रक्कमेचे प्रदान विलंबाने म्हणजेच सन 2016-17 मध्ये केलेले आहे.

वरील सुधारीत शासकीय तरतुद रूपये 75,00,000/- (स्वनिधी) व लाभार्थी हिस्सा रूपये 75,00,000/- असून एकूण रूपये 1,50,00,000/- खर्च सदर वर्षात करावयाचा असतांना सन 2015-16 मध्ये रूपये 1,00,00,000/- खर्च केलेला आहे. उर्वरित खर्च रूपये 50,00,000/- पूढील वर्षी सन 2016-17 मध्ये केलेला असल्यामुळे शासन निर्देशाप्रमाणे विहित कालावधीत योजना राबविण्यात आलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1082/645/266/34, दिनांक 29/07/1989 अन्वये योजनेचे मुल्यमापण करून फलश्रुती अहवाल सादर केलेला नाही.

**3.655 50 टक्के अनुदानावर पिक संरक्षण अंतर्गत नॅपसॅक स्प्रेपंप व पावर स्प्रे पंप पुरविणे योजना राबविण्यातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदर बाबत रक्कम रूपये 49,99,769/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1020/ प्र.क्र.14/38, दिनांक 07/01/2001 अन्वये लाभार्थी हिस्सा वसुल करुन साहित्य खरेदी करणेबाबत निर्देश असतांना लेखापरीक्षण वेळेपर्यंत लाभार्थी हिस्सा वसुल केल्याबाबत दस्ताऐवज नसल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झालेले असुन केवळ जिल्हा परिषद सेस निधी खर्च करणे हेतुनेच खरेदी केल्याचे दिसुन येते.

2) जिल्हा परिषद, कृषि विषय समिती दिनांक 19/08/2014 ठराव क्रमांक 4(6) नुसार पंचायत समितीकडून प्राप्त लाभार्थी यादी व जिल्हा परिषद सदस्य यांनी शिफारस केलेल्या यादीनुसार पंचायत समितीनिहाय लाभार्थी निवड करण्यात आल्याचे नमुद केले. परंतु लेखापरीक्षण वेळी पंचायत समितीकडून प्राप्त अर्ज / जिल्हा परिषद सदस्य यांनी शिफारस केलेल्या लाभार्थींचे अर्ज व निवड केलेल्या लाभार्थींची यादी सादर न केल्याने तांत्रिक मंजुरीच्या अटी व शर्तीनुसार अनुसूचित जाती / जमाती, बीपीएल खालील विमुक्त जाती, अल्प, अत्यल्प भुधारक, विधवा, अपंग, महिला शेतकरी व इतर शेतकरी या प्राधान्य क्रमानुसार निवड केल्याबाबत तपासणी करता आली नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1020/प्र.क्र.14/38, दिनांक 09/02/2001 चे उल्लंघन झालेले आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2007/ प्र.क्र.4871/वित्त-3, दिनांक 05/10/2012 अन्वये जिल्हा परिषद स्वनिधीतुन वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येतात. त्या योजनेच्या एकुण पात्र लाभार्थ्यापैकी 3 टक्के लाभार्थी अपंग प्रवर्गातील निवडणेबाबत निर्देश असतांना 3 टक्के अपंग लाभार्थी निवड बाबत दस्ताऐवज तसेच निवड यादी उपलब्ध नसल्याने वरील शासन निर्णयानुसार अपंग लाभार्थींची निवड केल्याची खात्री पटली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 चे परिशिष्ट ई नुसार योजना राबविण्यात आली नाही.

### 3.656 जिल्हा परिषद सेस फंडातून 50 टक्के अनुदानावर बॅटरी ऑपरेटेड नॅपसॅक स्प्रे-पंपचा पुरवठा करणेबाबतची अनियमितता.

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** कृषि विभाग, जिल्हा परिषद, वर्धा चे सन 2015-2016 या वित्तीय वर्षात लेखापरीक्षण करिता असतांना जिल्हा परिषद सेस फंडाअंतर्गत सुधारीत अवजारामध्ये बॅटरी ऑपरेटेड नॅपसॅक स्प्रे-पंपचा पुरवठा करण्याकरिता प्रमाणक क्रमांक 1621, दिनांक 17/03/2016 अन्वये रक्कम रुपये 49,800/- (स्व: निधी मधून प्रदान) खर्च करण्यात आला आहे.

उपरोक्त प्रमाणे बॅटरी ऑपरेटेड नॅपसॅक स्प्रे-पंपची खरेदी करण्याकरिता कृषि संचालक (नि.व गु.नि.) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य्, पुणे यांचे मार्गदर्शक सुचना दिनांक 18/01/2014 अन्वये सदर दर रुपये 850/- प्रति नग ठरविण्यात आले आहे. सदर साहित्य जिल्हा परिषद वर्धा अंतर्गत येत असलेल्या 08 पंचायत समितींना वाटप केल्याचे पोहोच पावतीवरुन निदर्शनास येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1094/सीआर/1633/ 57, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्सा जमा केल्याशिवाय निवड यादी जाहीर करु नये, असे असतांनाही 2015-16 मध्ये आठही पंचायत समितीकडून लाभार्थी हिस्सा रुपये 4,99,800/- लाभार्थ्यांकडून वसुल करुन जिल्हा परिषदेला जमा केल्याचे आढळले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषदांच्या स्वत: च्या उत्पन्नातून राबविण्यात येणा-या वैयक्तीक लाभांच्या योजनेतील मार्गदर्शक सूचनेनुसार दिनांक 30/11/2015 पर्यंत लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणे, दिनांक 31/01/2016 पर्यंत पुरवठादाराचे देयके अदा करणे व मार्च 2016 पर्यंत विनियोग दाखले प्राप्त करुन घेणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) आर्वी पंचायत समिती वगळता इतर पंचायत समितीच्या पोहच पावत्यावर साहित्य प्राप्त झाल्याचे तारीख नमूद नसल्यामुळे प्रत्यक्षात साहित्य कधी प्राप्त झाले याची शहानिशा करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1089/प्र.क्र.565/34, दिनांक 05/10/1989 व 02/09/1993 अन्वये मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना पंचायत समितीने गावनिहाय मास्टर नोंदवही सादर न केल्यामुळे एकाच व्यक्तीस दुबार लाभ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) शेतक-यांचे कृषि उत्पादन वाढीस सहाय्य करुन त्यांच्या आर्थिक उन्नती होणे हे योजनेचे उद्दिष्टे आहे. परंतु महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पीआरसी-1083/सीआर/1074/57, दिनांक 29/07/1982 नुसार योजनेचे उद्दिष्ट सफल झालेबाबतचे शेतक-यांचे (लाभार्थ्यांचे) उपयोगिता प्रमाणपत्र नस्तीत नसल्यामुळे याबाबत पडताळणी करता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 तसेच शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मधील वेळापत्रकानुसार साहित्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात करणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

7) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक 1083/1074, दिनांक 09/01/1983 नुसार योजना सफल झाल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे तपासणी अहवाल नाही.

**3.657 जिल्हा परिषद वाढीव उपकर योजना अंतर्गत 50 टक्के अनुदानावर ताडपत्रीचा अल्पभुधारक शेतक-यांना पुरवठा करणेबाबत अनियमितता.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** कृषि विभाग, जिल्हा परिषद, वर्धा चे सन 2015-2016 या वित्तीय वर्षात लेखापरीक्षण करिता असतांना जिल्हा परिषद सेस फंडाअंतर्गत सुधारीत अवजारामध्ये शेतक-यांना सिंचन पंप पुरविणेबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 39,83,560/- खर्च केला आहे. सदर साहित्य जिल्हा परिषद वर्धा अंतर्गत येत असलेल्या 08 पंचायत समितींना वाटप केल्याचे पोहोच पावतीवरुन निदर्शनास येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1094/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्सा जमा केल्याशिवाय निवड यादी जाहीर करु नये, असे असतांनाही 2015-16 मध्ये आठही पंचायत समितीकडून लाभार्थी हिस्सा रुपये 19,87,012/- लाभार्थ्यांकडून वसुल करुन जिल्हा परिषदेला जमा केल्याचे आढळले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषदांच्या स्वत: च्या उत्पन्नातून राबविण्यात येणा-या वैयक्तीक लाभांच्या योजनेतील मार्गदर्शक सूचनेनुसार दिनांक 30/11/2015 पर्यंत लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणे, दिनांक 31/01/2016 पर्यंत पुरवठादाराचे देयके अदा करणे व मार्च 2016 पर्यंत विनियोग दाखले प्राप्त करुन घेणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) पुरवठा पोहोच पावती (08 पंचायत समित्या) वर साहित्य प्राप्त झाल्याचे तारीख नमूद नसल्यामुळे प्रत्यक्षात साहित्य कधी प्राप्त झाले याची शहानिशा करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1089/प्र.क्र.565/34, दिनांक 05/10/1989 व 02/09/1993 अन्वये मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना पंचायत समितीने गावनिहाय मास्टर नोंदवही सादर न केल्यामुळे एकाच व्यक्तीस दुबार लाभ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) अवेळी येणा-या पावसापासुन धान्याचे / पिकांचे संरक्षण करुन चांगल्या प्रतीचे उत्पादन बाजारात विक्रीकरीता आणुन चांगल्या प्रतीचा बाजार भाव मिळवुन शेतक-यांचा आर्थिक परिस्थितीत सुधारणा होण्यास मदत होईल हे या योजनेचे उद्दिष्टे आहे. परंतु महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पीआरसी-1083/सीआर/1074/57, दिनांक 29/07/1982 नुसार योजनेचे उद्दिष्ट सफल झालेबाबतचे शेतक-यांचे (लाभार्थ्यांचे) उपयोगिता प्रमाणपत्र नस्तीत नसल्यामुळे याबाबत पडताळणी करता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 तसेच शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मधील वेळापत्रकानुसार साहित्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात करणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

7)  महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक 1083/1074, दिनांक 09/01/1983 नुसार योजना सफल झाल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे तपासणी अहवाल नाही.

8) सदर योजना ही जिल्हा परिषद स्तरावरुन राबविण्यात आली असल्यामुळे सर्व प्रक्रिया जिल्हा परिषद स्तरावरुन पार पाडणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

9) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर-1007/प्र.क्र.105/कोषा-प्र.5, दिनांक 22/02/2008 अन्वये आयकर कलम 194 सी नुसार एकुण रक्कम रुपये 39,79,913/- वर 2 टक्के प्रमाणे रुपये 79,598/- आयकराची कपात युनियन क्वालिटी प्लास्टीक लिमीटेड मुंबई कडून करुन शासन खाती चलनादवारे जमा केल्याची चलनाची प्रत लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही. त्यामुळे आयकर कपात केले किंवा नाही ही बाब तपासता आली नसल्यामुळे चलनाची प्रत सादर होईपर्यंत आयकर रक्कम रुपये 79,598/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

10) साठा पुस्तकाची तपासणी केली असता त्यावर वाटप दिनांक आढळले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात केंव्हा साहित्य वाटप करण्यात आले याबाबत शहानिशा करता आली नाही.

**3.658   50 टक्के अनुदानावर ताडपत्री पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 76,97,770/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1997 नुसार आयएसआय मार्क असलेली सर्वात कमी दराची व कमी जीएसएम ची ताडपत्री खरेदी करणे बंधनकारक असतांना देखील कृषी विभाग, जिल्हा परिषद, भंडारा यांनी 370 जी एस एमची ताडपत्री खरेदी केली. शासन निर्णयानुसार 200 जीएसएम ची ताडपत्री खरेदी केली असती तर जिल्हा परिषदेचे नुकसान झाले नसते. जिल्हा परिषद भंडारा ने ताडपत्रीची जाडी निर्धारित करण्यांचे निकष उदा. टॉलरन्स कॅपॅसिटी, हीट सिलींग, डबल स्टिचींग, वॉटर प्रुफनेसनेस, रेजीस्टंस ऑफ वॉटर, वॉटर पेनीटेशन वगैरे तांत्रिक बाबी विचारात न घेता 370 जीएसएम जाडीच्या ताडपत्रीचा पुरवठा आदेश दिल्यामुळे जिल्हा परिषदेचे नुकसान झाले आहे.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए2005/प्र.क्र.366/वित्त 5, दिनांक 30/12/2006 अन्वये रुपये 5 ते 50 लाख व त्यापेक्षा जास्त खर्चाची कामे जिल्हा स्तरावर मराठी/हिंदी तसेच राज्यस्तरावर मराठी/हिंदी/इंग्रजी वर्तमान पत्रांत प्रसिध्दीस देणे आवश्यक आहे. मात्र जिल्हा परिषद भंडारा ने दिवाळी शुभेच्छा जाहिराती सोबत जिल्हा स्तरीय दिवाळी अंकात जाहिरात प्रसिध्दीस दिली. दैनिक वृत्तपत्रापेक्षा दिवाळी अंकाचा खप कमी असल्यामुळे स्पर्धात्मक बाजारभावाचा लाभ मिळाला नाही. तसेंच नमुद शासन आदेशाचे उल्लंघन करण्यांत आले आहे.

3) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 च्या अनुच्छेद 63 प्रमाणे जिल्हा परिषद भंडाराने मुद्रांकावर करार न केल्यामुळे शासनाचे रुपये 7,700/- चे नुकसान झाले आहे. सदर नुकसानाची रककम संबंधीताकडुन वसुल करुन चालानव्दारे शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

4) लेखापरिक्षणास Central Institute of Plastic Engineering and Technology यांचा टेस्ट रिपोर्ट सादर करण्यांत आला मात्र टेस्ट रिपोर्ट करीता भरलेल्या शुल्काची पावती व खर्चाचे प्रमाणंक सादर करण्यांत आले नाही. टेस्ट रिपोर्टची सत्यता पडताळणी करीता तपासणी शुल्क भरल्याची पावती व खर्चाचे प्रमाणक सादर करणे आवश्यक आहे.

5) Central Institute of Plastic Engineering and Technology यांना टेस्ट रिपोर्ट करीता पाठविलेली ताडपत्री कोणत्या कोरीयर च्या माध्यमाने पाठविली त्याचा तपशील व खर्चाचे प्रमाणक लेखापरिक्षणांस सादर करण्यांत आले नाही.

6) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक जावक क्रमांक गु.नि/5/166/2014, दिनांक 14/10/2014 मध्ये योजना राबविण्यांबाबत मार्गदर्शक सुचना देण्यांत आल्या आहेत. त्यानुसार ग्रामसभेमार्फत

लाभार्थीची निवड करुन निवड यादी गटविकास अधिकारी यांचे मार्फत प्राप्त करुन जिल्हा निवड समिती पुढे सादर करणे व लाभार्थी यादी मंजुर करणे आवश्यक आहे. मात्र अशी कोणती ही कार्यवाही न करता जिल्हा परिषद भंडारा ने ताडपत्रीचा पुरवठा आदेश दिला. लेखापरिक्षण दिनांकास पंचायत समिती लाखणी व तुमसर यांचेकडुन लाभार्थी यादी अप्राप्त असल्याचे आढळुन आले.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1089/प्र.क्र.555/34, दिनांक 05/10/1989 नुसार मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. मास्टर नोंदवही अद्ययावत करवुन सादर करणे आवश्यक आहे.

**3.659 100 टक्के सुटीवर अनुसुचीत जाती उपयोजना अंतर्गत शेतक-यांना बैलगाडी वाटपाबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सन 2015-16 या वित्तीय वर्षाचे जिल्हा परिषद, गोंदिया येथील कृषी विभागाचे लेखापरीक्षण करीत असता असे निदर्शनास आले की अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांचे पुरवठा आदेश क्रमांक जिपगों/कृषी/विघयो/125/15, दिनांक 07/05/2015 अन्वये विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी विकास महामंडळ नागपूर यांना आदेश दिल्याप्रमाणे पुरवठादाराचे इनव्हॉईस बिल क्रमांक 460, दिनांक 30/11/2015 रक्कम रूपये 12,36,000/- चे दर रुपये 16,000/- प्रमाणे 96 नग बैलगाडीचा खालील दर्शविलेल्या तपशीलानुसार 8 पंचायत समितींना पुरवठा केल्याबाबत उपरोक्त प्रमाणकान्वये रक्कमेचे रूपये 15,12,000/- अभिकरण शुल्काची कपात करून शोधन केल्याबाबत खर्च नोंदविल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दंडाची रक्कम वसुल न करणेबाबत :- सदर डी.एम.ची तपासणी केली असता 8 डी.एम.पैकी एकाही डी.एम. वर ईशु झाल्याचा दिनांक नमुद नाही. तसेच पंचायत समितीला सदर बैलगाडी प्रत्यक्ष कोणत्या तारखेस प्राप्त झाले याबाबत सडक अर्जुनी पंचायत समिती वगळता उर्वरीत पंचायत समित्यांना प्रत्यक्ष बैलगाडीचा कधी पुरवठा करण्यात आला प्राप्तीचा दिनांक नमुद नाही. तरी बैलगाडी उशीरा प्राप्त झाल्याची शक्यता नाकारता येत नसून महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांचे दर निश्चिती शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2013/प्र.क्र.158/11-अे, दिनांक 27/09/2013 मधील अट क्र.8 चे मार्गदर्शक सुचनांचे पालन केले नाही.

2) पुरवठादार संस्थेस पुरवठा आदेश क्रमांक 125, दिनांक 07/05/2015 अन्वये मेक एमएआयडीसी 12971: 1990 वजन 240 के.जी. Draft 47.00 kg 1000 किलो वजन वाहुन नेण्याच्या क्षमतेच्या 96 नग बैलगाडी (चाकासह) चा पुरवठा करणेबाबत पुरवठा संस्थेस आदेश देण्यात आले होते. सदर पुरवठादार संस्थेने पंचायत समितीस पुरवठा केलेल्या डी.एम.ची तपासणी केली असता डी.एम.वर पुरवठा आदेशात नमुद केलेल्या वर्णनाप्रमाणेच साहीत्याचा पुरवठा केल्याबाबतचा तपशील नमुद नसल्याचे दिसून आले. तरी डी.एम.मध्ये सविस्तर तपशिल नमुद नसल्याने ज्या स्पेशीफीकेशन प्रमाणे मागणी केली त्याच प्रमाणे पुरवठा झाला असे म्हणता येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1083/प्र.क्र. 1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार गावनिहाय, कुटुंबनिहाय, लाभार्थीनिहाय तालुकास्तरावर व जिल्हास्तरावर नोंदवही ठेवून लाभार्थ्याला लाभ दिल्यानंतर जो लाभ दिला त्या लाभाची त्या मास्टर नोंदवहीत नोंदी घेणे आवश्यक आहे. सदर नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त न झाल्याने एकाच लाभार्थीला अनेक योजनामधून किंवा ह्याच योजनेमधून दुबार लाभ न दिला गेल्याची तसेच एकाच कुटुंबातील दोन तसेच अधिक व्यक्तीला लाभ दिला नसल्याबाबतची शक्यता नाकारता येत नाही.

4) महाराष्ट शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट ई मधील नेमुन दिलेल्या वेळापत्रकानुसार सदर योजनेची अमालबजावणी करण्यात आल्याचे दिसून आले नाही.

5) लाभार्थीचे प्रस्ताव लेखापरीक्षणास सादर केले नाही. त्यामुळे प्रशासकीय मान्यता महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक विघयो-1514/ प्र.क्र.97/4अे,

दिनांक 07/07/2014 चे शासन निर्णयातील परिशिष्ट-(तिन) (दोन) मधील 1 ते 4.2 चे निकषानुसार निवड करून लाभ दिल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आलेली नाही. तरी गरजु व योग्य लाभार्थ्यांनांच लाभ दिला असल्याबाबतचे दस्ताऐवजासह खात्री पटवून दयावी.

6) महाराष्ट शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक विघयो-1514/प्र.क्र.97/4अे, दिनांक 07/07/2014 मधील परीच्छेद क्रमांक 7 अन्वये सदर योजने अंतर्गत लाभ देण्यात आलेल्या लाभार्थ्यांचा फलनिष्पती अहवाल घेण्यात आल्याचे दिसून आले नसुन पंचायत समितीकडून उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त केल्याचे दिसून आले नाही.

**3.660 100 टक्के अनुदानावर 60 नग पेट्रोडिझेल पंपसंच पुरवठा योजना राबविण्यातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती स्तरावर साहित्य पुरवठा केल्याबाबत त्यांना शासन. हिस्सा रुपये 11,40,000/- चे शोधन केल्याबाबत रोखपुस्तकाला खर्च नोंदविला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समितीकडून प्राप्त लाभार्थी यादी व जिल्हा परिषद सदस्य यांनी शिफारस केलेल्या यादीनुसार पंचायत समितीनिहाय लाभार्थी निवड करण्यात आल्याचे नमुद केले, परंतु लेखापरीक्षण वेळी पंचायत समितीकडून प्राप्त अर्ज / जिल्हा परिषद सदस्य यांनी शिफारस केलेल्या लाभार्थीचे अर्ज व निवड केलेल्या लाभार्थीची यादी सादर न केल्याने तांत्रिक मंजुरीच्या अटी व शर्तीनुसार अनुसूचित जाती / जमाती, बीपीएल खालील विमुक्त जाती, अल्प, अत्यल्प भुधारक, विधवा, अपंग, महिला शेतकरी व इतर शेतकरी या प्राधान्य क्रमानुसार निवड केल्याबाबत तपासणी करता आली नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1020/प्र.क्र.14/38, दिनांक 09/02/2001 चे उल्लंघन झालेले आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2007/ प्र.क्र.4871/वित्त-3, दिनांक 05/10/2012 अन्वये जिल्हा परिषद स्वनिधीतुन वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येतात त्या योजनेच्या एकुण पात्र लाभार्थ्यापैकी 3 टक्के लाभार्थी अपंग प्रवर्गातील निवडणेबाबत निर्देश असतांना 3 टक्के अपंग लाभार्थी निवडबाबत दस्ताऐवज तसेच निवड यादी उपलब्ध नसल्याने वरील शासन निर्णयानुसार अपंग लाभार्थीची निवड केल्याची खात्री पटली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 चे परिशिष्ट ई नुसार योजना राबविण्यात आली नाही.

4) लेखापरीक्षणाचे वेळी पंचायत समिती स्तरावरील साठा पुस्तके सादर न केल्याने साहित्य प्राप्ती व लाभार्थी निवडीनुसार साहित्य वाटप केल्याबाबत तपासणी करता आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार योजनेचे मुल्यमापन करुन फलश्रुती अहवाल शासनास सादर करणेबाबत निर्देश असतांना फलश्रुती अहवाल नस्तीबध्द् नाही.

**3.661 7 टक्के वन महसुल योजना अंतर्गत शेतकऱ्यांना 75 टक्के अनुदानावर सेंद्रीय खतांचा पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद सेस फंडात 7 टक्के वन महसुल योजना अंतर्गत शेतकऱ्यांना 75 टक्के अनुदानावर सेंद्रीय खतांचे वाटप करण्याकरिता रोख पुस्तकात 2 प्रमाणकांन्वये रक्क्म रुपये 24,99,588/- खर्च नोंदविण्यात आलेला आहे.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र. 680/वित्त-9, दिनांक 31/01/2013 मधील भाग क्र. 2 नुसार विकास योजनांच्या संबंधातील प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार रूपये 25,00,001/- ते रुपये 50,00,000/- पर्यंत जिल्हा परिषद स्थायी समितांना दिलेला आहे. त्याप्रमाणे लाभार्थी हिस्सा धरुन सदर योजना एकूण रुपये 33,32,784/- पर्यंत होत असल्यामुळे स्थायी समितीची एवढया रक्कमेस प्रशासकीय मंजुरी घेणे आवश्यक असतांना कृषी समितीची घेण्यात आलेली आहे. तसेच प्रशासकीय

व तांत्रिक मंजुरी घेतांना लाभार्थी हिस्साच्या रक्कमेचा समावेश करुन घेणे आवश्यक असतांना, तशी कार्यवाही करण्यात न आल्याने प्रशासकीय/ तांत्रिक मान्यतेशिवाय एकूण रुपये 8,32,784/- एवढा खर्च केल्याचे निष्पन्न होते.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक एफआरजी-1093/ सीआर 2426/24, दिनांक 12/11/1993 मध्ये नमुद केलेल्या आदिवासीच्या उन्नतीच्या योजनामध्ये (7 टक्के वन महसुल योजना) सेंद्रीय खते वाटप करण्याबाबत स्पष्ट असा उल्लेख करण्यात आलेला नाही. तसेच शासन निर्णय दिनांक 08/01/2004 नुसार सुध्दा जंगलक्षेत्राच्या विकासासाठी असणाऱ्या योजनांकरिता खर्च करण्यात यावा असे नमुद आहे. तरी उपरोक्त शासन निर्णयात सदर योजनेचा उल्लेख नसतांना राबविणेबाबत कारणमिमांसा होणे आवश्यक आहे.

3) कृषि आयुक्तालयाचे परिपत्रक क्रमांक कृषि/16सीबीसेल/लाभार्थी/470/2012, दिनांक 12/03/2012 नुसार ज्या प्रकरणी अनुदान वजा जाता लाभार्थी हिश्याची रक्कम वसूल करावयाची आहे. तेथे ती संबंधिताकडून रोख/ डी.डी. स्वरूपात अथवा सुधारीत शासन निर्णयानुसार वसुल करून या रक्कमेची लाभार्थ्यांना शासकीय जमा पोचपावती देण्यात यावी. तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक पंरास/1094/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्सा जमा केल्याशिवाय निवड यादी जाहीर करु नये. असे असतांना सर्व 15 पंचायत समितीकडून एकूण रूपये 8,33,196/- लाभार्थी हिस्सा लेखा परिक्षणापर्यंत वसुल करण्यात आला नसल्याचे दस्ताऐवजावरुन दिसून येते.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 तसेच शासन निर्णय दिनांक 17/01/2001 अन्वये जिल्हापरिषदेकडील वैयक्तीक लाभाच्या योजना राबवितांना वेळापत्रकाचे पालन करण्यात येत नसल्याचे दिसून येते.

5) सदर योजना जिल्हा परिषद सेस अंतर्गत असून जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येत असतांना त्यांचे लाभार्थ्यांचे अर्ज जिल्हा परिषद स्तरावर न ठेवता, पंचायत समिती येथे ठेवण्यात येत असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर लाभार्थ्यांच्या अर्जाची तपासणी करता येत नसून ते कृषि विकास अधिकारी यांचे स्वाक्षरीसह मंजुरी घेण्यात आले किंवा नाही याची शहानिशा करता येत नाही.

6) सदर साहित्य (सेंद्रीय खते) शेतकऱ्यास प्रति लाभार्थी 10 बॅग कमाल मर्यादेत वाटप करावयाचे आहे. त्याप्रमाणे प्राप्त झाल्याचे व त्याचा उपयोग करण्यात आल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र/ मुल्यमापन अहवाल सादर करण्यात आले नाही. त्यामुळे ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1082/645/34, दिनांक 29/07/1989 अन्वये योजनेचे मुल्यमापन केल्याचे दिसून येत नाही.

## 3.662 20 टक्के मागासवर्गीय कल्याणकारी योजना 2015-16 अंतर्गत 100 टक्के अनुदानावर सुक्ष्म अन्नद्रव्य खताचे वाटप.

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** 20 टक्के मागासवर्गीय कल्याणकारी योजना 2015-16 अंतर्गत 100 टक्के अनुदानावर सुक्ष्म् अन्नद्रव्य् खताचे वाटप करण्याकरिता प्रमाणक क्रमांक 511, दिनांक 30/03/2016 अन्वये रक्कम रुपये 19,99,800/- खर्च करण्यात आला आहे.

उपरोक्त् प्रमाणे सुक्ष्म् अन्नद्रव्य् खत 10 कि.ग्रा.प्रती बॅग प्रमाणे खरेदी करण्याकरिता ई-निवीदे मार्फत दर रुपये 360/- प्रति बॅग ठरविण्यात आले आहे. सदर साहित्य जिल्हा परिषद चंद्रपूर अंतर्गत येत असलेल्या 14 पंचायत समितींना वाटप केल्याचे पोहोच पावतीवरुन निदर्शनास येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषदांच्या स्वत:च्या उत्पन्नातून राबविण्यात येणा-या वैयक्तीक लाभांच्या योजनेतील मार्गदर्शक सूचनेनुसार 30 नोव्हेंबर 15 पर्यंत लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणे, 31 जानेवारी 16 पर्यंत पुरवठादाराचे देयके अदा करणे व मार्च 2016 पर्यंत विनियोग दाखले प्राप्त करुन घेणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) आयकर अधिनियम 1961 कलम 194 सी नुसार दिनांक 1/07/2010 पासून एकावेळी प्रदान रुपये 30,000/- व वार्षिक प्रदान रुपये 75,000/- असेल तेंव्हा 2 टक्के या दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार मे.आर्यव इंटरनॅशनल चंद्रपूर या पुरवठादाराकडून त्यांना प्रदान करण्यात आलेली रक्कम रुपये 19,99,800/- वर 2 टक्के प्रमाणे रुपये 39,996/- आयकर कपात करुन शासन खाती जमा करणे आवश्यक असतांना विभागादवारे आयकर कपात केलेली नाही. पुरवठादाराकडून उपरोक्तप्रमाणे आयकर कपात करुन शासन खाती जमा केलेला नाही किंवा पुरवठादाराचे आयकर क्लियरन्स प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही.

3) शेतक-यांचे कृषि उत्पादन वाढीस सहाय्य करुन त्यांच्या आर्थिक उन्नती होणे हे योजनेचे उद्दिष्टे आहे. परंतु महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पीआरसी-1083/सीआर/1074/57, दिनांक 29/7/1982 नुसार योजनेचे उद्दिष्ट सफल झालेबाबतचे शेतक-यांचे (लाभार्थ्यांचे) उपयोगीता प्रमाणपत्र नस्तीत नसल्यामुळे उद्दिष्टे सफल झाल्याची पडताळणी करता आली नाही.

**3.663 शेतक-यांना 75 टक्के अनुदानावर सौर कंदिल पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 27) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 548, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 9,98,955/- खर्च करण्यात आला आहे.

मे. हसन मार्केटिंग प्रा लि.चंद्रपूर यांना जिल्हा परिषद सेस फंड योजना सन 2014-15 अंतर्गत 75 टक्के अनुदानावर सर्व घटकातील व वर्गवारीतील शेतक-यांना सौर कंदिलाचा पुरवठा करणे बाबत आदेश आला व उपरोक्त प्रमाणकान्वये संबंधितास रकमेचे शोधन करण्यात आले.

1) प्रशासकीय व तांत्रिक मान्यता लाभार्थी हिस्स्याह घेतली नाही.

2) खरेदी पूर्वी शासन नियमाप्रमाणे 25टक्के लाभार्थी हिस्सा प्राप्त करून घेतला नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 दिलेले वेळापत्रक न पाळल्याने लाभार्थ्यांना विहीत मुदतीत लाभ मिळाला नाही.

4) विहीत कालावधीत प्रत्येक पंचायत निहाय साहित्य प्राप्त झाल्याबाबत पंचायत समिती चंद्रपूर/राजुरा/भद्रावती/वरोरा/ब्रम्हपूरी/गोंडपिपरी/कोरपना/जिवती या पंचायत समित्यांचे सन 2015-16 चे साठा पुस्तक प्राप्त झाले नाही.

5) कोणत्या बॅच नंबरचे अथवा लॉट नंबरचे सौर कंदिल कोणकोणत्या पंचायत समितीला पुरवठा करण्यात आले त्याबाबत अहवाल नाही.

6) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 सी नुसार प्रदान केलेल्या रकमेच्या 2 टक्के आयकराची रक्कम पुरवठादाराच्या देयकातून कपातीची कार्यवाही केली नाही.

7) Maharashtra Development Agency (Mada) चे RC मधील मुद्दा क्रमांक 34 नुसार 10 टक्के of the total cost will be released after submition of one month performance report. परंतु सौर कंदिलाचा असा performance report. नस्तीला आढळून आला नाही.

8) रुपये 200/- च्या स्टॅंप पेपरवर अटि व शर्तीसह करारनामा केला परंतु त्यावर लिहून घेणाराची स्वाक्षरी नाही. तसेच करारनामा कोणत्या दिनांकास केला ते नमूद नाही.

**3.664 जिल्हा वार्षिक नियोजन अंतर्गत शेतक-यांना / शेतकरी गट / महिला बचत गटांना / कृषि विषयक कार्यरत संस्था तसेच ग्रामपंचायतींना 25 टक्के व 50 टक्के अनुदानावर कृषि साहित्य वाटप योजना खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 3109, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 26,54,000/- खर्च करण्यात आला आहे.

उपरोक्त प्रमाणकानुसार जिल्हा वार्षिक नियोजन अंतर्गत कृषि यांत्रिकीकरण करुन जिल्हयातील शेतक-यांना यंत्राच्या सहायाने शेती करण्यास प्रोत्साहित करण्यास व कृषि वनोपज प्रक्रियेस चालना देणे या योजने अंतर्गत कृषि औजारे/यंत्राचा पुरवठा करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थीची निवड करणे बाबत शासन परिपत्रक क्रमांक पंरास-4114/प्र.क्र.136/4-अे, दिनांक 23/09/2014 कृषि व पदुम विभाग अन्वये लाभधारकांची यादी प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला योजना अंतर्गत जिल्हा परिषद स्तरावर सादर करणे आवश्यक असतांना लाभार्थी यादी लेखापरीक्षणास सादर करणेत आली नाही.

2) योजनेतील अट क्रमांक 5 नुसार गटविकास अधिकारी यांनी योजनांतर्गत लक्षांकानुसार लाभार्थी साहित्याची मागणी जिल्हा परिषदेकडे सादर केली नाही.

3) पंचायत समिती मार्फत योजनेचे उपयोगीता प्रमाणपत्रे सादर केली नाही.

4) साहित्य किंमतीतील तफावती बाबत साहित्य प्रमाणकानुसार प्रदानात तफावत आढळते.

तरी पावरटिलर चे दरात रुपये 61,600/- व बैलचलीत पेरणीयंत्रचे दरात रुपये 300/- ची तफावत आढळते तरी एकाच प्रकारचे साहित्य कमी/अधिक दराने प्रदान करणे बाबत खुलासा करावा.

5) लाभार्थी हिस्सा वसूलीचा तपशिल सादर करणेत आला नाही.

6) शासन निर्णय क्रमांक कृषि व पदुम विभाग क्रमांक सूकृऔ/2015/प्र.क्र.218/11 अे, दिनांक 23/11/2015 अन्वये प्रपत्र-2 मार्गदर्शक सुचना-11- नुसार कृषि अधिकारी यांनी कृषि औजाराची तपासणी केली नाही.

**3.665 महाराष्ट्र मानव विकास अभियान कार्यक्रम सन 2014-15 अंतर्गत शेतकरी गटांना भातमळणी यंत्र 90 टक्के अनुदानावर वाटप योजना खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 2280, दिनांक 29/03/016 अन्वये रक्कम रुपये 42,52,500/- खर्च करण्यात आला आहे.

उपरोक्त प्रमाणकानुसार महाराष्ट्र मानव विकास अभियान कार्यक्रम अंतर्गत नवीन योजना सन 2014-15 कृषि प्रक्रियेद्वारे शेतकरी / महिला गटांना रोजगार / उत्पन्नात वाढ करणे व कृषि यांत्रिकीकरणाद्वारे शेती गटाचा शेती उत्पन्नात वाढ करणे करीता योजने नुसार एकूण 45 गटांकरीता भातमळणी यंत्र (Paddy Thresher) ची खरेदी करण्यात आली असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजनेनुसार कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे पत्र क्रमांक जिपग/कृषि/214/2016 दिनांक 23/02/2016 अन्वये एकूण 45 गटांना मान्यता देणेत आली असून पंचायत समितीचे प्रस्ताव लेखापरिक्षणास सादर करणेत आले नाही.

2) सदरचे साहित्य खरेदी करीता कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दरकरार दिनांक 04/10/2013 व शासन निर्णय ,कृषि विभाग क्रमांक सुकृऔ-2013/प्र.क्र.158/11-अे, दिनांक 27/09/2013 अन्वये Paddy Thresher 25 HP रुपये 1,20,000/- चे असून सदरचे साहित्याचे पुरवठा आदेशात मात्र Paddy Thresher 7.5HP एकूण 45 नग रुपये 1,17,398/- चे दराचे पुरवठा आदेश देणेत आले आहे. त्यामुळे तांत्रिक मान्यता नसलेले भातमळणी यंत्र खरेदी करणेत आले आहे.

3) महाराष्ट्र शासन, कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2015/प्र.क्र.218/11अे, दिनांक 23/11/2015 चे मार्गदर्शक सुचना क्रमांक 13(ii) नुसार प्रत्यक्ष लाभधारकाची ठरावीक बॅन्डची मागणी आवश्यक आहे.

4) उपरोक्त शासन निर्णयानुसार कृषि विकास अधिकारी यांनी क्षेत्रीयस्तरावर रॅन्डम पध्दतीने भातमळणी यंत्राची 2.50 टक्के तपासणी केलेचे आढळत नाही. त्यामुळे यंत्रे योग्य स्वरुपाची असले बाबत खात्री होत नाही.

5) सदरचे साहित्यची नोंद जिल्हा परिषद कृषि विभागाचे साठापुस्तक पान क्रमांक 24 वर असून पंचायत समितीचे उपयोगीता प्रमाणपत्रे व फलश्रृती अहवाल लेखापरीक्षणास सदर करणेत आले नाही.

**3.666 अभिकरण शुल्क वसूल न केल्याबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मविआ 1099/प्र.क्र.3458/24, दिनांक 29/05/1999 व महाराष्ट्र राज्य, जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मधील कलम 123 अनुसार अभिकरण तत्तावर जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजना / कामे यासाठी जिल्हा परिषदेस अभिकरण शुल्क देण्यात येते. कृषि विभागाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात असे निदर्शनास आले आहे की, सन 1999-2000 पासून या विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या अशा योजना संदर्भात जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना अभिकरण शुल्क प्राप्त झालेले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मविआ 1099/प्र.क्र.3458/24, दिनांक 29/05/1999 व जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मधील कलम 123 अनुसार अभिकरण तत्तावर जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजना / कामे यासाठी जिल्हा परिषदेस दिनांक 01/04/1999 पासून 5 टक्के अभिकरण शुल्क देय आहे. त्यापैकी 4 टक्के अभिकरण शुल्क जिल्हा परिषदेने संबंधीत वर्षाच्या तरतुदीमधून मुळात (At-Source) कापून घ्यावे. उर्वरित 1 टक्का रक्कम त्या वित्तीय वर्षाच्या खर्चाचे लेखापरिक्षण झाल्यावर संबंधीत विभागाचे नियंत्रण अधिकारी जिल्हा परिषदेस मंजुर करतील. अभिकरण शुल्काची रक्कम ही जिल्हा परिषदेचे स्वत:चे उत्पन्न म्हणून गणले जाईल. विभागाचे सन 2015-2016 चे लेखापरिक्षणाचे वेळी 5 टक्के पैकी 4 टक्के रक्कम तरतुदीमधून मुळात (At-Source) कापून घेण्यात आली आहे. तथापि, उर्वरित 1 टक्के रक्कम सन 1999-2000 पासून नियंत्रण अधिकाऱ्याकडून प्राप्त करुन घेण्यात आलेली नाही. सन 1999-2000 पासून 1 टक्के प्रमाणे किती रक्कम येणे आहे ? याची कोणतीही नोंद विभागाकडे नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर जिल्हा परिषद उत्पन्नाचे नुकसान होत आहे.

तरी सन 1999-2000 पासून 1 टक्के प्रमाणे येणे असलेल्या रक्कमेची परिगणना करुन सदर रक्कम संबंधीत नियंत्रण अधिकाऱ्यामार्फत प्राप्त करुन घेऊन अनुपालन लेखापरिक्षणास दर्शवावे.

**3.667 विशेष घटक योजने अतंर्गत 100 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना बैलगाडी, डवरा वखर व सारायंत्र पुरवठा करणे योजनेतील अनियमिततााबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रुपये 59,43,600/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विशेष घटक योजने अंतर्गत 100 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना शेती अवजारे पुरवठा करणेसाठी सन 2014-2015 मध्ये जुलै व मे या महिन्यात प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्यात आली होती. तसेच शेती अवजारांसाठी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ यांचेशी शासनाने दरकरार देखील केलेला होता. असे असतांना विभागाने पुरवठा आदेश सन 2014-2015 च्या अखेरीस दिलेले असून प्रत्यक्ष साहित्य पंचायत स्तरावर माहे ऑगस्ट 2015 ते नोंव्हेंबर 2015 मध्ये प्राप्त झाले आहे व त्यानंतर पंचायत स्तरावरुन शेतकऱ्यांना ते वाटप केल्याचे दिसून येते. म्हणजेच शेतकऱ्यांना योजनेचा वेळीच लाभ देण्यात आलेला नाही. तसेच अनुदान व्यपगत होऊ नये. म्हणून घाई घाईत पुरवठा आदेश दिल्याचे दिसून येते.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 7 नुसार जिल्हा परिषदेने ज्या योजना राबविलेल्या आहेत, त्या योजनेचे साहित्य त्याच वर्षात वाटप करणे आवश्यक आहे. परंतु, सदर योजनेचे साहित्य त्याच वर्षात वाटप झालेले नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.41/33, दिनांक 17/01/2011 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 च्या परिशिष्ट (ई) वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्यासाठी त्यात

दिलेल्या स्थायी सुचनेनुसार योजनांची निवड प्रक्रिया, पुरवठा आदेश, साहित्याचे वाटप, विनियोग प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे इत्यादी कार्यवाही ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

4) सदर योजनेच्या प्रशासकीय आदेशामध्ये व तांत्रिक मंजुरी आदेशामध्ये दिलेल्या सुचनाप्रमाणे अल्प भुधारक व महिला शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच एका कुटुंबातील एका पेक्षा जास्त व्यक्तीना लाभ देण्यात येऊ नये अशा सुचना आहेत. तथापि, कृषि विभागाने पंचायत समिती स्तरावर व जिल्हा स्तरावर तशा लाभार्थ्यांच्या नोंदवह्या न ठेवल्यामुळे दुबार लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) तालुका स्तरावरुन लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या साहित्याच्या नोंदी समोर दिनांक नमुद करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत नाही. त्यामुळे साहित्य केव्हा वाटप करण्यात आले ? याबाबत अचुक खात्री करता आली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 79 नुसार देयकासोबत संलग्न उपप्रमाणकावर रक्कम अदा करतांना ती पुन्हा उपयोगात येणार नाहीत, या पध्दतीने विरुपित (Paid and Cancel) केलेले नाहीत.

**3.668 अनुसुचित जाती नवबौध्द शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्याची योजने अंतर्गत इतर लाभ या घटकासाठी 100 टक्के अनुदानावर शेती अवजारे / साहित्य पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,55,99,564/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अनुसुचित जाती नवबौध्द शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्याची योजने अंतर्गत इतर लाभ यासाठी शासनाने दिनांक 07/07/2014 रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील मुद्दा क्रमांक 3.1.1.2 नुसार प्रशासकीय मान्यतेचे आदेश एक वर्षापर्यंतच ग्राहय आहे. एका वर्षाच्या कालावधीनंतर प्रशासकीय मान्यतेचे नवीन आदेश काढण्याचे निर्देश असतांना असे आदेश न काढताच खरेदी प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

2) अनुसुचित जाती नवबौध्द शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्याची योजने अंतर्गत 100 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना शेती अवजारे पुरवठा करणेसाठी सन 2014-2015 मध्ये जुलै व मे या महिन्यात अनुक्रमे प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्यात आली असतांना विभागाने ई-निविदा प्रक्रिया माहे जानेवारी 2016 मध्ये राबविल्याचे दिसून येते. तसेच विभागाने पुरवठा आदेश सन 2015-2016 च्या अखेरीस दिलेले असून प्रत्यक्ष साहित्य त्यानंतर पंचायत स्तरावर प्राप्त होऊन शेतकऱ्यांना ते वाटप केल्याचे दिसून येते. म्हणजेच सन 2015-2016 मध्ये शेतकऱ्यांना योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळालेला नाही. केवळ सन 2014-2015 चे अनुदान व्यपगत होऊ नये, म्हणून घाई घाईत ई-निविदा प्रक्रिया राबवून पुरवठा आदेश दिल्याचे दिसून येते.

3) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील मुद्दा क्रमांक 3.1.1.1 नुसार निविदा ही आयएसआय मार्क व आयएसआय मार्कशी समांतर उत्पादकांकडून मागविण्याचे निर्देश असतांना निविदेत तसा उल्लेख केलेला दिसून येत नाही.

4) उपरोक्त शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक 3.1.1.2 नुसार वित्त विभागास खरेदीच्या देयकांच्या रक्कमा 15 मार्च नंतर मंजुर न करण्याचे निर्देश असतांना वित्तीय वर्षाच्या अखेरच्या दिनांकास देयकांच्या रक्कमा मंजुर करण्यात आल्या आहेत.

5) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पुरवठा आदेश क्रमांक 328, दिनांक 23/03/2016 नुसार 207 नग, 5 HP सब मर्सिबल पंपाचे पुरवठा आदेश देण्यात आले होते. सदर पंप दिनांक 28/03/2016 ते दिनांक 31/03/2016 या कालावधीत पंचायत स्तरावर पोहोच झाल्याचे डिलीव्हरी चलान वरुन दिसून येते. सदर 207 पंप प्राप्त झालेले नसतांना आदेश क्रमांक 333, दिनांक 26/03/2016 अन्वये पुन्हा 171 सब मर्सिबल पंपाचे पुनर्प्रत्यायी आदेश देण्यात आलेले आहेत. उपरोक्त शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक 3.3.2 (क) नुसार मुळ आदेशातील खरेदीच्या

वस्तूंचा पुरवठा पुर्ण झाला असेल तरच पुनर्प्रत्यायी आदेश देता येईल. तथापि, सदर निर्देशाचे उल्लंघन झालेले आहे. तसेच मुद्दा क्रमांक 3.3.2 (फ) नुसार प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

6) मंजुर कृती आराखड्यानुसार एकूण 1,271 लाभार्थ्यांना लाभ अनुज्ञेय असतांना 1,010 लाभार्थ्यांनाच लाभ दिल्याचे दिसून येते.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 7 नुसार जिल्हा परिषदेने ज्या योजना राबविलेल्या आहेत, त्या योजनेचे साहित्य त्याच वर्षात वाटप करणे आवश्यक आहे. परंतु सदर योजनेचे साहित्य त्याच वर्षात वाटप झालेले नाही.

8) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.41/33, दिनांक 17/01/2011 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 च्या परिशिष्ट (ई) वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्यासाठी त्यात दिलेल्या स्थायी सुचनेनुसार योजनांची निवड प्रक्रिया, पुरवठा आदेश, साहित्याचे वाटप,विनियोग प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे इत्यादी कार्यवाही ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

9) सदर योजनेच्या प्रशासकीय आदेशामध्ये व तांत्रिक मंजुरी आदेशामध्ये दिलेल्या सुचनांप्रमाणे अल्प भुधारक व महिला शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच एका कुटुंबातील एका पेक्षा जास्त व्यक्तीना लाभ देण्यात येऊ नये, अशा सुचना आहेत. तथापि, कृषि विभागाने पंचायत समिती स्तरावर व जिल्हा स्तरावर तशा लाभार्थ्यांच्या नोंदवह्या न ठेवल्यामुळे दुबार लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

10) तालुका स्तरावरुन लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या साहित्याच्या नोंदीसमोर दिनांक नमुद करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत नाही. त्यामुळे साहित्य केंव्हा वाटप करण्यात आले ? याबाबत अचुक खात्री करता आली नाही.

**3.669 विशेष घटक योजना अतंर्गत 100 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना शेतीची अवजारे वाटपातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सन 2015-2016 कृषि विभागाचे लेखापरिक्षणाचे वेळी पंचायत समिती स्तरावरील साठा नोंदवहीची तपासणी केली असता विशेष घटक योजने अंतर्गत 100 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना वाटप करण्यासाठी प्राप्त अवजारे लेखापरिक्षण दिनांकापर्यंत प्रत्यक्षात वाटप करण्यात आलेली नसून सदर अवजारे पंचायत समिती स्तरावर पडून आहेत. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.41/33, दिनांक 17/01/2011 व त्या अनुषंगाने निर्गमित केलेले महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 च्या परिशिष्ट (ई) वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्यासाठी त्यात दिलेल्या स्थायी सुचनेनुसार योजनांची निवड प्रक्रिया, पुरवठा आदेश, साहित्याचे वाटप, विनियोग प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे इत्यादी कार्यवाही दिलेल्या वेळापत्रकानुसार अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1093/प्र.क्र.239/34, दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 7 नुसार जिल्हा परिषदेने राबविलेल्या योजनेचे साहित्य त्याच वर्षात वाटप करणे आवश्यक आहे. सदर योजनेची काही साहित्य (लेखापरिक्षण दिनांकापर्यंत पंचायत समिती स्तरावर पडून आहे) त्याच वर्षात वाटप झालेले नाही.

3) तालुका स्तरावरुन लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या साहित्याच्या नोंदीसमोर दिनांक नमुद करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत नाही. त्यामुळे साहित्य केंव्हा वाटप करण्यात आले ? याची खात्री करता आली नाही.

4) पंचायत समिती स्तरावर अवजारे / साहित्य पडून असल्यामुळे योजनेचा उद्देश सफल झालेला नाही. तसेच योजनेचा लाभ वेळीच लाभार्थ्यांना झालेला दिसून येत नाही.

5) पंचायत समिती, पैठण लाभार्थी श्री.रघुनाथ गणपत निकाळजे यांना ताडपत्री (3 नग), सारायंत्र (1 नग), वखर (1 नग), स्टील डवरा स्टेट (1 नग) प्राप्त झालेबाबतची पोच लेखापरिक्षणाचे वेळी सादर करण्यात आलेली नाही. याबाबत खुलासा करुन पुर्तता दर्शवावी.

6) शेतकऱ्यांना विविध योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभासंबंधी एकही पंचायत समिती स्तरावर मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1069/प्र.क्र.555/34, दिनांक 05/10/1989 नुसार विभागाने पंचायत समिती / वित्तीय वर्षनिहाय लाभार्थी नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रत्येक वर्षाला लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची नोंद घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे काही शेतकऱ्यांना दुबार लाभ दिल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**3.670 शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर ओपन वेल संच पुरवठा खर्चातील अनियमितता**

**जिल्हा परिषद जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रूपये 2,40,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा पुर्व तांत्रिक अहवाल नस्ती उपलब्ध नाही.

2) पुरवठा झाल्यानंतर चाचणी अहवाल/ गुणवत्ता चाचणी कृषी विद्यापीठ / शासन अभियांत्रिकी महाविद्यालये यांचेकडुन करुन घेण्यात आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक झेडपीए/2006/प्र.क्र.446/ वित्त 9, दिनांक 20/06/2008 मधील परीशिष्ट ई नुसार योजनेचे लाभार्थी निवड दिनांक 30 मे अखेर व साहित्य वाटप 30 नोव्हेंबर अखेर करणे आवश्यक होते. प्रत्यक्षात साहित्य वाटप दिनांक 31/03/2016 रोजी करण्यात आल्याचे नोंद करण्यात आली आहे. तसेच मार्च पर्यंत विनियोग दाखले प्राप्त करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही केल्याचे दिसत नाही. खुलासा करुन अनुपालन दर्शवावे.

4) पंचायत समितीने गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवली नसल्यामुळे लाभार्थीना दुबार लाभ दिला गेला, याची शक्यता नाकारता येत नाही.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन परीपत्रक पीआसी/1083/67, दिनांक 02/07/1993 नुसार लाभार्थीकडुन सक्षम अधिकारी यांचेकडुन फलश्रृती अहवाल घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

6) पुरवठा संस्थानी पुरवठा केलेल्या अवजारांच्या गुणवत्तेबाबत किमान हमी कालावधी एक वर्षाचा राहील व काही अवजारांबाबत उत्पादकाने जाहीर केल्यानुसार 6 महिने कालावधी एक वर्षापेक्षा अधिक राहील. तसेच पुरवठा संस्थानी लाभधारकास हमीपत्र देणे आवश्यक असतांना पुरवठादाराकडुन हमी पत्र घेण्यात आल्याचे दिसुन येत नाही.

7) अंतरिम मार्गदर्शक सुचना दिनांक 31/05/2014 चे मुद्दा क्रमांक 6.5 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनांचे लाभार्थी निवडतांना महिला लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच मद्दा क्रमांक 6.6 नुसार एकुण मंजुर निधीपैकी 3 टक्के निधी अनुसुचितील अपंगासाठी राखुन ठेवावा, असे असतांना तसे केल्याचे आढळुन येत नाही.

**3.671 विशेष घटक योजने अंतर्गत बैलगाडी वाटपातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 67, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 31,80,000/- खर्च करण्यात आला आहे.

कृषि विभागाने सन 2015-2016 या वर्षाच्या विशेष घटक योजनेतर्गत 212 नग बैलगाडया 100 टक्के अनुदानावर खरेदी केल्या आहेत. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1) पुरवठादाराने बैलगाडीची तपासणी केल्याचा तपासणी अहवाल दिला आहे. परंतु, यात बैलगाडीची वाहन क्षमता 1,000 किग्रॅ असल्याचे नमुद नाही, जे की पुरवठा आदेशाप्रमाणे व दर कराराप्रमाणे अपेक्षीत आहे.

2) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्रमांक संकृऔ-2013/प्रक्र 158/11ऐ दिनांक 27/09/2013 अनुसार टेस्टींग स्टँडर्ड नुसार बैलगाडी 15/12917/1990 चे असणे आवश्यक आहे. परंतु, पुरवठादाराच्या तपासणी अहवालात नमुद नाही.

3) बैलगाडी सोबत वॉरंटी पत्र नाही.

4) सन 2015-2016 मध्ये 212 नग बैलगाडया खरेदी केल्या आहेत. पुरवठादारास दिनांक 27/03/2015 रोजी पुरवठा आदेश दिले होते व 45 दिवसांच्या आत पुरवठा करणे बंधनकारक होते. परंतु, त्याने पुरवठा न केल्याने कृषि विकास अधिकारी यांनी पत्र क्रमांक 433 दिनांक 01/06/2015, पत्र क्रमांक 707 दिनांक 01/09/2015, पत्र क्रमांक 948 दिनांक 08/12/2015 नुसार बैलगाडी पुरवठा अदयापपर्यंत झालेला नाही, असे संबंधित पुरवठादारास कळविलेले आहे. कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्रमांक 152 दिनांक 04/10/2013 नुसार विलंबाने पुरवठा केलेल्या पुरवठादारावर 3 टक्के प्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशा सूचना आहेत. त्यामुळे वरील पुरवठादार यांची एकुण बिलाची रक्कम रुपये 31,80,000/- वर 3 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 95,400/- दंड वसुलीस पात्र ठरतो (सर्व साहित्य माहे 02/2016 नंतरच आलेले आहे).

5) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक मागास 1089, दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थीचे मास्टर रजिस्टर तालुका निहाय ठेवणे आवश्यक असतांना सदरील कार्यवाही झाली नाही. त्यामुळे लाभार्थीस दुबार लाभ न मिळाले बाबत लेखा परीक्षणाची खात्री पटलेली नाही.

6) लाभार्थीचे अर्ज, 7/12 उतारा, 8अ जातीचे प्रमाणपत्र, लाभार्थी ग्रामसभेतून निवडलेबाबत तसेच पंचायत समिती ठरावामार्फत लाभार्थीचे पाटविलेले अर्ज लेखापरिक्षणात दर्शविण्यात आलेले नाहीत.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक परास/1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार योजनेच्या फलश्रुती अहवाल उपलब्ध झाला नाही.

### 3.672 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना HDPE पाईप, 5 एच.पी. इलेक्ट्रिक मोटार व पावर स्प्रे पंप खरेदी करून पुरवठा करणेबाबत.

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 49,92,846/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1082/645/366/34, दिनांक 29/07/1989 अन्वये जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेचे मुल्यमापन तीन स्तरावर करणे आवश्यक आहे. परंतु, कृषी विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी अशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे सदर योजना राबविल्यामुळे लाभार्थ्यांचा काय फायदा झाला? याबाबतची पडताळणी करता आली नाही. तसेच सदर योजना यापूर्वी देखील राबविण्यात आली होती. त्याचा अनुभव काय होता व त्याचा लाभार्थ्यांना कितपत फायदा झाला? याबाबतची कोणतीच अभिलेखे न दर्शविल्यामुळे पडताळणी करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ठ-"इ" नुसार जिल्हा परिषदांकडील वैयक्तिक लाभाच्या योजनांबाबत अंमलबजावणीचे वेळापत्रक ठरविण्यात आलेले असून निर्धारित वेळेनुसार प्रत्येक टप्याची कार्यवाही पूर्ण करण्याची जबाबदारी प्रथमत: मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निश्चित करावी व त्याप्रमाणे अंमलबजावणीचे विविध टप्पे मुदतीमध्ये पूर्ण करावेत, असे स्पष्ट निर्देशित आहे. परंतु, सदरील शासन निर्णयातील परिशिष्ठ-"इ" मधील बाब क्रमांक 1,4,5,7,8,9 व 10 चे विहित वेळेत पालन झालेले नाही.

3) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, तसेच कृषी आयुक्तालय, पुणे यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कृषी विकास अधिकारी यांनी जिल्हा परिषद स्तरावर लाभार्थ्यांना देय व देण्यात आलेल्या लाभधारकांची नोंद लाभार्थी मास्टर नोंदवहीत घेऊन त्यांनी सदर नोंदवहीची तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु, कृषी विभागाने अशी नोंदवही ठेवलेली नाही.

4) योजनेच्या अंमलबजावणी नंतर लाभार्थी शेतकऱ्यांकडून उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त करून घेण्यात आलेली नाहीत. तसेच योजना अंमलबजावणीनंतर योजनेचा फलश्रुती अहवाल निर्गमित केलेला नाही.

5) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-4114/प्र.क्र.136/4, दिनांक 23/09/2014 मधील 1 व (i,ii,iii,iv,v,vi) अन्वये कार्यवाही केलेबाबतची अभिलेखे संचिकेत दिसून आली नाहीत.

**3.673 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना ताडपत्री खरेदी करून पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 9,98,865/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1082/645/366/34, दिनांक 29/07/1989 अन्वये जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेचे मुल्यमापन तीन स्तरावर करणे आवश्यक आहे. परंतु, कृषी विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी अशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे सदर योजना राबविल्यामुळे लाभार्थ्यांचा काय फायदा झाला? याबाबतची पडताळणी करता आली नाही. तसेच सदर योजना यापूर्वी देखील राबविण्यात आली होती. त्याचा अनुभव काय होता व त्याचा लाभार्थ्यांना कितपत फायदा झाला? याबाबतची कोणतीच अभिलेखे न दर्शविल्यामुळे पडताळणी करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ठ-"इ" नुसार जिल्हा परिषदांकडील वैयक्तिक लाभाच्या योजनांबाबत अंमलबजावणीचे वेळापत्रक ठरविण्यात आलेले असून निर्धारित वेळेनुसार प्रत्येक टप्याची कार्यवाही पूर्ण करण्याची जबाबदारी प्रथमत: मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निश्चित करावी व त्याप्रमाणे अंमलबजावणीचे विविध टप्पे मुदतीमध्ये पूर्ण करावेत, असे स्पष्ठ निर्देशित आहे. परंतु, सदरील शासन निर्णयातील परिशिष्ठ-"इ" मधील बाब क्रमांक 1,4,5,7,8,9 व 10 चे विहित वेळेत पालन झालेले नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-2012/प्र.क्र.104/ वित्त-3, दिनांक 16/10/2012 मधील सूचना क्रमांक 3 अन्वये तसेच महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-2015/प्र.क्र.28/2015/विनिमय, दिनांक 25/06/2015 मधील सूचना क्रमांक 3 अन्वये निविदांमधील न्यूनतम दराच्या निविदांचे दर बाजारभावाशी पडताळून ते योग्य असल्याचे खरेदी समितीने प्रमाणित करणे आवश्यक राहील. परंतु, अशी उचित कार्यवाही केलेली नाही.

4) महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 प्रमाणे कार्यकराराकरिता रुपये 10 लाखांपर्यंतच्या खरेदी करिता रुपये 100/- व त्यापुढील प्रत्येक लाखाकरिता किंवा त्याच्या भागाकरिता रुपये 100/- राहील. असे असताना सदरील ताडपत्री खरेदीचा कार्यकरार रुपये 19,97,730/- चा आहे. तेव्हा रुपये 1,100/- मूल्यांच्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक होते. परंतु, विभागाने पुरवठादाराकडून रुपये 1,100/- च्या मुद्रांकावर करारनामा करून घेतलेला नाही. तरी रक्कम रुपये 1,100/- संबंधित पुरवठादाराकडून वसूल होणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग तसेच कृषी आयुक्तालय, पुणे यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कृषी विकास अधिकारी यांनी जिल्हा परिषद स्तरावर लाभार्थ्यांना देय व देण्यात आलेल्या लाभधारकांची नोंद लाभार्थी मास्टर नोंदवहीत घेऊन त्यांनी सदर नोंदवहीची तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु, कृषी विभागाने अशी नोंदवही ठेवलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-4114/प्र.क्र.136/4, दिनांक 23/09/2014 मधील 1 व (i,ii,iii,iv,v,vi) अन्वये कार्यवाही केलेबाबतची अभिलेखे संचिकेत दिसून आले नाहीत.

7) योजनेच्या अंमलबजावणीनंतर लाभार्थी शेतकऱ्यांकडून उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त करून घेण्यात आलेली नाहीत. तसेच योजना अंमलबजावणीनंतर योजनेचा फलश्रुती अहवाल निर्गमित केलेला नाही.

**3.674 विशेष घटक योजनेअंतर्गत 100 टक्के अनुदानावर पी.व्ही.सी. पाईप पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 9,25,630/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेच्या प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी आदेशात दिलेल्या सुचनांनुसार 1) अल्पभुधारक शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे. 2) एकाच कुटूंबातील एकापेक्षा जादा व्यक्तींना लाभ देण्यात येऊ नये. 3) वैयक्तिक लाभाच्या योजनेत महिलांना प्राधान्य देण्यात यावे, अशा सुचना असताना कृषी विभागाने व पंचायत समिती स्तरावर व जिल्हा स्तरावर अशा नोंदवही न ठेवल्याने दुबार लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ/ 2015/प्र.क्र.2/8/11 ऐ, दिनांक 23/11/2015 मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक 11 गुणवत्तापूर्ण कृषी अवजारांच्या नमुन्याची गुणवत्ता तपासणी कृषी विद्यापीठ / शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालये यांच्याकडून पुरवठा संस्थेने करुन घ्यावी. तसेच जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी यांनी उत्पादक / संबंधित पुरवठा संस्था यांनी एकत्रीतपणे नमुद टक्केवारीप्रमाणे तपासणी करणे आवश्यक आहे. अशी तपासणी केल्याचे दिसून येत नाही.

3) सेनगाव गटस्तरावर चलन क्रमांक 657, दिनांक 30/03/2016 ने 750 नग पुरवठा केल्याचे नमूद आहे. परंतु, त्यांचे साठा वहीत 682 नग जमा घेतले, तेव्हा 68 नग कमी जमा घेतल्याचे दिसून आले. तरी 68 कमी नगाचे रक्कम वसुलात आणावी.

4) साहित्य पुरवठा करण्याचे आदेश दिनांक 29/03/2016 ला देण्यात आले. त्यावर जावक क्रमांक नमूद नाही. तसेच दिनांक 29/03/2016 रोजी पुरवठा आदेश देऊन गट स्तरावर दिनांक 30/03/2016 रोजी साताराहून साहित्य पुरवठा कशा प्रकारे केला? याबाबत सत्यता पटत नाही.

5) विभागाचे गटाचे साठा रजिस्टर प्रमाणित नसून सन 2015-2016 चे साहित्य जमा व वाटपाच्या नोंदींवर कृषी विकास अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या घेतलेल्या नाहीत. सुरुवातीची शिल्लक नमुद केलेली नाही. रकाना क्रमांक 10 मध्ये दिनांक नमूद नाही. संख्या नमूद नाही. वाटप करणाऱ्याची स्वाक्षरी नाही. अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. तसेच हिंगोली गटाची साठा वही सादर केलेली नसून कळमनुरी गटाकडे लेखापरीक्षण दिनांकास 50 नग शिल्लक पडून आहेत. यावरुन मागणी नसतांना खरेदी जास्तीची झाल्याचे दिसते. तरी सदर 50 नगाची किंमत संबंधित खरेदी करणाऱ्याकडून वसुलीबाबत कार्यवाही करण्याबाबत मार्गदर्शक सुचना क्रमांक 16 मध्ये नमूद केल्याप्रमाणे रूपये 15,100/- ची वसुलीबाबत कार्यवाही व्हावी.

6) पुरवठा आदेशातील अटी शर्ती नुसार पुरवठा करण्यात आलेल्या साहित्याच्या दर्शनी भागावर ओळख खुण सुस्पष्ट आकाराचे पक्के इम्बॉसिंग केलेले लेबल असावे, असे स्पष्ट नमूद केले असताना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83(अ) नुसार साहित्य प्राप्त झाल्यानंतर विभाग प्रमुखाने त्यांच्या योग्य व गुणवत्तेनुसार खात्री करुन प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

8) विभागाने ठेवलेल्या संचिकेत तालुकानिहाय मागणी केल्याचे दिसून येत नाही. तेव्हा 3,016 नगाची मागणी कशाचे आधारे करण्यात आली? याचा खुलासा व्हावा.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक मागास 1094/ सीआर/2239/34/67, दिनांक 01/09/1993 परिच्छेद 4 प्रमाणे योजनेच्या लाभामुळे लाभार्थीच्या स्थितीत झालेल्या सुधारणा बाबतचा अहवाल प्राप्त करुन घेतलेला नाही. त्यामुळे योजनेचे उद्देश्य सफल झाल्याची पडताळणी करता आली नाही.

**3.675 विशेष घटक योजनेअंतर्गत 100 टक्के अनुदानावर एच.डी.पी.ई. पाईप पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 14,31,697/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे सन 2015-2016 वर्षाकरिताच्या मार्गदर्शक सुचनेतील (ब) कृषी अवजारे मागणी व पुरवठा गुणनियंत्रण मार्गदर्शक सुचनानुसार योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याकरिता भौतिक मर्यादेपेक्षा व प्रत्यक्ष गरजेपेक्षा अधिक व शेतकऱ्याची मागणी नसलेल्या औजारांची खरेदी करु नये. मागणीनुसार पुरवठा केलेली अवजारे पडून राहणार नाही, याची जबाबदारी मागणी नोंदविणाऱ्या अधिकाऱ्याची राहील आणि विनावाटप साहित्य पडून राहिल्यास किमती एवढ्या रक्कमेची एकरकमी वसूली संबंधिताकडून करण्यात येईल. असे असताना सदर साहित्याची मागणी किती होती व वाटप कशाचे आधारे करण्यात आले? याबाबत खात्री करता आली नाही. 88 नग शिल्लक राहिल्याने रूपये 45,496/- ची वसुलीबाबत कार्यवाही व्हावी.

2) सदर योजनेच्या प्रशासकीय व तांत्रिक आदेशामध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे अल्पभुधारक शेतकऱ्यांना प्राधान्य द्यावे. एकाच कुटूंबातील एकापेक्षा जादा व्यक्तींना लाभ देऊ नये. परंतु, अशा सुचना असताना, कृषी विभागाने पंचायत स्तरावर व जिल्हा परिषद स्तरावर नोंदवहया न ठेवल्याने दुबार लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.41/ 33, दिनांक 17/01/2011 व त्या अनुषंगाने निर्गमित केलेले शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 परिशिष्ठ - ई 2015-2016 च्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे वैयक्तिीक लाभाच्या योजना राबविण्यासाठी त्यात दिलेल्या स्थायी सुचनेनुसार योजनाची निवड प्रक्रीया, पुरवठा आदेश, साहित्याचे वाटप, विनियोग प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे व ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही पार पाडण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मस्त्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ2015/प्र.क्र.2018/11अे, दिनांक 23/11/2015 मधील सुचना क्रमांक 13 नुसार शासकीय योजनेअंतर्गत पुरण्यासाठी निहीत केलेल्या औजाराचे दर त्याच औजाराच्या खुल्या बाजारातील दरापेक्षा तुलनेने जादा असल्याचे आढळल्यास अशा अवजारांच्या किंमत फरकाची रक्कम पुरवठा संस्थेकडून वसुल करण्यात येईल. परंतु, अशी चौकशी खुल्या बाजारातील दराबाबत केल्याचे दिसून आले नाही.

5) तालुका स्तरावर साहित्य पोंच ज्यांनी घेतले, त्यांनी डिलेव्हरी चालनवार दिनांकीत सही करुन साठा वहीत कोणत्या पानावर नोंद घेतली, हे नमूद करणे आवश्यक आहे. तसेच लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आलेल्या साहित्याचे नोंदीसमोर दिनांक नमूद करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे साहित्य केव्हा वाटप करण्यात आले? याबाबत अचुक खात्री करता आली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83(अ) नुसार साहित्य प्राप्त झाल्यानंतर विभाग प्रमुखाने त्याच्या योग्य व गुणवत्तेनुसार खात्री करुन प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसत नाही.

7) सन 2015-2016 या वित्तीय वर्षाकरिता राबविण्यात येणाऱ्या योजनेकरीताच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे परिच्छेद 11 मधील नमुद प्रमाणे कृषी अवजारांची गुणवत्ता तपासणी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून करुन घ्यावी. तसेच सुचनेत नमूद केल्याप्रमाणे टक्केवारी नुसार 2.50 टक्केप्रमाणे कृषी विकास अधिकारी यांनी करावी. परंतु, तसे केल्याचे संचिकेवरुन दिसून येत नाही. याबाबत अनुपालन दर्शवावे.

**3.676 जिल्हा परिषद उपकरातून 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना ॲडजस्टेबल वखर पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत रक्कम रूपये 14,99,025/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजनेच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे 1) अल्पभुधारक व महिला शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच एका कुटूंबातील एकापेक्षा जास्त व्यक्तींना लाभ देण्यात येवू नये. परंतु, अशा सुचना असतांना कृषी विभागाने पंचायत समिती स्तरावर व जिल्हा स्तरावर नोंदवहया न ठेवल्यामुळे दुबार लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) कृषी, पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ/ 2015/प्र.क्र.218/11 ए, दिनांक 23/11/2015 मधील परिच्छेद क्रमांक 17 नुसार कोणत्याही अवजारांची मागणी नसल्यास स्वत:हुन अधिकाऱ्यांनी पुरवठादार संस्थेकडे मागणी नोंदवू नये आणि मागणीअभावी विक्रीविना पडून राहील्यास संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी, कृषी विकास अधिकारी यांची राहील. सदर खरेदी साहित्याची वाटप त्याच वित्तीय वर्षात होणे आवश्यक असताना साहित्य दिनांक 31/03/2016 रोजी विनावाटप पडून असल्याने जिल्हा परिषदेची रक्कम गुंतुन पडलेली आहे. तसेच लेखापरीक्षण दिनांकास पंचायत समिती, सेनगाव 180 नग, पंचायत समिती, औंढाकडे 194 नग व कळमनुरी 47 नग शिल्लक होते व पंचायत समिती, हिंगोली यांनी साठा वही दर्शविली नाही. एकूण 421 नग शिल्लक पडून असल्याने मागणी नसतांना खरेदी करण्यात आल्याचे स्पष्ट होते. सदर शिल्लक नगाची रक्कम रूपये 5,32,565/- संबंधित खरेदी करणाऱ्याकडून वसुल करण्याबाबत कार्यवाही करावी.

3) साहित्य खरेदी करण्यापूर्वी साहित्याच्या दराबाबत खुल्या बाजारातील दराची तपासणी केल्याचे संचिकेवरुन दिसत नाही. त्यामुळे नियमाचे पालन झालेले नाही.

4) मार्गदर्शक सुचना परिच्छेद क्रमांक 11 नुसार रुपये 10,000/- ते रूपये 50,000/- व त्यापेक्षा जास्त किंमतीच्या अवजारांच्या एकूण पुरवठा संख्येच्या 2.50 टक्के नमुने क्षेत्रीय स्तरावर काढून त्याची गुणवत्ता तपासणी कृषी विद्यापीठ / शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय यांचेकडून तपासणी केल्याचे आढळून आले नाही.

5) संबंधित पंचायत समितीच्या साठा नोंदवहींचे सर्व रकाने भरलेले नाहीत. सुरूवातीची शिल्लक वाटप व अखेर शिल्लक गोषवारा काढलेला नसून साहित्य वाटप करणाऱ्याची स्वाक्षरी व वाटप दिनांक नमूद नाही. त्यामुळे साहित्य केव्हा जमा झाले व केव्हा वाटप झाले? याचा बोध होत नाही.

6) शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचने व अटी शर्ती प्रमाणे साहित्य पुरविले व ते सुव्यवस्थीत ताब्यात प्राप्त झाले. याबाबतची पोचपावती गटस्तरावरुन दिली. त्यावर साहित्य प्राप्त करुन घेणाऱ्याने चलनावर नाव व स्वाक्षरी दिनांक नमूद केला नाही. तसेच साठा पान क्रमांक नमूद नाही. साहित्य आय.एस.आय. मार्क चेच आहे. त्यावर दर्शनी कामावर 3 बाय 2 आकारचे ॲल्युमिनिअम लेबल असलेबाबत नमूद नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक मागास 1094 / सीआर/2239/34/67, दिनांक 01/09/1993 परिच्छेद क्रमांक 4 प्रमाणे योजनेच्या लाभामुळे लाभार्थ्याच्या स्थितीत झालेल्या सुधारणाबाबतचा अहवाल प्राप्त करुन घेतलेला नाही. तसेच योजनेबाबतचे उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतलेले नाही. त्यामुळे योजनेचा उद्देश सफल झालयची पडताळणी करता आली नाही.

**3.677 अनुदानावर शेतक-याना हॅरो / डवरा / कॉटन-पुलर व 3 एच.पी.सब.पंप खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13 व 14) -** सदरबाबत रक्कम रूपये 3,70,40,693/- खर्च करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र. 446/नियम-09, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद स्तरावर योजना राबविण्यासाठी चे विहीत वेळापत्रकानुसार अंमलबजावणी विहीत करण्यात आलेली नाही. त्यामुळे योजनेचे उद्दीष्ट सफल झाले असे म्हणता येणार नाही.

2) मार्गदर्शक सुचना दिनांक 31/05/2014 अन्वये योजनेचे योग्य अमंलबजावणीचे मुल्यमापन त्रयस्थ संस्थेकडुन होणे आवश्यक होते. तथापि, असे मुल्यमापन केल्याचे लेखापरिक्षणात आढळुन आलेले नाही.

3) कृषी संचालक, निष्ठा व गुणनियंत्रण, कृषी आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शक सुचना दिनांक 31/05/2014 नुसार लाभार्थी योजनेचे योग्य वापर करत असल्याची भेटीबाबत नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

4) मार्गदर्शक सुचना दिनांक 31/05/2014 मधील 11 अन्वये लाभार्थ्यांना देण्यात येणा-या बाबवार अर्थसहा्यची योजनानिहाय बाबनिहाय व लाभार्थीनिहाय नोंद करण्याकरिता पंचायत स्तरावर नोंदवही ठेवण्यात यावी

व त्यामध्ये लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या अनुदानाची बाबनिहाय नोंद ठेवण्यात यावी. तसेच जिल्हा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) यांनी जिल्हा परिषद स्तरावर देखील लाभार्थ्यांना देय व देण्यात आलेल्या लाभ घटकांची नोंद नोंदवहीत ठेवणे बंधनकारक आहे. या नोंदवहीची तपासणी कृषी विकास अधिकारी यांनी वेळोवेळी करुन त्यातील नोंदी सांक्षाकीत करणे बंधनकारक राहील. पंचायत समिती स्तरावरील नोंदवह्या व अभिलेख जिल्हा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) / कृषी विकास अधिकारी यांनी भेटीच्या वेळी तपासुन तशी नोंद पंचायत समिती स्तरावरील नोंदवही मध्ये घेण्यात यावी. सदर अभिलेखे वेळोवेळी अद्ययावत करावेत व तपासणी वेळी तपासणी अधिका-यास उपलब्ध करुन द्यावेत. लाभार्थ्यांना दिलेल्या अर्थसहाय्याची लाभार्थीस्तरावर नोंद ठेवण्यासाठी लाभार्थी नोंदपुस्तीका देण्यात यावी. या नोंद पुस्तीकेत दिलेल्या अर्थसहाय्याची नोंद वेळोवेळी संबंधीत अधिका-यांनी न चुकता करावी व त्यावर स्वाक्षरी करावी. तथापि, अशी कार्यवाही करण्यात आल्याचे लेखापरिक्षणात दिसुन आले नाही.

5) मार्गदर्शक सुचना दिनांक 31/05/2014 अन्वये कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) 100 टक्के जिल्हा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) यांनी 10 टक्के, कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी 5 टक्के व कृषी आयुक्तालय 0.75 टक्के या प्रमाणे तपासणी करणे आवश्यक आसतांना अशी तपासणी झाल्याचे दिसुन आले नाही.

6) शासन निर्णय क्रमांक वि.घ.यो/1611/प्र.क्र.4/112 `ए`, दिनांक 03/06/2011 चे परिशिष्ट दोन (4) प्रमाणे सदरील योजनेचा लाभ घेणारे लाभार्थी पाच वर्षापर्यंत या योजनेचा पुनश्य लाभ घेऊ शकणार नाहीत व त्यासाठी उक्त शासन निर्णयाचे परिशिष्ट तीन (10) प्रमाणे लाभार्थ्यांना देण्यात येणा-या बाबवार अर्थसहाय्याची योजनानिहाय, बाबनिहाय व लाभार्थीनिहाय नोंदणीसाठी पंचायत समिती स्तरावर नोंदवही ठेवणे व नमुद केलेल्या अधिका-यांनी त्याची तपासणी करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केल्याचे दिसुन आले नाही.

**3.678 शासनाकडून येणे असलेल्या अभिकरण शुल्काबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** कृषी विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, जिल्हा परिषदेस शासनाकडून येणे असलेली अभिकरण शुल्काची रककम रुपये 26,93,674/- प्राप्त झालेली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-1089/सीआर-1392/24, दिनांक 19/05/1989 अन्वये जिल्हा परिषदेने अभिकरण तत्वावर राबविलेल्या योजनासाठी 3 टक्केप्रमाणे अभिकरण शुल्क जिल्हा परिषदांना देय असून 2 टक्के अभिकरण शुल्क मुळातच कपात करुन घ्यावयाचे असून व 1 टक्के अभिकरण शुल्क अनुदाननिर्धारणानंतर देय आहे. कृषी विभागाने राबविलेल्या योजनापोटी सन 1990-1991 ते 1998-1999 पर्यंत रुपये 4,51,149/- अभिकरण शुल्क अप्राप्त आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मविआ-1099/प्र.क्र.3458/24, दिनांक 29/05/1999 अन्वये जिल्हा परिषदांकडे अभिकरण तत्वावर सोपविलेल्या योजनांसाठी 5 टक्के अभिकरण शुल्क अनुज्ञेय असून 4 टक्के अभिकरण शुल्क मुळातच कपात करुन घ्यावयाचे असून 1 टक्के अभिकरण शुल्क अनुदान निर्धारणानंतर देय आहे. कृषी विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबादने सन 1999-2000 ते 2014-2015 पर्यंत राबविलेल्या योजनापोटी रुपये 22,42,525/- अभिकरण शुल्क अप्राप्त आहे.

3) सन 2015-2016 अखेर पर्यंत प्रलंबितअभिकरण शुल्क रक्कम रुपये 26,93,674/- वसूल करुन अनुपालन दर्शवावे.

**3.679 अपहार प्रकरणे माहिती सादर करणेबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** जिल्हा परिषद, उस्मानाबादचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात प्रलंबित अपहार तसेच निकाली काढलेल्या अपहार प्रकरणाबाबत

अर्धसमास पत्र क्रमांक 01, दिनांक 17/10/2016 अन्वये अभिलेख्यांची मागणी केली अपहार प्रकरणाची माहिती सादर करण्यात आली असता खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येतात.

1) सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात अफरातफरीचे 2 प्रकरणांमधील रक्कम रुपये 9,09,620/- वसूल होणे बाकी असल्याचे निदर्शनास आले आहे.

2) पंचायत समिती, उमरगाचे तत्कालीन गोडाऊन किपर तथा कनिष्ठ सहायक श्री. एस. जी. गायकवाड यांनी कृषी अवजारांच्या लोकवाटयाची अफरातफर केल्यामुळे त्यांच्यावर दिनांक 13/08/2012 रोजी पोलीस स्टेशन उमरगा येथे एफ. आय. आर. क्रमांक -158/2012 अन्वये रक्कम रुपये 6,00,565/- चा अपहार केल्याचा गुन्हा दाखल झालेला आहे. तसेच श्री.एस.जी.गायकवाड दिनांक 26/08/2012 रोजी बडतर्फ करण्यात आले आहे.

3) अर्ध समास पत्र क्रमांक 01, दिनांक 17/10/2016 अन्वये कृषी विभागाकडून माहिती मागविली असता त्यात श्री.एस.जी.गायकवाड, गोडाऊन किपर यांचेकडून रक्कम रुपये 20,000/- कपात कपात करुन वसूल केल्याचे कळविले आहे. त्यामळे श्री.एस.जी.गायकवाड यांचेकडून रक्कम रुपये 6,00,565/- मधून रक्कम रुपये 20,000/- वजा जाता रक्कम रुपये 5,80,565/- वसूल होणे बाकी आहे. श्री.एस.जी.गायकवाड, गोडाऊन किपर यांचेकडून रक्कम रुपये 5,80,565/- वसूल करावी.

4) पंचायत समिती, भूम तत्कालीन कनिष्ठ सहायक श्री.सी.बी.खरपुडे यांनी कृषी साहित्याचा लोकवाटयामध्ये अफरातफर केल्यामुळे त्यांना दिनांक 26/11/2012 रोजी निलंबीत केले आहे. तसेच दिनांक 08/12/2012 पोलिस स्टेशन, भूम येथे भारतीय दंड संहिता नियम 409 नुसार एफ.आय.आर.क्रमांक 120/2012 अन्वये रक्कम रुपये 6,13,356/- चा अपहार केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

5) अर्ध समास पत्र क्रमांक 01, दिनांक 04/07/2016 अन्वये कृषि विभागाकडून माहिती मागविली असता त्यात श्री. सी. बी. खरपुडे, कनिष्ठ सहायक यांचेकडून रक्कम रुपये 5,67,038/- वसूल केल्याचे कळविले आहे. त्यामळे श्री. सी. बी. खरपुडे यांचेकडून रक्कम रुपये 6,13,356/- मधून रक्कम रुपये 5,67,038/- वजा जाता रक्कम रुपये 46,318/- वसूल होणे बाकी आहे.

**3.680 महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण योजनेअंतर्गत अपारंपारिक उर्जा कार्यक्षम पथदिवे आस्थापित करणेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** कृषी विभाग, जिल्हा परिषद, लातूर सन 2015-2016 मध्ये मे. साक्षी पॉवर ॲण्ड इंडस्ट्रीज नाशिक यांना दरकरारावर आदर्श गावे निवडलेल्या गावामध्ये 368 नग व पर्यावरण संतुलन समृध्द ग्राम योजनेतर्गत यशस्वीरित्या सहभागी झालेल्या ग्रामपंचायतीना 165 नग असे एकुण 533 नग उर्जा कार्यक्षम पथदिवे पुरवठा करुन आस्थापित करणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आले. यासाठी प्रमाणक क्रमांक 25, दिनांक 26/10/2015 अन्वये रक्कम रुपये 9,00,770/- एवढी रक्कम प्रदान करण्यात आली असुन त्याचा तपशिल व त्यावरील अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण यांनी केलेल्या दरकरारातील अटीनुसार 10 टक्के लाभार्थी हिस्सा जिल्हा परिषदेने जमा केल्यावर प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वावर संबधीत गावची यादी, फिटीग्जची संख्या इ. सह दरकरार धारकास पुरवठा आदेश दयावेत. तथापि लाभार्थी हिस्सा न घेताच पुरवठा आदेश देण्यात आले आहेत किंवा पुरवठा पश्चात लाभार्थी हिश्याची रक्कम घेण्यात आली आहे. लोकहिश्याची शेष रक्कम रुपये 66,248/- संबधीत ग्रामपंचायतीकडुन वसुल करुन पुर्तता दर्शवावी.

2) ग्रामविकास विभागाचे परिपत्रक क्रमांक 1084/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार प्रथम लाभार्थी हिस्सा वसुल झाल्याशिवाय योजना कार्यान्वीत करु नये असे आदेश असतांना लाभार्थी हिस्सा जमा न करता केवळ तरतुदीमधुन खर्च केलेला आहे.

3) दरकरारातील अट क्र. 5 नुसार दरकरारधारक हे फिटीग्जचा पुरवठा, आस्थापना, चाचणी व कार्यान्वन इ.बाबी कार्यादेश दिलेल्या कालावधीत पुर्ण करतील.(कामाची मुदत पुरवठा झाल्यापासून 45 दिवस) असे न केल्यास अपुर्ण कामावर 0.5 टक्के प्रति आठवडा व एक कामाच्या किंमतीच्या जास्तीत जास्त 5 टक्केपर्यत दंडाची आकारणी

करणे आवश्यक आहे. तथापि यासंबधाने संचिकेची तपासणी केली असता तक्रार प्राप्त होवुनही व पुरवठापश्चात तपासणीनंतर सौर पथदिवे विलंबाने आस्थापित व कार्यान्वयन केलेले असतांना दंडात्मक कार्यवाही केलेली नाही.

दरकरारातील अट क्र.5 नुसार दरकरारधारक हे फिटीग्जचा पुरवठा, आस्थापना, चाचणी व कार्यान्वन इ. बाबी कार्यादेश दिलेल्या कालावधीत पुर्ण करतील. तथापि यासंबधाने पुरवठापश्चात कृषि विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांचा तपासणी अहवाल जावक क्रमांक 167/16, दिनांक 08/04/2016 नुसार ग्रामपंचायत सुकणी येथे 6 नग सौर पथदिवे आस्थापित केले नाहीत व हकनाकवाडी येथे 2 नग सौर पथदिवे आस्थापित केले असुन दोन्ही दिवे बंद असल्याचे अहवालावरुन दिसुन आले. पुरवठा आदेशनुसार हकनाकवाडी ग्रामपंचायतीस 15 नग पथदिवे पुरवठयाचे आदेश असतांना 2 पथदिवेच आस्थापित करण्यात आल्याने अप्राप्त 13 नग पथदिव्यापोटी व ग्रामपंचायत सुकणी येथे 6 नग सौर पथदिवे आस्थापित केलेले नसल्याने एकुण 19 नग पथदिव्याची प्रदान रक्कम रुपये 32,110/- संबधीत पुरवठादाराकडुन वसुल करुन शासनखाती भरणा दर्शवावी. कृषि विकास अधिकारी, पंचायत समिती अहमदपुर यांचा तपासणी अहवाल जावक क्रमांक निरंक नुसार केलेल्या तपासणी अहवालानूसार रोकडा (सा) व माकणी येथे प्रत्येकी 6 नग अप्राप्त असल्याचे व आस्थापित केलेले नाहीत. त्यामुळे पुरवठादाराकडुन 12 नग पथदिव्याची रक्कम रुपये 20,280/- वसुल करुन शासनखाती भरणा दर्शवावी.

4) सदर योजनेचे कार्यादेश जिल्हा परिषेदेमार्फत देण्यात आल्याने या संबधीच्या सर्व तांत्रिक बाबी, संयंत्राची हमी, वितरण, हमी काळातील दुरुस्ती ई. बाबीची जबाबदारी जिल्हा परिषेदेची असल्याने फिटिंग्जचे तांत्रिक बाबीचे आवश्यक चाचणी प्रमाणपत्र पुरवठादाराकडुन घेणे आवश्यक आहे. तथापि असे चाचणी प्रमाणपत्र घेतल्याचे संचिकेत दिसुन आले नाही. पुर्तता दर्शवावी.

5) दरकरारातील अटी व योजनेची अमंलबजावणी मुदा क्र.7 नुसार व परवठा आदेशातील अट क्र.8 नुसार दरकराराधारकाने फिटिंग्ज बसविल्यावर व कार्यान्यन केल्यावर आस्थापना अहवालावर संबधीत गावच्या सरपंच / ग्रामसेवक याची स्वाक्षरी घेवुन आस्थापना अहवालासह देयक जिल्हा परिषदेकडे सादर करावे. जिल्हा परिषदेने याबाबतची आवश्यक ती पडताळणी करुन एकुण देयकाचया 90 टक्के टक्के देयकाची अदायगी करणे आवश्यक आहे. तथापि अशी पडताळणी करुनच देयकाची अदायगी केल्याबाबतचा अहवाल लेखापरीक्षणत दिसुन आला नाही. पुर्तता दर्शवावी.

6) दरकरारातील अट क्र.9 नुसार पुरवठा साहित्याचा दोष निवारण कालावधी फिटिंग्ज कार्यान्वित केल्यापासुन एक वर्षाचा असुन या कालावधीत निर्माण झालेले दोष संबंधीतास कळविल्यानंतर 10 दिवसाचे आत दोषाचे निवारण करतील असे न केल्यास सदर दोषाचे निवारण जिल्हा परिषद स्वत: करुन त्याचा खर्च संबधीताच्या देयकातुन सुरक्षा अनामत रक्कमेतुन वसुल करता येईल. तथापि संबधीतास कळवुनही 10 दिवसाचे आत दोषाचे निवारण केलले नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेने याबाबत वर नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**3.681 उर्जा विकास अभिकरण योजनेतर्गत लोकवाटा रक्कम परत करणेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 16, दिनांक 14/10/2015 अन्वये रक्कम रुपये 20,685/- खर्च करण्यात आला आहे.

सन 2014-15 मध्ये सौर पथदिवे पुरवठा नग पुरवठादाराने वेळेत आस्थापित न केल्यामुळे आंबेगांव, तालुका अहमदपुर ग्रामपंचायतीने ठरावादवारे रुपये 20,685/- लोकवाटा परत मागणी केल्यामुळे सदरील लोकवाटा वरील प्रमाणकान्वये ग्रामपंचायतीस परत करण्यात आला आहे. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 20 नुसार रक्कम मिळल्याबबाबतची पोचपावती घेणे व महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा संहिता 2011 नियम 11 (9) नुसार ग्रामपंचायतीस प्राप्त झालेल्या पैशांची पोचपावती ज्या दिवशी रक्कम प्राप्त झाली असेल त्याच दिवशी रुपये 5,000/- व त्यापेक्षा अधिक सर्व जमा रक्कमांवर महसुल मुद्रांक लावून ती अदात्यास देणे आवश्यक आहे. तथापि अशी पोचपावती घेण्यात आली नाही.

2) पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार उर्जा कार्यक्षम पथदिवे दिलेल्या मुदतीत आस्थापित झाले नाही तर महाराष्ट्र शासनाचे पर्चेस मॅन्युअल 1978 चे कलम 10 (अ) नुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. तथापि वर नमुद केल्यानुसार पुरवठादाराने उर्जा कार्यक्षम पथदिवे दिलेल्या मुदतीत आस्थापित केलेले नसतानांही दंडात्मक कार्यवाही केली नाही.

3) ग्रामपंचायत मौ.आंबेगाव, तालुका अहमदपूर येथे सौर पथदिवे नग 5 आस्थापित करणे बाबत प्रथमत: ग्रामपंचायतीकडून लोकवाटा वर्गणी पोटी रुपये 20,685/- एवढी वसूल करून प्रमाणक क्रमांक 130, दिनांक 31/03/2015 रक्कम रुपये 5,75,640/- अन्वये दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्कटिंग फेडरेशन ली.मुंबई यांना रक्कम रुपये 5,04,836/- निव्वळ देय प्रदान केलेली आहे. परंतु ग्रामपंचायत मौ.आंबेगाव, तालुका अहमदपूर येथे सौर पथदिवे नग 5 आस्थापित केलेली नसतानाही नियमबाह्यपणे देयकाचे प्रदान झालेले आहे.

शासन अनुदान सदरच्या 5 नगाची किमत (रुपये 15,051 x 5) रक्कम रुपये 75,255/- एवढी रक्कम दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्कटिंग फेडरेशन लि.मुंबई कडून वसूल करणे आवश्यक असताना ती लेखापरीक्षण तारखेपर्यत वसूल करण्यात आली नाही. सदरील रक्कम संबधीताकडून वसूल करून त्या त्या लेखाशीर्षा खाली भरणा करून पूर्तता दर्शवावी.

**3.682 जिल्हा वार्षिक योजना उर्जा विकास अभिकरण नाविण्यपुर्ण बाब अतर्गत ग्रामपंचायतीचे हद्दीत नविन सौरदिवे पथदिवे पुरवठा व आस्थापित करणेतील अनियमिताबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** कृषी विभाग, जिल्हा परिषद, लातूरने सन 2015-2016 मध्ये केंद्र शासनाचे दरकरारधारक मे. AVI अप्लायन्सेस प्रा.लि. अहमदाबाद यांचे अधिकृत पुरवठादार मे. मंत्री सोलार लातुर यांना सुधारित दरकरार क्रमांक SLS WLED/ES-2/RC-D30F0000/1215/ 32/06652/2048/56817, Dated 09/02/2016 नुसार प्रति नग रुपये 13,440/- प्रमाणे दरकरारावर ग्रामपंचायतीचे हद्दीत 223 नग उर्जा कार्यक्षम पथदिवे पुरवठा करुन आस्थापित करणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आले. यासाठी रक्कम प्रमाणक क्रमांक 176, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 29,97,120/- एवढी रक्कम प्रदान करण्यात आली असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-1000/प्र.क्र.14/कोषा-2, दिनांक 11/02/2000 अन्वये 15 फेब्रुवारी नंतर वर्षा अखेर खरेदी करू नये असे स्पष्ट आदेश असताना नियमबाह्यपणे खरेदी करण्यात आली आहे. केवळ अनुदान खर्च करण्याचे उद्देशाने नियोजन न करता खरेदी केलेली आहे या बाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे क्षमापन प्राप्त करून अनुपालन दर्शवावे.

2) उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2014-प्र.क्र.82/भाग-III/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 मधील परि.3.2.3 नुसार 3 लाखापेक्षा जास्त किंमत असलेल्या व केंद्र शासनाच्या डिजीएसॲण्ड डी च्या दरकरारावर उपलबध असलेल्या ब्रॅण्डेड वस्तुची खरेदी दरकराराआधारे करण्यात येईल तथापि ब्रॅण्डेड वस्तुच्या 3 लाखापेक्ष जास्त किंमतीचया खरेदीसाठी, खुल्याबाजारातील किंमत तपासुन डि जी एस ॲण्ड डी च्या पॅनालवरील दरकरारधारकासह इतर उत्पादक / वितरक / पुरवठादार यांचेकडुन दरपत्रके मागवुन व त्याच्याशी वाटाघाटी करुन डि जी एस ॲण्ड डी च्या दरकरारापेक्षा कमी दराने वस्तु उपलब्ध होत असल्यास दरपत्रके मागवुन खरेदी करता येईल. त्यानुसार खुल्या बाजारातुन जिपला /कृषी/कार्या-4/सौर पथदिवे/सी आर/4/कावि-16, दिनांक 18/03/2016 नुसार दरपत्रके मागविण्यात येवुन नियमबाह्यरित्या हातोहात दरपत्रके घेण्यात आली. प्राप्त चार दरपत्रकानुसार प्राप्त दर हे डिजीएसॲण्ड डी च्या दरकरारापेक्षा अधिक असल्याने व वाटाघाटीअंती दर कमी करण्यात न आल्याने केंद्र शासनाचे दरकरारधारक मे. AVI अप्लायन्सेस प्रा.लि. अहमदाबाद यांचे अधिकृत पुरवठादार मे. मंत्री सोलार लातुर यांना सुधारित दरकरार क्रमांक SLS WLED/ES-2/RC-D30F0000/1215/32/06652/2048/56817, Dated 09/02/2016 नुसार प्रति नग रुपये 13,440/- प्रमाणे दरकरारावर ग्रामपंचायतीचे हद्दीत 223 नग उर्जा कार्यक्षम पथदिवे पुरवठा करुन आस्थापित करणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आले. उक्त सुधारित दरकरारानुसार

प्रति नग सौर पथदिव्याची किंमत रुपये 12,800/- असतांना रुपये 13,440/- या दराने रक्कम प्रदान करण्यात आली आहे. खुलासा व्हावा.

3) कृषी समिती सभा दिनांक 17/03/2016 ठराव क्रमांक 220 नुसार ग्रामपंचायतीच्या हद्दीत मागणीप्रमाणे 5 टक्के लोकवाटा भरुन सौर पथदिवे बसविणे ही योजना राबविण्यासाठी मंजुरी देण्यात आली. म्हणजेच 95 टक्के अनुदानावर योजना राबवावयाची आहे. वर उल्लेखिल्याप्रमाणे सुधारित दरकरारानुसार प्रति नग सौर पथदिव्याची किंमत रुपये 12,800/- असल्याने त्यावर 95 टक्के अनुदान रुपये 12,160/- व 5 टक्के लोकवाटा रुपये 640/- अनुज्ञेय राहिल. त्यानुसार 223 नग सौर पथदिव्यासाठी रक्कम रुपये 27,11,680/- अनुदान देय ठरते. लोकवाट्याची रक्कम ग्रामपंचायतीकडुन पुरवठा आदेशापुर्वीच घेण्यात आली असल्याने लोकवाट्याची रक्कम अधिक अनुदानाची रक्कम एकत्रितरित्या पुरवठादारास देणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही न होता रककम रुपये 29,97,120/- आहरित करुन प्रदान करण्यात आल्याने करण्यात आल्याने रक्कम रुपये 2,85,440/- चे अतिप्रदान झाले आहे. सदरची रक्कम संबधीतावर जबाबदारी निश्चित करुन वसुल करावी व शासन खाती भरणा करावी.

### 3.683 जिल्हा वार्षिक योजना उर्जा विकास अभिकरण नाविण्यपुर्ण बाबअतर्गत ग्रामपंचायतीचे हद्दीत नविन सौरदिवे पथदिवे पुरवठा व आस्थापित करणेतील अनियमिताबाबत.

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** कृषी विभाग, जिल्हा परिषद, लातूरने सन 2015-2016 मध्ये केंद्रशासनाचे दरकरारधारक मे. कोटक उर्जा प्रा.लि. बेंगलोर यांचे अधिकृत पुरवठादार मे. मेकॉन इंडस्ट्रीज लातुर यांना दरकरार क्रमांक Solar light/IT-2/RC-D3020000/0315/82/05747/1539, Dated 16/02/2015 नुसार प्रति नग रुपये 18,450/- प्रमाणे दरकरारावर ग्रामपंचायतीचे हद्दीत 156 नग उर्जा कार्यक्षम पथदिवे पुरवठा करुन आस्थापित करणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आले. यासाठी प्रमाणक क्रमांक 178, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 28,78,200/- एवढी रक्कम प्रदान करण्यात आली असुन त्याचा तपशिल व त्यावरील अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-1000/प्र.क्र.14/कोषा-2, दिनांक 11/02/2000 अन्वये 15 फेब्रुवारी नंतर वर्षा अखेर खरेदी करू नये असे स्पष्ट आदेश असताना नियमबाह्यपणे खरेदी करण्यात आली आहे. केवळ अनुदान खर्च करण्याचे उद्देशाने नियोजन न करता खरेदी केलेली आहे या बाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे क्षमापन प्राप्त करून अनुपालन दर्शवावे.

2) उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2014-प्र.क्र.82/भाग-III/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 मधील परि.3.2.3 नुसार 3 लाखापेक्षा जास्त किंमत असलेल्या व केंद्र शासनाच्या डिजीएसअॅण्ड डी च्या दरकरारावर उपलबध असलेल्या ब्रॅण्डेड वस्तुची खरेदी दरकराराआधारे करण्यात येईल तथापि ब्रॅण्डेड वस्तुच्या रूपये 3 लाखापेक्षा जास्त किंमतीच्या खरेदीसाठी, खुल्याबाजारातील किंमत तपासुन डिजीएसअॅण्ड डी च्या पॅनालवरील दरकरारधारकासह इतर उत्पादक / वितरक / पुरवठादार यांचेकडुन दरपत्रके मागवुन व त्याच्याशी वाटाघाटी करुन डिजीएसअॅण्ड डी च्या दरकरारापेक्षा कमी दराने वस्तु उपलब्ध होत असल्यास दरपत्रके मागवुन खरेदी करता येईल. त्यानुसार खुल्या बाजारातुन जिपला/कृषी/कार्या-4/सौर पथदिवे/सी आर/4/कावि-26, दिनांक 08/01/2016 नुसार दरपत्रके मागविण्यात येवुन नियमबाहयरित्या हातोहात दरपत्रके घेण्यात आली. प्राप्त चार दरपत्रकानुसार प्राप्त दर हे डिजीएसअॅण्ड डी च्या दरकरारापेक्षा अधिक असल्याने व वाटाघाटीअंती दर कमी करण्यात न आल्याने केंद्रशासनाचे दरकरारधारक मे. कोटक उर्जा प्रा.लि. बेंगलोर यांचे अधिकृत पुरवठादार मे. मेकॉन इंडस्ट्रीज लातुर यांना वर नमुद दरकरारानुसार प्रति नग रुपये 18,450/- प्रमाणे दरकरारावर ग्रामपंचायतीचे हद्दीत 156 नग उर्जा कार्यक्षम पथदिवे पुरवठा करुन आस्थापित करणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आले.

3) कृषी समिती सभा दिनांक 20/04/2015 ठराव क्रमांक 188 नुसार सौर पथदिवे योजनेसाठी प्रस्तावित लोकवाटा 20 टक्कके ही रक्कम जास्तीची होत असल्याने त्याऐवजी 5 टक्के लोकवाटा रक्कम रुपये 960/- ठेवणेबाबतची सुचना केली. तसेच दरकरारानुसार मुळ किंमतीत कमी/जास्त बदल झाल्यास त्याप्रमाणे लोकवाटा रक्कमेतील बदलास मान्यता देण्यात आली. म्हणजेच 95 टक्के अनुदानावर योजना राबवावयाची आहे. वर

उल्लेखिल्याप्रमाणे दरकरारानुसार प्रति नग सौर पथदिव्याची किंमत रुपये 18,450/- असल्याने त्यावर 95 टक्के अनुदान रुपये 17,528/- व 5 टक्के लोकवाटा रुपये 922/- अनुज्ञेय राहिल. त्यानुसार 156 नग सौर पथदिव्यासाठी रक्कम रुपये 27,34,368/- अनुदान देय ठरते. लोकवाटयाची रक्कम पुरवठा आदेशापुर्वीच घेण्यात आली असल्याने लोकवाटयाची रक्कम अधिक अनुदानाची रक्कम एकत्रितरित्या पुरवठादारास देणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही न होता रक्कम रुपये 28,78,200/- आहरित करुन प्रदान करण्यात आल्याने करण्यात आल्याने रक्कम रुपये 1,43,832/- चे अतिप्रदान झाले आहे. सदरची रक्कम संबधीतावर जबाबदारी निश्चित करुन वसुल करावी व शासन खाती भरणा करावी.